चाळीस पैसे

१ मे १९६६

# माणूस

प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता महाराष्ट्रस्य राज्यस्य मुद्रा भद्राय राजते



# मुद्रा भद्राय राजते...

नवमहाराष्ट्राच्या निर्मितीकरिता आपण
आता प्रतिज्ञाबद्ध आहोत.
या आनंदोत्सवाची स्मृती म्हणून
या राज्याची जी मुद्रा निश्चित केली आहे
तिच्यावर 'प्रतिपच्चंद्ररेखेव'
–ही शिवाजी महाराजांनी निवडलेली वाक्ये
आम्ही घेतली आहेत.
याचा अर्थच हा की
ही राजसत्ता लोककल्याणाकरिता राबणार आहे.
आपल्याला आता सामान्य जनतेच्या
आशाआकांक्षा पूर्ण करावयाच्या आहेत.
त्यांना शिक्षणाची भूक आहे.
दोन वेळा त्यांना सुखाने,
मानाने घास खावयाचे आहेत.
आणि ही गरज पूर्ण करावयाची
जिम्मेदारो
आपण घेतली आहे.

*– श्री. यशवंतराव चव्हाण*
*महाराष्ट्र राज्यनिर्मिती, शिवनेरी*
*दि. २७ एप्रिल १९६०*




वर्ष पाचवे : अंक तेविसावा : १ मे १९६६
किंमत चाळीस पैसे : वार्षिक वर्गणी दहा रुपये
संपादक : श्री. ग. माजगावकर
पत्ता : ४१९ नारायण, पुणे २. : दूरध्वनी : ५७३५९.

## अभिप्राय

अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ज्याप्रमाणे संपादक सहमत असतातच असे नाही, त्याप्रमाणे संपादकाच्या मतांशी वाचकही सहमत होऊ शकतीलच असे नाही. 'माणूस'चे चालू अंकाचे (१५ एप्रिल) मुखपृष्ठ मात्र चांगलेच खटकले. चित्रकलेचा हा बहुधा नवा नमुना असेल (Modern Art किंवा तसलेच काही तरी!). अर्थात आज प्रत्येक मासिकाच्या मुखपृष्ठावरील उत्तान रंभा, उर्वशी, मेनकेच्या चित्रांपेक्षा श्री. सालकरांचे कुंचल्याचे फटकारे बरेच.

— रमेश आठंगळे, मुंबई.

आपला माणूस दिवसेदिवस आकर्षक बनत चालला आहे.

आजच्या अंकावरील मुखपृष्ठ खरोखरीच रंगसंगतीच्या दृष्टीने आकर्षक आहे. पण विषय? ही मॉडर्न आर्ट! कृपया सालकरांनी यातला विषय स्पष्ट करून सांगितला तर बरे होईल. माझ्याप्रमाणे असंख्य वाचकांना हा प्रश्न पडला असेल. कृपया प्रयत्न करून पाहा.

— म. ग. शेटये, कर्जत.

'ग्यानबाचे गुऱ्हाळ' हे सदर फार आवडले. त्यात उपरोधिकता आहेच, पण त्याबरोबर अधिक सवंगता नसली तर बरे होईल. माणूस दिवसेदिवस अधिक चटपटीत व तरतरीत बनत चालला आहे. त्याचे बाळसे वाढीस लागून तो 'पहिलवान' बनो.

— शरद काळे, पडेल (रत्नागिरी).

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन.
अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' पाक्षिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही.
ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# देश-विदेश

## □ माओनंतर कोण व काय ?

चिनी कम्युनिस्ट नेता माओ-त्से-तुंगच्या मृत्यूबद्दल वा आजाराबद्दल आजपर्यंत जगात जेवढ्या वावड्या उठल्या असतील, तेवढ्या कदाचित इतर कुणाबद्दलही उठल्या नसतील. चीनमधील कम्युनिस्ट क्रांतिपूर्वकालात राष्ट्रीय चीनच्या क्युमिन्टांग सरकारने माओ-त्से-तुंगचा मृत्यू झाल्याचे वारंवार घोषित केले होते आणि माओ खरोखरच मेला, याची साऱ्या जगाला निःशंक खात्री पटते न पटते आहे, तोच माओ पटकन कोठेतरी उगवावयाचा. एकदा कम्युनिस्टांच्या आंतरराष्ट्रीय कॉमिटर्नने १९३० साली माओ मेल्याची खात्री पटून त्याच्यावर एक प्रदीर्घ मृत्यूलेखही प्रसिद्ध केला होता.

माओ मेला असला पाहिजे अथवा अत्यंत अत्यवस्थ असला पाहिजे, अशा ज्या बातम्या पिकतात, त्यांचा उगम बहुतकरून पेकिंगमधील परदेशी राजदूतांच्या ज्या पार्ट्या होतात, त्यांमधून होतो. बरेच दिवस माओ-त्से-तुंग जाहीर समारंभात दिसला नाही, किंवा त्याचा नवीन फोटोही कुठे दिसला नाही, तर साहजिकच परदेशी राजप्रतिनिधींचे, त्यांच्या नोकरवर्गाचे तर्कवितर्क चालू होतात. अशीच एकदा १९५२ साली माओ एकतर मेला तरी असला पाहिजे, किंवा एकदम मरणोन्मुख तरी असला पाहिजे, अशी जोरदार आवई उठली होती; ती खोटी कशी ठरली याची एक गमतीदार हकीकत त्या वेळचे चीनमधील भारतीय राजदूत सरदार के. एम्. पाणीक्कर यांनी लिहून ठेवली आहे.

एक ऑक्टोबरच्या क्रांतीच्या वर्धापनदिनानिमित्त त्या दिवशी पेकिंगमध्ये लाखो चिनी स्त्री-पुरुषांचे, मुलांचे व सैनिकांचे संचलन होते. पेकिंगमधील तियेन आन मेन हा मुख्य चौक त्यानिमित्त भरपूर शृंगारण्यात आला होता व मुख्य व्यासपीठाच्या जरा दूरच परदेशी राजदूतांची बसण्याची व्यवस्था केली होती.

जवळजवळ साऱ्या राजदूतांची खात्री होती, की आजच्या संचलनाची सलामी स्वीकारण्यास माओ-त्से-तुंग येणे शक्य नाही. परंतु ठरलेल्या वेळेवर माओ शिस्तीत व्यासपीठावर हजर झाला आणि सतत सात तास एका जागेवर उभे राहून त्याने चौकातून जाणाऱ्या संचलनाची सलामी स्वीकारली. परदेशी

पाहुण्यांचा थोडासा अपेक्षाभंग झाला. परंतु त्यांना समजलेली बातमी खरी आहे, याची त्यांना इतकी खात्री होती, की व्यासपीठावर सलामी घेत असलेला माओ– त्से–तुंगच आहे, यावर त्यांचा विश्वास बसत नव्हता. एकाने तर्क लढवला, की खूप इंजेक्शने देऊन डॉक्टरांनी माओला तात्पुरता उभा केला असला पाहिजे, तर दुसऱ्याला अशी शंका आली, की समोर उभा असलेला माओ नव्हेच. जनतेला माओच्या प्रकृतीची शंका येऊ नये म्हणून अधिकाऱ्यांनी हुबेहूब माओसारख्याच दिसणाऱ्या त्याच्या डमीला उभे केले आहे.



या सगळ्या अफवांना माओ पुरून उरला. परंतु नुकत्याच उठलेल्या माओच्या प्रकृतीबद्दलच्याच एका बातमीला अफवा म्हणणे जरा कठीण आहे. पूर्व जर्मनीतून आलेल्या या बातमीनुसार माओची प्रकृती दिवसेदिवस खालावत असून, ती सध्या चिंताजनक आहे. माओचा उजवा हातही लुळा झाल्याची बातमी आहे. माओ नेमका कशाने आजारी आहे, याची मात्र वार्ता नाही.

कुठल्याही देशाच्या प्रमुखाच्या प्रकृतीसंबंधीची बातमी जागतिक महत्त्वाची असते. त्यातल्या त्यात ती व्यक्ती स्टालिनसारखी अथवा माओसारखी असली, की जिच्या मर्जीवर त्या देशाचे आणि पर्यायाने बऱ्याच प्रमाणात जगाचेही राजकारण वळण घेत असते– तर मग त्या बातमीला खूपच महत्त्व येते. त्यानुसार माओच्या आजाराच्या नव्या बातमीनंतर माओनंतर काय याविषयी सर्वत्र यथेच्छ चर्चा सुरू झाली आहे. माओ सध्या ७३ वर्षांचा आहे. क्रांतिपूर्वकाळात त्याने घालविलेले अनियमित आयुष्य, हालअपेष्टा आणि लाँगमार्चमध्ये घेतलेले खडतर कष्ट यांचा नक्कीच माओच्या शरीरावर परिणाम झाला असणार. एक चिनी कम्युनिस्ट पक्षाचे अध्यक्षपद आपणाकडे ठेवून इतर सर्व पदे माओने दोन-अडीच वर्षांपूर्वीच सोडली; याचेही कारण त्याची ढासळणारी प्रकृतीच. तेव्हा तब्बल ३५ वर्षे चिनी कम्युनिस्ट चळवळ आपल्या ताब्यात ठेवणारा, जागतिक कम्युनिस्ट चळवळीत फूट पाडून कम्युनिझममध्ये स्वतःचा एक नवाच पंथ निर्माण करून जागतिक राजकारणाला एक वेगळीच कलाटणी देणारा माओ-त्से-तुंग इतक्यात मृत्युमुखी पडला, तर त्यामुळे जागतिक राजकारणात खरोखरच काही बदल होतील किंवा काय, हे पाहणे जरूरीचे आहे.

स्टालिन मेल्यानंतर ५ वर्षांच्या आत रशियाच्या परराष्ट्रीय धोरणात महत्त्वाचे बदल घडून आले आणि थंड्या युद्धाची तीव्रता कमी झाली. १० वर्षांच्या आत तर परिस्थिती पूर्णपणे बदलली आणि रशियालाही युद्ध नको, शांतताच हवी असे

जगातल्या बहुतेक राष्ट्रांना पटू लागले. माओ मेल्यानंतर अशाच तऱ्हेचे क्रांतिकारक बदल चीनच्या परराष्ट्रीय धोरणात घडून येतील, अशी खोटी आशा बऱ्याच राजकारण्यांना लागून राहिली आहे. परंतु परिस्थितीचा साकल्याने विचार करता माओ मेल्यानंतर चीनही रशियाच्याच मार्गावर जाईल, अशी अपेक्षा करणे किती चूक आहे हे कळून चुकेल.

पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्टालिन जसा रशियाचा अनभिषिक्त सम्राट होता, तसा माओ नाही. स्टालिनच्या बरोबरीचे जबाबदारीने त्याला अडविणारे रशियन कम्युनिस्टात त्या वेळी कुणी नव्हते. जे होते त्यांचा पक्का बंदोबस्त करून टाकण्याची चोख व्यवस्था स्टालिनने करून ठेवली होती. त्यामुळे रशियाचे धोरण म्हणजे स्टालिनचे धोरण, अशी जी समजूत होती, ती फारशी चूक नव्हती.

माओची परिस्थिती तशी नाही. चिनी धोरणावर त्याचा असामान्य प्रभाव असला तरी त्याच्या बरोबरीचे, किंबहुना चुह तेहसारखे त्याहूनही वयस्कर असे कितीतरी चिनी नेते अद्यापि राजकारणात आपले स्थान टिकवून आहेत. एवढेच नव्हे तर वजन टाकून आहेत. लाँगमार्चमध्ये त्याच्या बरोबरीने हिंडलेले व माओवर संपूर्ण विश्वास टाकून असलेले कित्येक नेते अद्याप आहेत. तेव्हा चिनी धोरणांचा मूळ गाभा माओच्या मेंदूतून निघत असला तरी त्या धोरणांना त्या त्या क्षेत्रात विशिष्ट रूप देण्याची कामगिरी माओभोवतीचे हे वलयच करीत असते. त्यामुळे चिनी जनतेबद्दल जरी सांगता येत नसले तरी कम्युनिस्ट चळवळीच्या शिस्तीत वाढलेल्या चिनी नेत्यांमध्ये मात्र ढोबळ धोरणाबाबत निश्चितच एकवाक्यता असली पाहिजे. माओ मेल्यानंतर ती एकाएकी मोडून पडेल हे कमी संभवते.

शिवाय स्टालिनने जशी मरेपर्यंत सत्तेची सर्व सूत्रे आपल्या मुठीत घट्ट पकडून ठेवली होती, तसे माओचे नाही. राष्ट्राचे अध्यक्षपद त्याने केव्हाच सोडून दिले आहे आणि सध्या फक्त कम्युनिस्ट पक्षाचे अध्यक्षपद त्याने स्वतःकडे ठेवले आहे. तेव्हा माओनंतर धोरणात काही बदल घडायचा असता तर त्याची नांदी, किंबहुना तशी लक्षणे आजच दिसली असती. निदान चिनी नेत्यांतील मतभेदाच्या बातम्या तरी त्याबाबतीत कुशल असणाऱ्या पाश्चात्त्य वार्ताहरांनी आतापर्यंत केव्हाच पाठविल्या असत्या. पण तसे काही दिसत नाही. ताज्या घटनांवरून जर काही निष्कर्षच काढायचे झाले तर माओच्या मृत्यूनंतर जो क्रांतिकारक बदल काहीजण अपेक्षितात, त्याच्या बिलकुल विरुद्ध दिशेनेच बदल झाला तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. इतक्या घाईने निष्कर्ष काढणे चुकीचे होईल; पण अंदाजच करावयाचा असेल तर माओच्यानंतर चिनी धोरणात बदल व्हायचाच असला तर चीनची वृत्ती मृदू होण्याऐवजी ती अधिक कठोर होईल, असेच म्हणावे लागेल. चीनचा संरक्षणमंत्री मार्शल लिन पियाओ याने काही महिन्यांपूर्वी प्रसिद्ध केलेला जागतिक विजयाचा जाहीरनामा आणि चिनी परराष्ट्रमंत्री चेन यी यांची वेळोवेळची वक्तव्ये

पाहिली, की याच तर्काला पुष्टी मिळते.

रशियन गोटात मात्र एक आशा फार प्रकर्षाने आढळते, की माओच्या मृत्यूनंतर चीनचे परराष्ट्रीय धोरण अधिक कठोर बनो, की मृदू बनो, परंतु चीनशी पूर्ववत मैत्री स्थापन करण्याची एक संधी नव्याने उत्पन्न होईल. नवी संधी उत्पन्न होईल, हे खरे असले तरी त्या संधीचा विशेष उपयोग होईल, असे वाटत नाही. रशियाविषयी विशेष प्रेम असलेले चिनी नेत्यांत कुणी दिसत नाही.

ते काहीही असो; परंतु एवढे मात्र खरे, की कम्युनिस्ट-इतिहासात लेनिनच्या बरोबरीलाच माओचे स्थान राहील, हे निश्चित. स्टालिनच्या मृत्यूनंतर दहा वर्षांत त्याचे नाव पुसले गेले, तसे माओचे होणार नाही.

## ☐ अलिप्त व्हिएटनाम

साऱ्या जगाच्या चिंतेचा विषय बनलेल्या दक्षिण व्हिएटनामच्या प्रश्नाला एक वेगळीच कलाटणी मिळण्याची वेळ निश्चितपणे जवळ येऊन ठेपली आहे. दक्षिण व्हिएटनाममधील बौद्धांनी पुन्हा एक जोराची चळवळ सुरू करून सध्याचे जनरल नगुयेन कांओ कीचे लष्करी सरकार उलथून पाडून, त्या जागी नागरी सरकार स्थापण्याचा चंग बांधला आहे. दियेन दिमसकट एकूण तीन राज्यकर्त्यांना गेल्या साडेतीन वर्षांत या बौद्धांनी उलथून पाडले आहे, हे ध्यानात घेतले तर पुढील घटनांचा अंदाज बांधणे सोपे जाते. बौद्धांची ही शक्ती लक्षात घेऊनच जनरल कीने बचावाचे धोरण स्वीकारले आहे आणि येत्या पाच महिन्यांच्या आत निवडणूक घेण्याचे आश्वासन दिले आहे. परंतु बौद्धांना हे मंजूर दिसत नाही. व्हिएटनामच्या सध्याच्या परिस्थितीत तरी ज्याच्या सत्तेखाली निवडणूक होईल, तोच पुन: निवडून येईल, एवढे बौद्धांना उमगते; म्हणून निवडणुकीपूर्वीच नागरी सरकार स्थापण्याची त्यांची मागणी आहे आणि ते आपली मागणी पुरवून घेतीलच, अशी चिन्हे दिसत आहेत.

मुख्य प्रश्न असा आहे, की नव्याने सत्तेवर येणाऱ्या नागरी राज्यकर्त्यांची अमेरिकेकडे पाहण्याची कोणती दृष्टी राहील; या प्रश्नानेच अमेरिका अस्वस्थ झाली आहे. सध्याचा एकंदर रोख पाहता अमेरिकन सैन्याने व्हिएटनामच्या भूमीवरून निघून जावे, अशी बौद्धांतील एका मोठ्या गटाची मागणी आहे. नव्या सरकारने ही मागणी केली तर अमेरिकेचे काय होणार?

ही भीती मनात बाळगूनच अमेरिकेतील बऱ्याच पुढाऱ्यांनी अगोदरच व्हिएटनाममधून आपले सैन्य काढून घेण्याच्या दृष्टीने प्रचार सुरू केला आहे. व्हिएटनामच्या गुंतागुंतीतून सहीसलामत सुटण्याचा अमेरिकेला हा एकमेव मार्ग आहे. काही राजकारणपटू पंडितांच्या मते तर असे करण्याने दुसरीही एक गोष्ट साध्य होणार आहे.

[ पृष्ठ ५७ वर चालू ]

# सरस्वतीच्या प्रांगणातील धिंगाणा

मो. ग. तपस्वी

दिल्ली

आज कुठेही असंतोष असला म्हणजे तो व्यक्त करण्यासाठी विद्यार्थी पुढे सरसावत असतात किंवा मी म्हणेन, विद्यार्थ्यांच्या ज्वालाग्राही स्वभावाचा लाभ दुसरे स्वार्थी लोक व पक्ष उठवीत असतात. स्वातंत्र्योत्तरकाळातील दीड–दोन दशकांचा काळ पाहिला तर आपल्या भावना आरडाओरड व नासधूस करून जगजाहीर करण्याची प्रवृत्ती विद्यार्थ्यांमध्ये वळावलेली दिसते. अनेक नामवंत शिक्षणतज्ज्ञ, राजकीय नेते आणि विद्यार्थी-संघटनांचे प्रमुख यांनी या प्रश्नाचा ऊहापोह चालवला आहे. परंतु अद्याप कुणालाही या असंतोषावर व त्यापोटी सरस्वतीच्या पवित्र प्रांगणात घातल्या जाणाऱ्या या धिंगाण्यावर रामबाण तोडगा सापडलेला नाही. यावर झालेली सर्व साधकबाधक चर्चा विचारात घेतल्यावरही असे म्हणणे भाग आहे, की या प्रश्नाचा विचार त्याला सर्व समस्यांपासून तोडून, वेगळा काढून, मग करता येणार नाही. हा प्रश्न सर्वस्पर्शी अशा समाजसुधारणेच्या समस्येशी अभिन्नपणे निगडित आहे.

## उसळता समूह

दिल्लीत निरनिराळ्या कामानिमित्त अनेक शिक्षणतज्ज्ञ येत असतात. आपल्या महाराष्ट्रातील शिक्षणतज्ज्ञांची वर्दळ आता दिल्लीतही वाढू लागली आहे. अनेक नामवंत शिक्षणतज्ज्ञांशी त्या निमित्ताने या विषयावर विचारविनिमय करण्याची संधी मी नेहमीच साधत आलो आहे. त्या सर्वांनाही सरस्वतीच्या प्रांगणा-

तील हा धिंगाणा, आपल्या व्यापक सामाजिक समस्येचा एक भाग असल्याचे मान्य असल्याचे मला आढळले. असे लिहिताना विद्यार्थी अगदी निर्दोप आहेत, असे मला मुळीच म्हणायचे नाही. पण विद्यार्थी हा अपरिपक्व, परंतु अत्यंत संस्कारक्षम, विचारशील परंतु तितकाच भावनाप्रधान आणि तळमळीचा, परंतु ज्वालाग्राही, अशा स्वभावधर्माचा एक उसळता समूह आहे, हे लक्षात घेऊनच त्याच्या बेशिस्त वर्तनाचा विचार करायला हवा.

राजकारणी मंडळीही या प्रश्नाचा विचार करताना आढळतात. परवाच कलकत्ता वगैरे ठिकाणी झालेल्या दंगलींबाबत निवेदन करताना ना. शिक्षणमंत्री छागला यांनी विद्यार्थ्यांच्या वर्तनावर टीका केली. काही महाराष्ट्रीय खासदारांशी यावर चर्चा केली असता मला असे आढळले, की जो तो विरोधी पक्षांवर याचे टेपण ठेवून मोकळा होतो. परंतु या सर्वांचे बीज, स्वातंत्र्य-चळवळीच्या वेळी 'शाळा—कॉलेजे सोडून बाहेर या', 'हरताळ पाळा', अशी जी आवाहने कॉंग्रेसने विद्यार्थ्यांना केली, त्यात अंकुरले नाही का ? — असा प्रश्न टाकला, की ही मंडळी मात्र लगेच उसळून म्हणतात, "वा, वा, असे असे कसे म्हणता ? त्या चळवळीची तुलना आजच्या चळवळीशी कशी करता येईल ? तो स्वातंत्र्याचा प्रश्न होता, परकी सरकारविरुद्ध निदर्शने करण्याचा प्रश्न होता. आता सरकार आपले...." अर्थात ही नवी निष्ठा विद्यार्थ्यांत रुजवायला स्वातंत्र्यानंतर कोणते प्रयत्न झाले, या प्रश्नाला मात्र ही मंडळी चोख उत्तर देऊ शकत नाहीत. कॉंग्रेस अध्यक्ष श्री. कामराज यांच्याशी या प्रश्नावर एकदा चर्चा करण्याची संधी लाभली होती. ते म्हणाले होते, "विद्यार्थ्यांना तसे पाहिले तर कुठल्याच राजकीय पक्षाबाबत आकर्षण नाही. कॉंग्रेसबाबतसुद्धा नाही. तेव्हा त्यांच्यासमोर भव्य, उदात्त, राष्ट्रीय असे नवे आदर्श निर्माण केले पाहिजेत आणि हे कार्य पक्षकारणाच्या पलीकडे जाणारे आहे...."

## पक्षनेते

राजकीय पक्षनेत्यांच्या दृष्टीतून या प्रश्नाकडे पाहण्याचा प्रयत्न करताना असे आढळते, की ही मंडळी परोपदेशे पांडित्य करायला सोकावलेली असतात. विद्यार्थ्यांनी अमुक करावे, तमुक करावे, वगैरे मंत्र यांना कसे तोंडपाठ असतात; पण आज भारतातील राजकीय पक्षकारणात रुजलेल्याच नव्हे, तर चांगल्या माजलेल्या राजकीय बेशिस्तीत विद्यार्थ्यांच्या या धिंगाण्याची मुळे आहेत हे कटू सत्य या मंडळींना मान्य करवत नाही. ज्या समाजात आजची मुले राहतात, त्या समाजजीवनाच्या कुठल्या थरात, कुठल्या पातळीवर आज शिस्त आहे ? ग्रामपंचायती आणि नगरपालिकांत, कायदेमंडळांत आणि संसदेत लोकप्रतिनिधी आणि आजच्या राजकीय भाषेत ज्यांना भारत—भाग्यविधाते म्हटले जाते, ती मंडळी काय धुडगूस घालतात ते आपण पाहत आहोत, वाचीत आहोत. कालपर्यंत अत्यंत आदरणीय मानले जाणारे नेते लोक-

संस्थांमध्ये वैफल्यापोटी जो तमाशा करीत आहेत, मार्शलना बोलावून धक्के मारून घालवून घेण्याची पाळी स्वत:वर ओढवून लोकमानसातील आपले उरलेसुरले प्रतिबिंबही भंगून तडून टाकीत आहेत, ते पाहिल्यावर कोणता विद्यार्थी त्यांच्या उपदेशाला मान देणार ? हे नेते करतात ते मूर्खपणाचे आहे, एवढा सुविचार जागा होण्यांइतके शिक्षण, संस्कार आणि तारतम्य विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हायचे आहे. माकडचेष्टांचे अनुकरण करण्याची प्रवृत्तीच त्यांना वाहवून नेणार.

## गुरुजन

राजकीय नेत्यांच्या आचरणाचा आदर्श हा असा होत चालला आहे आणि विद्यार्थ्यांचे गुरुजन किंवा शिक्षकवर्ग? ते मुलांपुढे कोणता आदर्श ठेवीत आहेत ? आजचा शिक्षक चळवळ योजण्यात, आपल्या पगारवाढीच्या व गाऱ्हाणी दूर करून घेण्याच्या मागण्यांसाठी आज निदर्शने करण्यात गुंतला आहे. या गुरुजनांतही आजच्या विद्यार्थ्यांना शिस्त अभावानेच दिसते. उलट बेशिस्त वर्तनासाठी फार मोठे बक्षीस ठेवले आहे आणि ते पटकावण्यासाठी मोठ्या अहमहमिकेने ही मंडळी वागत आहेत, असेच दृश्य सामान्यपणे आढळून येते. यामुळे विद्यार्थिवर्गाच्या मनात गुरुजनांबाबत अनादर निर्माण होतो आणि थोडीशी चिथावणी मिळताच कुठल्याही थराला जाणारी गुंडगिरी करण्याकडे त्यांचा कल झुकतो. विद्यादान करण्याऐवजी शिक्षकमंडळी आपल्या विद्यार्थ्यांना व शिष्यांना 'भलतेच दान' देण्याच्या भरीस पडली आणि ते दान उलटे पडताच भर रस्त्यात शिष्याकडून चपलांनी बडवली गेली, ही दृश्ये दिसण्याचे अद्यापही कमी कुठे झाले आहे ?

शिक्षकांबाबतचा विचार आणखीही एका पैलूतून करायला हवा. शाळा-कॉलेजांतील अनेक शिक्षक निव्वळ प्रमाणपत्रधारी असतात. आपल्या हाताखाली देण्यात आलेल्या मुलामुलींचा बौद्धिक आणि आध्यात्मिक विकास घडवून आणण्याची त्यांना पर्वाच नसते. अधूनमधून विद्यार्थ्यांची बेशिस्त भडकल्याचे जे प्रकार आपल्याला सारखे दिसत असतात, ते आमच्या उगवत्या पिढीला अभ्यासात स्वारस्य, प्रेम व आनंद वाटत नसल्याचे प्रतीक आहेत. कारण असे पाहा, आपल्याला प्रिय वाटणारी, मनापासून आवडणारी वस्तू कोणीही झाला तरी इतक्या सहजासहजी अशी लाथाडून जाईल का ? मुलांना अभ्यासात व शिक्षणात गोडी वाटत असेल तर शिक्षण टाकून ते धिंगाणा घालत बसतील का ? तेव्हा अभ्यासाबाबतची, शिक्षणाबद्दलची ही बेपर्वा किंवा उदासीन प्रवृत्ती चुकीचे शिक्षक निवडले जात असल्यामुळे निर्माण होत नसेलच असे कसे म्हणावे ? आज देशात फारच थोड्या शिक्षणसंस्थांतून तरुण मनाला योग्य वळण लावण्याचे खरेखुरे प्रयत्न होत असतात आणि विद्यार्थिवर्गातील वाढत्या असंतोषाचे तेही एक महत्त्वाचे कारण आहे.

हा मुद्दा आणखी थोडा स्पष्ट करण्यासाठी भारत सरकारने नेमलेल्या शिक्षण-

मंडळाने ( Education Commission ) केलेल्या एका पाहणीचे काही बोलके आकडे देतो. पदवीप्रमाणपत्र कसे जुजबी ठरते, हे वर दिलेच आहे. पण तरीही आपल्या प्राथमिक शाळांतून १·८ टक्के शिक्षक पदवीधर आहेत तर मॅट्रिकही नसलेल्यांचे प्रमाण ५५ टक्क्यांहून जास्तच आहे. मिडल-स्कूलमध्ये मॅट्रिक न झालेल्या शिक्षकांचे प्रमाण ४४ आणि पदवीधर नसलेल्यांचे ५० टक्के म्हणजे पदवीधर शिक्षक फक्त ६ टक्के आहेत. आणि हायस्कुलांत किंवा हायर सेकण्डरी शाळांत पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्यांची टक्केवारी फक्त ५० च असून उरलेल्या ५० टक्क्यांत १० टक्के लोक मॅट्रिकही नसलेले आहेत. शिक्षकांच्या निवडीचे हे चित्र इतके बोलके आहे, की त्यावर भाष्य करण्याची आवश्यकता उरत नाही.

अर्थात आजचा शिक्षक अनिश्चिततेच्या दुष्टचक्रात सापडलेला आहे, हेही खरेच. वर्गातील नित्य कामाखेरीज नैमित्तिक अशा किती तरी बहिःशाल कार्यक्रमांची जबाबदारी त्याच्यावर असते. त्यामुळे त्याचे कौशल्य कसे उथळ व पसरट होत जाते, त्याला उंची अशी लाभतच नाही, लाभावी असे त्याला वा त्याच्या वरिष्ठांनाही वाटत नाही. त्यातच शिक्षकीपेशाची समाजात जी सर्वसाधारण उपेक्षाच होते, तिच्यामुळेही त्याचा भ्रमनिरास होत जातो व या भ्रमनिरासातून एक प्रकारची वैफल्याची भावना त्याच्या मनात मूळ धरत असते. यामुळे आज समाजातील खरे प्रतिभावंत लोक, प्रज्ञावंत मंडळी ही या अध्यापन-व्यवसायाकडे वळेनाशी होत आहेत. त्यात जखमेवर मीठ चोळण्याचे काम निरानिराळे मंत्री करीत असतातच. शिक्षकांच्या एका परिषदेत तेव्हा केन्द्रीयमंत्री असलेले श्री. हुमायून कबीर यांनी असाच एक झणझणीत वाग्बाण शिक्षकांवर सोडून दिला झाले. ते म्हणाले, " आजचा शिक्षक हा विद्यार्थ्यांना मारून टाकू शकत नाही, त्यांना प्रेरणा देऊन त्यांचे स्फूर्तिकेद्र बनू शकत नाही, कारण स्वातंत्र्य-चळवळीच्या काळात राष्ट्राच्या हाकेला शिक्षकाने ' ओ ' दिली नाही. "

## राजकीय पक्ष

राजकीय नेत्यांबाबत वर उल्लेख केला आहे. आता राजकीय पक्षांची विचारसरणी पाहा. आमच्या शिक्षणसंस्थांतून सर्व राजकीय पक्षांनी आपले अड्डे स्थापन केलेले आहेत. त्यांचे हस्तकही या संस्थांतून आहेत. या हस्तकांना त्या त्या अड्ड्यातील मुले आपला नेता मानतात. प्राचार्य किंवा मुख्याध्यापक यांच्यापेक्षाही या राजकीय पक्ष-हस्तकांना ती जास्त मान देतात. खुद्द काँग्रेसदेखील याला अपवाद नाही. यामुळे प्राचार्य किंवा मुख्याध्यापक कुणालाही शासन करायला घाबरतो. कारण त्याला भीती वाटते, की या ' छोट्या दादांच्या मार्फत ' कुणी तरी जाऊन मुख्यमंत्र्यांकडे नाही तर शिक्षणमंत्र्यांकडे माझी तक्रार करायचा. यामुळे मुलांच्या उद्दण्ड-

पणाला व्हावे तसे शासन होत नाही. ती म्हणूनच शेफारतात, अनावर होतात दुसरी गोष्ट अशी, की सार्वजनिक जीवनात ज्यांच्याकडे आदर्श म्हणून पाहता येईल· असे आजच्या तरुणांपुढे काहीच नाही. अगदी फाटका आणि कवडीमोलाचा माणूस पाहता पाहता भलताच उच्च पदावर पोचतो आहे. आजचा समाज अशाच समाजद्रोही व स्वार्थी व्यक्तींनी बुजबुजला आहे, असे दृश्य या तरुण-मंडळींना आज दिसते आहे. असली ही समाजकंटक मंडळी आज देव मानली जात आहेत, त्यांच्या खुर्चीला सिंहासनाचा दर्जा लाभतो आहे आणि आपले शिक्षक व प्राध्यापक वगैरे गुरुजन या नव्या देवांपुढे अजीजीने हात जोडून उभे आहेत, हे दृश्य पाहिल्यानंतर विद्यार्थ्यांनी कुणाचा आदर्श मानावा ? कुणाचे अनुकरण करावे ?

कॉलेजातील वातावरणात आज बेपर्वाई, वैताग, असंतोष, आढळून येतो. यामुळे विद्यार्थी जर चवडव्या असला तर तो उफाळतो, उसळतो आणि दुबळा असला तर 'जाऊ दे, आपल्याला काय त्याचे' म्हणून विस्मृतीत बुडून जातो. समाजजीवनाच्या काळवंडलेल्या प्रतिमाच याला कारणीभूत आहेत. दुसरे असे, की आजचा विद्यार्थी अनिश्चिततेच्या वातावरणात कसा तरी भटकतो आहे. कुठेतरी फरफटत चालला आहे. आपण कोणती भाषा शिकावी, ते त्यास उमगत नाही. भविष्य कसे आकारावे शाकारावे, ते त्याला समजत नाही. त्याच्या लेखी शिक्षणावर इतका पैसा आणि शक्ती खर्च करूनही भविष्य अंधकारमय आहे. शिक्षण घेतले असो नसो, पात्रता असो नसो, अन्य कारणास्तव नोकऱ्यांत जागा राखीव ठेवण्याच्या धोरणामुळे आजचा हुशार विद्यार्थी जास्तच वैतागतो आहे, उबगतो आहे. त्यातच "सरकारी नोकरीसाठी पदवी ही अनिवार्य पात्रता नाही." अशासारख्या वेळोवेळी होणाऱ्या सरकारी घोषणांची भर पडन त्याची अनिश्चितता वाढते आहे. या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणून आजचा विद्यार्थी केवळ पदवी–प्रमाणपत्र किंवा नोकरी पदरी पडावी एवढ्याच एका भावनेने कॉलेजात जातो आहे. अभ्यासाकरता अभ्यास ही जाणीवच उरलेली नाही

## विद्यापीठे

परंतु सरस्वतीच्या प्रांगणातील या धिंगाण्याचे खापर विद्यार्थी किंवा त्यांचे शिक्षक यांच्या माथी फोडणे सोपे असले तरी आपली विद्यापीठेही त्यातून वगळता येणार नाहीत. आमची विद्यापीठे म्हणजे काही 'स्वर्ग-मीनार' नव्हेत. बाहेरच्या समाजातील मूल्यांचा परिणाम विद्यापीठांतील विद्यार्थ्यांवरही होणारच. आज जुनी मूल्ये बदलत आहेत. तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे सामाजिक जुनी मूल्ये जात आहेत. परंतु नव्या भाव-नेशी नवी मूल्ये त्यांच्या जागी अद्याप पेरण्यात आलेली नाहीत. तेव्हा विद्यार्थिवर्गाच्या मनातील वैतागाची चिकित्सा आणि उपचार करताना या संक्रमणावस्थेची जाण व समज ठेवली पाहिजे. बिकट आर्थिक परिस्थिती आणि बेकारीची कृष्णछाया यांचाही विद्यार्थ्यांच्या विद्यापीठांतील आणि त्याबाहेरील आचरणावर नक्कीच परिणाम होत

असतो. विद्यापीठांत होणारी बेसुमार गर्दीही या समस्येला आपल्यापरी हातभार लावीतच असते. ज्यांना विद्याध्ययनाची पार्श्वभूमीच नाही, अशी कितीतरी विद्यार्थिमंडळी आपल्या विद्यापीठातून आज पाहायला सापडतात. त्यामुळे त्यांना शिक्षणाचे उद्दिष्ट त्याच्या मर्मासकट नीट उमगू शकत नाही. शहरी भावनेचे पीक ज्या वारेमाप गतीने फोफावते आहे, तिच्यामुळे आजच्या विद्यापीठ–विद्यार्थ्यांचे सामाजिक अधिष्ठान नष्ट होत आहे. आजचे नेतृत्व त्यांना स्फूर्ती द्यायला असमर्थ ठरल्यानंतर त्यांच्यासमोर आदर्शच उरला नाही, ध्येयच राहिले नाही. अशा आदर्शहीन आणि ध्येयशून्य विद्यार्थिवर्गाने कुठल्याही निमित्ताने, परंतु निरुद्देश्यपणे तीव्र, जोरकस आणि क्वचित हिंसक धिंगाणा घालावयाला सुरवात केली आहे. शिक्षणसंस्थांतून सामूहिक व सामाजिक भावना वाढीस लावणाऱ्या सुखसोयींचा अभाव हेही विद्यार्थ्यांच्या धिंगाण्याचे एक मुख्य कारण आहे.

## उपाययोजनेचे स्वरूप

सरस्वतीच्या प्रांगणातील धिंगाण्याचे अशा प्रकारे चतुर्विध निदान केल्यानंतर आता त्याचा उपचार करणे सुलभ होणार आहे. नुकतेच श्रीनगर येथे राज्यांच्या शिक्षणमंत्र्यांचे एक सम्मेलन होऊन गेले आहे. या विषयावर त्यांनीही बराच खल केला. पण अखेर मंत्री हे राजकारणीच असल्यामुळे त्यांनी डोंगर पोखरून केवळ एका शिफारशीचा उंदीरच बाहेर काढला. तो असा, की विद्यार्थ्यांना सक्रिय राजकारणापासून दूर ठेवावे. बहिःशाल कार्यक्रमात त्यांना सतत गुंतवून ठेवावे आणि शाळा–प्रवेशाचे वय वाढवावे. या शिफारशीला अजीबात खोली नाही, हे सांगणे नकोच. सर्वाआधी समाज बदलला पाहिजे, त्यांचे राजकीय जीवन हे सचोटीचे आणि सुसंस्कृतपणाचे बनवले पाहिजे. आधी वडीलधाऱ्या मंडळींनी शिस्तीत वागले पाहिजे आणि संपूर्ण समाजजीवन शिस्तबद्ध केले पाहिजे. तसे केल्याशिवाय, आपण वडीलधाऱ्या मंडळींनी तसे आचरल्याशिवाय, मुलाबाळांकडून त्याची अपेक्षा करताच येणार नाही. शिस्तबद्ध समाज निर्माण करण्यापुरते अधिक नैतिक शिक्षण दुसरे कोणते असणार ?

या प्रयत्नात विद्यार्थ्यांनाही जास्तीतजास्त जवळ केले पाहिजे. यासाठी कॉलेजे व विद्यापीठे यांतून विद्यार्थी–न्यायालये स्थापन करता येतील. बेशिस्त वर्तनाच्या विद्यार्थ्यांना या त्यांच्याच न्यायासनापुढे उभे करता येईल आणि त्यांच्यातीलच रामशास्त्र्यांकरवी त्यांना शासन करविता येईल. उपकुलगुरू वा प्राचार्य यांच्याकडे अंतिम दाद मागता येईल; परंतु हे अधिकारी नामधारीच राहावेत याची दक्षता घ्यायला हवी. कुठल्या ना कुठल्या स्वरूपात विद्यापीठ-संस्थांमधून प्रत्येक पातळीवर विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधींचा निकट संबंध जोडला पाहिजे आणि शिक्षण व कारभार

[ पृष्ठ ५७ वर चालू ]

# विचार धारे

समीर

## ● सरकारी सूचनाविभागाचे कर्तव्य

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पत्रकार व भारतातले ब्रिटिश राजदूत श्री. जॉन फ्रीमन यांनी परवा दिल्लीच्या एका कॉलेजात "आंतरराष्ट्रीय वार्ता-प्रसार" या विषयावर आपले विचार मांडले. आंतरराष्ट्रीय सद्भावना वाढविण्याच्या कामी आंतरराष्ट्रीय वार्ता-प्रसाराचे कार्य फार महत्त्वाचे आहे, असे सांगून ते म्हणाले, "सर्वत्र जगात वार्ताप्रसाराची आधुनिक साधने उपलब्ध झाल्याने कोठेही घडलेली घटना आपल्याला ताबडतोब व तपशीलवार कळते. यामुळे आंतरराष्ट्रीय सौहार्दात भर पडायला पाहिजे, पण ती पडतेच असे नाही." शिवाय नवीन तंत्रांचे काही तोटेही आहेत. वार्ताप्रसाराचे काम हल्ली इतक्या जलद होऊ शकते, की त्यामुळे एखाद्या क्षुल्लक गोष्टीला अवास्तव महत्त्व प्राप्त होऊ शकते.

सरकारी सूचना-विभाग आणि स्वतंत्र वृत्तव्यवसाय हे एकमेकांवर अवलंबून असतात. "एकमेकांवर लक्ष ठेवणे हे त्यांचे कर्तव्य आहे. परस्पर सहाय्याशिवाय दोघांनाही आपले काम करता येणार नाही." गंभीर वृत्तव्यवसायाचे परमोच्च ध्येय सत्याचा शोध हे होय. लोकशाही समाजातल्या जनतेला स्वतःचे कार्य नीट करण्याची व आपल्या नेत्यांना उत्साहित करण्याची क्षमता प्राप्त व्हावी म्हणून ज्ञानदान आणि मार्गदर्शन करणे हे पत्रकाराचे मूलभूत सामाजिक कर्तव्य आहे. पण हल्ली सरकारी पसारा इतका आवाढव्य आणि गुंतागुंतीचा झाला आहे, की सरकारी यंत्रणा व तिच्यावर नजर ठेवणारा वृत्तव्यवसाय यांच्यात एक भिंत निर्माण झाली आहे त्यामुळे सर्व आधुनिक देशांत सरकारने स्वतःचा सूचना-विभाग उभारला आहे. या विभागाचे तीन मुख्य उद्देश असतात. वार्ताहरांच्या ससेमिऱ्यापासून सरकारी नोकरांचे रक्षण, सरकारचे किंवा देशाचे शक्य तेवढे अनुकूल चित्र रंगविणे आणि योग्यरीतीने आपले सार्वजनिक कर्तव्य पार पाडू पाहणाऱ्या वार्ताहराला मदत करणे.

## ● आधुनिक वृत्तव्यवसायाच्या स्वातंत्र्यावरील मर्यादा

अमेरिकन वृत्तपत्रे सरकारवर अवलंबून आहेत, इतकेच नव्हे, तर दोघांना सतत परस्पर सहाय्य करावे लागते, असे आश्चर्यकारक मत परवा जोसेफ क्राफ्ट नावाच्या अमेरिकन पत्रकाराने दिल्लीत भाषण करताना काढले आणि ते सिद्ध करण्यासाठी चार कारणे सांगितली.

पहिले म्हणजे ज्या असंख्य विषयांवर हल्ली वृत्तपत्रांत माहिती द्यावी लागते. त्यांच्यावर वृत्तपत्रीय लेखन करण्यासाठी त्याचे तांत्रिक ज्ञान मिळविणे आवश्यक झाले आहे व ते मिळविण्यासाठी कुणावर तरी अवलंबून राहणे पत्रकाराला अपरिहार्य झाले आहे. संरक्षणाचे उदाहरण घ्या. अमेरिकेचा संरक्षण-कार्यक्रम इतका मोठा आहे, की राष्ट्रीय उत्पन्नाचा एक-दशांश भाग त्यावर खर्च होतो; पण संरक्षणाच्या ज्या शास्त्रीय तत्त्वांवर हा कार्यक्रम आधारलेला आहे, त्यांचे आकलन पत्रकारांच्या आवाक्याबाहेरचे असते. 'स्पेस टेक्नॉलॉजी 'च्या क्षेत्रात तर ही परिस्थिती विशेष जाणवते. पत्रकार अशा प्रसंगी सेनाधिकाऱ्यांनी उठविलेल्या माहितीवर अवलंबून राहिले नाहीत तर त्यांचा पत्ताच लागायचा नाही.

दुसरे कारण म्हणजे सर्वच गोष्टींचा व्याप आता अवाढव्य वाढला आहे. विसाव्या शतकाच्या सुरवातीला एखादा पत्रकार जातीने परिस्थितीची पाहणी करण्यासाठी दौरा काढू शकत होता. आता ते शक्य नाही. त्यामुळे वार्ताहराला बहुधा एखाद्या तज्ज्ञावर अवलंबून राहणे भाग पडते व बहुतेक तो तज्ज्ञ सरकारी माणूस असतो.

तिसरे कारण म्हणजे अमेरिकेच्या दृष्टीने जगातल्या ज्या देशांना आता महत्त्व आले आहे, त्यांच्या माहितीसाठी तज्ज्ञ आणि त्याने मिळविलेले ज्ञान या गोष्टी आता अत्यावश्यक झाल्या आहेत. उदाहरणार्थ, भारत आणि इंडोनेशिया हे देश आता कुठले तरी दूरचे व चमत्कृतिपूर्ण देश राहिले नसून, या देशात घडणाऱ्या घटनांना अमेरिकेच्या दृष्टीने महत्त्व आले आहे. एखादी नाट्यमय राजकीय घटना घडत असताना ती घडविणाऱ्या व्यक्तींचे परस्परसंबंध नेमके काय आहेत, हे समजणे पत्रकाराला शक्य नसते. " उदाहरणार्थ, मला स्वतःला कामराज व श्रीमती इंदिरा गांधी किंवा सुकार्नो व सुहार्तो यांचे संबंध काय आहेत, हे कळत नाही."

चौथे कारण म्हणजे आता सरकारलाच वृत्तपत्रांची जाणीव होऊ लागली आहे. त्यामुळे ते अस्पष्ट विधाने करते व ती समजायला तज्ज्ञाची मदत घ्यावी लागते. उदाहरणार्थ, एकदा साम्यवादी चीनच्या सरकारने म्हटले की, जोपर्यंत " कळसूत्री सरकारे " ('पपेट रेजीम्स') काढून टाकण्यात येत नाहीत, तोपर्यंत आपण यूनोत प्रवेश करण्याचा विचार करणार नाही." वरवर याचा अर्थ फॉर्मोसा असा होतो पण अधिक चौकशीअंती दिसले, की चिनी बायलोरशिया व युक्रेनचा उल्लेख करीत होते. कारण त्यांनी " साम्राज्यवादी कळसूत्री सरकारे " असे म्हटले नव्हते.

●



# ग्यानबाचं गुऱ्हाळ

## ▢ महाराष्ट्रात चार नवी नभोवाणी–केंद्रे :

चौथ्या पंचवार्षिक योजनेतली सर्वांत महत्त्वाची बातमी वाचलीत की नाही ? या आपल्या महाराष्ट्रात आणखी चार नभोवाणी केंद्रे स्थापन होणार आहेत असे म्हणतात. सध्या मुंबई, पुणे आणि नागपूर या तीन ठिकाणी ही 'वाणी–केंद्रे' आहेतच. सांगलीला उपकेंद्र आहे. म्हणजे फक्त प्रक्षेपण करणारे. परभणीला उप-केंद्राची तयारी चालू आहे. आता या दोन्ही ठिकाणी तर स्वतंत्र नभोवाणी केंद्र होणार, पण त्याशिवाय औरंगाबाद आणि जळगाव येथेही दोन नवी केंद्रे होतील. जळगावचे केंद्र तर पैलवान म्हणजे जास्त शक्तीचे केंद्र होणार आहे म्हणे. परवा लोकसभेत प्रश्नोत्तराच्या वेळी नभोवाणीखात्याच्या उपमंत्र्यांच्या मुखातून ही आकाशवाणी झाली. ती ऐकलीत ना तुम्ही ?

महाराष्ट्रात आणखी चार नभोवाण्या होणार, हे वृत्त आनंददायक नाही, असे कोण म्हणेल ? मला स्वतःला तर हर्षवायूच होण्याची वेळ आली होती. पण चौथ्या पंचवार्षिकातली ही भानगड आहे. शिवाय मंत्र्यांनी दिलेले ते एक आश्वासन आहे, हे वेळेवर लक्षात आल्यामुळे काही विपरीत परिणाम झाला नाही. बाकी झाली ही केंद्रे तर उत्तमच. एकटया पुणे, मुंबई आणि नागपूरच्याच लोकांनी काय म्हणून प्रत्येक गोष्टीचा मक्ता घ्यावा ? रोजच्या रोज कानठळ्या बसविणारे चित्रपट–संगीत, किंकाळ्या फोडायला लावणाऱ्या श्रुतिका आणि अंगावर काटे आणणारे विनोदी कार्यक्रम हे काय फक्त पुणेकरांनी आणि मुंबईकरांनीच ऐकावेत आणि तोंड वाकडे करावे ? हा छळवाद काय त्यांनीच एकटयांनी सोसावा ? रोजची ही डोकेदुखी काय त्यांच्याच फक्त वाटयास यावी ? बाकीच्या महाराष्ट्रात काय माणसे नाहीत ? या लोकशाहीच्या राज्यात त्यांना काहीच का अधिकार नाहीत ? डोकेदुखीचा, किंकाळ्या मारण्याचा, तोंड वेडेवाकडे करण्याचा अधिकार त्यांनाही आहेच. इतके दिवस झाला तो अन्याय झाला. पुण्याला, मुंबईला किंवा नागपूरला केंद्र असले तरी ते फार लांब ऐकू जात नव्हते आणि त्यामुळे इतर ठिकाणच्या लोकांची फारच गैरसोय होत होती. त्यांना फक्त ऐकू येत होती ती नभो-वाणीची खरखर. रेडिओचे खाकरणे, नुसती खरखर किंवा कोठले तरी अस्पष्ट चार

शब्द ऐकू आले म्हणजे डोके दुखण्यास साह्यच होते, असा जर कुणाचा समज असेल तर तो चुकीचा होय. नुसते खाकरणे ऐकून काही कुणी कानांत बोटे घालणे शक्य नाही. श्रुतिकेतील रडारड स्वच्छ ऐकू आल्याशिवाय किंकाळ्या मारण्याची इच्छा होणे अशक्य आहे. पुण्या–मुंबईच्या लोकांचे ठीक आहे. त्यांना नभोवाणीचे कार्यक्रम स्वच्छ ऐकू येतात. त्यामुळे आपल्या घरात रेडिओ पटकन बंद करण्यात जो काही आनंद आहे, तो त्यांना मिळतो. पण बाकीच्या मंडळींना तो कसा मिळणार ? त्यासाठी ठिकठिकाणी स्वतंत्र नभोवाणी केंद्रच हवे. केंद्र सरकारने नवीन चार ठिकाणी स्वतंत्र नभोवाण्या देण्याचे आश्वासन दिले, हे फार छान झाले. रेशनिंगचे अन्न खाऊन आणि या वाढत्या महागाईच्या काळात जगूनही कुणी एखाद्या निर्लज्ज माणसाने आपला चेहरा हसरा ठेवण्याचा खटाटोप केलाच, तर त्याला नभोवाणीचे कार्यक्रम कुठेही ऐकण्याची उत्कृष्ट सोय झाली. तो त्याने एकदा का ऐकला, की पुन्हा म्हणून तो हसण्याचा निलाजरेपणा करणार नाही, याबद्दल माझी पक्की खात्री आहे.

या नवीन केंद्रांनी आपल्या कार्यक्रमात काही सुधारणा मात्र अवश्यमेव कराव्यात. सकाळ, दुपार आणि संध्याकाळ अशा तिन्ही वेळी एकेका पुढाऱ्याचे किमान एक तरी भाषण ठेवावे. रोज तीन भाषणे म्हणजे फार झाली, असे कुणाला तरी वाटेल; पण पुढाऱ्यांची संख्या गावोगाव किती प्रचंड आहे, हे लक्षात आले म्हणजे रोजची तीन भाषणे म्हणजे काहीच नव्हेत, हे तुमच्या ध्यानात येईल. कोठे काही कमी पडले तर समरगीते आहेतच. आपला देश हा शांततावादी आहे. त्यातून सध्या ताश्कंद–स्पिरिटचा बोळा राज्यकर्त्यांनी सगळीकडे फिरवलाच आहे. बोलून चालून स्पिरिटच ते, केव्हा उडून जाईल त्याचा नेम नाही. म्हणून जनतेने शांततेबद्दल प्रेम निर्माण करणे आणि युद्धाबद्दल तिरस्कार वाटायला लावणे हे काम महत्त्वाचे आहे. युद्धाबद्दल खरी चीड निर्माण करायला समरगीतांसारखा उत्कृष्ट कार्यक्रम नाही. म्हणून या नव्या केंद्रांनी भरपूर समरगीते लावावीत, अशी माझी सूचना आहे. गावोगाव कविमंडळींची संख्या अफाट आहे. त्या सगळ्यांनाच पुण्या–मुंबईच्या कार्यक्रमांत स्थान मिळणे अशक्य. त्यामुळे स्थानिक अश्राप जनतेवर ही काव्यगायने ऐकण्याचे दुर्धर प्रसंग नेहमी ओढवतात. नभोवाणी केंद्रावर ही मंडळी अडकून राहिली तर तेवढीच गावकरी लोकांची सुटका होऊन ते नभोवाणीला दुवाच दिल्याशिवाय राहणार नाहीत. नभोवाणीचा त्या त्या गावांना आणखीही एक फायदा होईल. गावात कोठे काही प्रचंड स्फोट, अपघात, दैवी आपत्ती वगैरेसारखे प्रसंग आले ! (आणि ते मधूनमधून येणारच) तर नभोवाणीवरून त्याचा इशारा खूप आधी किंवा उशिरा देऊन गावातल्या मंडळींची तारांबळ उडवून देता येईल आणि खूप मौजच उडवता येईल. स्थानिक अभिनयपटूंनाही आरडाओरडा करण्यास बराच वाव मिळेल. सांगली, परभणी, औरंगाबाद, जळगाव या ठिकाणच्या

नटनटींनी किंकाळ्या मारण्याचा आणि रडारडीचा सराव आतापासूनच सुरू करावा. भावगीत–गायक–गायिकांनीही बेसूर गाण्याची मेहनत सुरू करावी यात उत्तम प्रावीण्य मिळवल्याशिवाय नभोवाणीवर कार्यक्रम होऊच शकत नाही हे त्यांनी ध्यानात घ्यावे. तसे झाले तरच ऐकणाऱ्या श्रोत्याचे डोके गरगरू लागते आणि त्यातूनच 'पत्रांना उत्तरे' हा मनोरंजक कार्यक्रम होऊ शकतो. ही चार नवी केंद्रे कशी चालावीत, यासंबंधी आणखी पुष्कळ मोलाच्या सूचना करता येण्यासारख्या आहेत. पण ही केंद्रे आधी त्या त्या ठिकाणी एकदाची सुरू होऊ द्या, मग पाहू.

## □ रामभाऊ जमदाडे की अब्दुल रशीद ?

काय विजेचा चमत्कार आहे पाहा. वीज अंगावर कोसळली म्हणजे जिवंत असलेला माणूस मरून जातो. एका माणसाची दोन माणसे काही होत नाहीत. पण सोलापुरात परवा असा प्रकार घडला खरा. एका टांग्यावर वीज कोसळली आणि दोन माणसे मेली. त्यात बिचारा टांगेवालाही होता. खरे म्हणजे यात विशेष ते काय ? एक दुर्दैवी घटना एवढेच तिचे वर्णन करून आपण थोडे हळहळू इतकेच. पण हा टांगेवाला मेला आणि नंतर जे काही घडले ते मोठे विलक्षण. पोलिसांनी त्याचे प्रेत ताब्यात घेतले. उत्तरीय तपासणीनंतर ते मृतांच्या नातेवाइकांच्या हाती द्यायचे, पण तेथेच गंभीर पेचप्रसंग निर्माण झाला. मृताचा भाऊ म्हणाला, मेलेला हा टांगेवाला हिंदू असून त्याचे नाव रामभाऊ जमदाडे असे आहे. त्याच्या बायकोपणावर हक्क सांगणारी एक बाई पुढे आली आणि तिने सांगितले, की मेलेला मनुष्य मुसलमान असून, त्याचे नाव अब्दुल रशीद असे आहे. पोलिसांपुढे मोठा पेचप्रसंग आला. मेलेला जो कुणी असेल, तो हिंदू की मुसलमान ? रामभाऊ की अब्दुल ? शेवटी त्यांनी हे प्रकरण न्यायाधीशांकडे सोपवले. एका पक्षाने हा माणूस राहत होता तेथील घरमालकाच्या भाड्याच्या पावत्या दाखवल्या. त्यात नाव रामभाऊ जमदाडे. दुसरा पक्ष तर बोलूनचालून आपल्या मुसलमानबंधूंचाच. ते ऐकतात थोडेच ! त्यांनी टांग्याचा परवाना दाखवला. त्यावर नाव अब्दुल रशीद. दोन्ही पक्षांनी आपापले साक्षीदार कोर्टात उभे केले. न्यायाधीशांपुढेदेखील मोठाच पेच उभा राहिला असेल. तीनचार दिवस वातावरण तंग होते. हिंदू–मुसलमान दोन्ही मंडळी तावातावाने भांडत होती आणि तोपर्यंत हे बिचारे प्रेत शांतपणे रुग्णालयात पडून राहिले होते. अखेर निकाल लागून तो टांगेवाला हिंदूच ठरला. हिंदूंच्या ताब्यात प्रेत मिळाले आणि त्याला यथोचित अग्निसंस्कार झाला. प्रकरण संपले.

एका लहानशा गोष्टीला इतके मोठे स्वरूप आपल्या लोकांनी द्यावे, हे मला तरी काही पटले नाही. हिंदू काय अन् मुसलमान काय, शेवटी तो माणूसच होता ना ? शिवाय मेलेला बिचारा. त्याच्या प्रेतासाठी इतकी भांडाभांडी ? आम्हा हिंदू लोकांना

अलीकडे झाले आहे तरी काय ? उठल्यासुटल्या आपल्या हक्कासाठी भांडाभांडी करण्याची ही दुष्ट खोड त्यांना लागली तरी कोठून ? आमची काँग्रेसची आणि समाजवादी पक्षाची थोर माणसे यावेळी काय करीत होती ? त्यांनी तेथे धावत जाऊन या डोके फिरलेल्या हिंदू लोकांना आवरले कसे नाही ? निदान प्रजासमाजवादी मंडळींच्या कार्यकर्त्यांनी तरी रातोरात सोलापूर गाठणे आवश्यक होते. त्यांनी तेथे जाऊन जमदाडे हा जमदाडे नसून, अब्दुल रशीदच आहे आणि त्याचे प्रेत मुसलमानांच्याच ताब्यात दिले पाहिजे, असा प्रचार करणे अगदी आवश्यक नव्हते काय ? लता हमीद प्रकरणी त्यांनी जे राष्ट्रीय कर्तव्य बजावले तेच येथेही बजावणे अगदी अगत्याचे होते. खरोखर हिंदू–मुसलमान ऐक्याचा संदेश देण्याची केवढी मोठी संधी त्यांनी पुन्हा एकदा वाया घालवली. मी जर सोलापुरात असतो तर हे काम बरोबर केले असते. हिंदूंना समजावून सांगितले असते, म्हणालो असतो, "अहाहा ! काय हा दैवी चमत्कार ! एका क्षणात रामभाऊ जमदाडे, एका क्षणात अब्दुल रशीद. एकाच माणसाची दोन रूपे. त्या शैवपंथाच्या नरहरी सोनाराला जसा विठोबा दिसला ना, तसे सोनारदादा पक्के शैव शंकराचे भक्त. विठोबाच्या दर्शनाची वहिवाट नाही. विठोबाला सोन्याचा करदोडा करायचा. त्याच्या कमरेचे माप घेण्यासाठीदेखील तो देवळात जायला तयार नव्हता. शेवटी डोळ्यास पट्टी बांधून विठोबाचे माप घ्यावे अशी तडजोड ठरली. डोळ्यांवर पट्टी बांधून माप घेतले, की शंकराची पिंड हाताला लागे अन् डोळे उघडून पाहिले, की कमरेवर हात ठेवलेला विठोबा दिसे. हरी आणि हर ही एकाच देवाची रूपे आहेत, याचा त्याला मग साक्षात्कार झाला म्हणतात आणि मग तो वारकरी-संप्रदायात शिरला म्हणतात. जुन्या काळच्या गोष्टी या. चमत्कार म्हणून आपण त्या ऐकतो अन् सोडून देतो, पण आजच्या काळातही चमत्कार घडतच असतात. फक्त ते समजण्याची अक्कल आपल्याला पाहिजे. एकच माणूस घटकेत रामभाऊ जमदाडे ठरतो अन् घटकेत अब्दुल रशीद ठरतो, हे दाखवण्यात परमेश्वराचा असाच काहीतरी हेतू असला पाहिजे खास. निदान आम्ही हिंदू लोकांनी तरी असल्या चमत्कारावर विश्वास ठेवलाच पाहिजे आणि त्याचा अर्थ काय, यावर मनन केले पाहिजे. 'ईश्वर अल्ला तेरे नाम' असे केवळ म्हणून भागणार नाही. ईश्वराला अल्लाच्या स्वाधीन करण्याचा समंजसपणा दाखवला पाहिजे. तरच देशाची प्रगती होईल. ईश्वर हा ईश्वरच आहे म्हणून तुम्ही मांडत राहिलात तर या देशाचा भविष्यकाळ अंधःकारमय आहे, एवढेच सांगतो.

## □ ना. जगजीवनराम रिक्षा चालवणार ?

आपले समाजवादी पक्षाचे पुढारी डॉ. राम मनोहर लोहिया हे मोठे अभ्यासू आणि तितकेच तऱ्हेवाईक गृहस्थ आहेत म्हणतात. लोकसभेत खळबळ उडवून

देण्यासारख्या अनेक गोष्टी ते बोलत असतात (आणि काहीवेळा करीतही असतात). परवा ते रिक्षा चालवणाऱ्यांच्या कष्टाबद्दल बोलत होते. मजूरमंत्र्यांना उद्देशून ते म्हणाले, " रिक्षावाल्यांना रिक्षा ओढताना काय शारीरिक आणि मानसिक हाल होतात, हे जगजीवनरामसाहेब, तुम्हाला कळायचे नाही. त्यासाठी तुम्ही आणि तुमचे सहकारी यांनी एक महिनाभर प्रत्यक्ष रिक्षा ओढून पाहावी. म्हणजे त्याचा हिसका काय असेल ते तुम्हाला कळेल !" गंमत अशी, की ना. जगजीवनराम यांनी ही सूचना मान्य केली, पण ते पुढे एवढेच म्हणाले, की माझ्या या रिक्षात डॉ. लोहिया हे जर उतारू म्हणून बसायला तयार असतील, तर मी रिक्षा ओढायला तयार आहे. आता हे कसे जमणार? कारण माणसांनी चालवलेल्या रिक्षात बसायचे नाही, अशी लोहियासाहेबांनी मागेच प्रतिज्ञा केलेली आहे. म्हणजे प्रत्यक्षात काहीच होणार नाही, हा त्याचा अर्थ. लोहिया रिक्षात बसणार नाहीत आणि जगजीवनरामही रिक्षा ओढणार नाहीत. हा सगळा 'बोलाचीच कढी, बोलाचाच भात' यापैकी प्रकार झाला. लोहिया आपले बोलले आणि यांनी त्यांना आपले उत्तर दिले इतकेच. हे काही खरे नाही.

लोहियांना माझी अजून विनंती आहे, की त्यांनी आपल्या प्रतिज्ञेचा फेरविचार करावा. माणुसकीच्या दृष्टीने त्यांचे बोलणे ठीक आहे. पण जगजीवनराम यांच्यासारख्या थोर नेत्याला जर माणसाचा रिक्षा चालवायची हौस आहे, तर तुम्ही माघार का घेता? अन् तुमची प्रतिज्ञा मोडते तरी कशी? माणसे जी रिक्षा चालवतात, तीत आपण बसायचे नाही एवढेच ना? पण जगजीवनराम केवळ माणूसच कोठे आहेत? ते तर मंत्री आहेत आणि साधेसुधे नाहीत. केंद्रीय सरकारमधले एक ज्येष्ठ मंत्री. नंबर तीनचे पुन्हा. म्हणजे नुसते 'मॅन' नाहीत तर 'सुपरमॅन' आहेत. त्यांनी रिक्षा चालविली तर त्यात बसण्यात प्रतिज्ञेचा भंग मुळीच व्हायचा नाही.

खरोखरीच जगजीवनरामसाहेब रिक्षा ओढायला लागले तर काय होईल? तुम्हाला कल्पना नाही. जगजीवनराम म्हणजे काही सामान्य असामी नव्हे. भारी कर्तबगार माणूस. स्वातंत्र्यानंतरे पहिले मंत्रिमंडळ जे झाले, त्यात ही स्वारी होती. त्या मंत्रिमंडळापैकी दोघेच अलीकडे शिल्लक उरले होते. एक जगजीवनराम आणि दुसरे काका गाडगीळ. पैकी काकाही नुकतेच गेले. म्हणजे हेच आता जुन्यातले जुने. नेहरूंनी मध्यंतरी यांची हकालपट्टी केली होती. नेहरू ज्यांना आपल्या मंत्रिमंडळातून बाहेर काढतात, तो फार मोठ्या योग्यतेचा मणूस असतो, हे सिद्ध झालेले सत्य आहे. तेव्हा जगजीवनराम यांच्या योग्यतेसंबंधी निराळे सर्टिफिकिट नकोच. ते रिक्षा चालवू लागलेच तर अशा कौशल्याने चालवतील, की सगळ्यांनी नुसते बघतच राहावे. आपला रिक्षा कोणत्या रस्त्याने वळवावा, इकडे जावे की तिकडे वळावे, असला प्रश्न त्यांना मुळीच पडणार नाही. अगदी बरोबर योग्य त्या रस्त्याला

वळण्यात त्यांचा अगदी हातखंडा आहे. लालबहादूरशास्त्रींच्या निधनानंतर असा प्रसंग आला होता. दोन वाटा फुटल्या होत्या. एक रस्ता मोरारजींच्या बंगल्याकडे जात होता, दुसरा इंदिरादेवींच्या घराकडे. खरे म्हणजे मोरारजींचा बंगला त्यांच्या अगदी पक्का ओळखीचा. ह्या रस्त्यावरून ते कितीदा तरी आलेले–गेलेले. बैल जसे न सांगता बरोबर रानातल्या आपल्या वस्तीकडे वळतात, तसे ते नेहमी मोरारजींच्या घराकडे वळायचे. पण या वेळी त्यांनी पाहिले. मोरारजींच्या रस्त्यावरून शुकशुकाट अन् इंदिरादेवींच्या रस्त्यावर एखाद्या यात्रेसारखी गर्दी उसळलेली. मग काय विचारता महाराज! जगजीवनरामांनी आपली रिक्षा बरोबर नेली त्या रस्त्यावर आणि असा भरधाव, की सगळ्यांना हा हा म्हणता मागे टाकून, सर्वांआधी बाईंच्या बंगल्यात स्वारी हजर. रिक्षा ओढण्याचे त्यांचे कौशल्य असे अवर्णनीय आहे.

म्हणून म्हणतो, 'लोहियासाहेब, नका आशी आडवू वाट! एकदा ओढू द्या ना त्यांना रिक्षा. तुमचे वजन वाढणार नाही कदाचित, पण त्यांचे तरी कमी होईल. अहो, हेही नसे थोडके! मजूरमंत्री म्हणायचे अन् अंगाने इतके आपले 'हे' असायचे म्हणजे काही खरे नाही.'

—ग्यानबा


परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस

सहा साहसे — दा. सी. देसाई

मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ५१९ नारायण, पुणे २

# सांवळा गुलाब

## ली ला श्री वा स्त व

मंजूच्या घरासमोरच्या बागेत फक्त गुलाब आहेत. दुसरं कसलंही फुलझाड नाही. त्यात फक्त गुलाब ! वेगवेगळ्या रंगाचे, वेगवेवेगळ्या बांध्याचे आणि वेगवेगळ्या तोंडवळ्याचे. पिवळा, पांढरा, पिंगट, फिकट गुलाबी, आरक्त गुलाबी, भडक गुलाबी, तांबडा, रक्तवर्णी... गुलाबाच्या साऱ्या शेडस् माधवनं आपल्या घरासमोरच्या बागेत लावल्या होत्या.

त्या बागेतल्या गुलाबाव्यतिरिक्त माधवनं एक गुलाब आपल्या घरात लावला होता. ह्या गुलाबाचं नाव होतं मंजू ! पण माधव ह्या गुलाबाला प्रेमानं 'माझा सावळा गुलाब' म्हणून संबोधित असे. हे 'सावळ्या गुलाबा'चं गुपित मंजूच्या इतर साऱ्या गुपितांप्रमाणंच मला माहीत होतं.


माधवचं गुलाबांच्या फुलांवर विलक्षण प्रेम होतं. माणूस आपल्या एकुलत्या एक अपत्यावर करतो, त्याहून कितीतरी जास्त जगातल्या साऱ्या सुंदरतेचं, पवित्रतेचं व मांगल्याचं प्रतिक गुलाब आहे, असं माधवचं मत होतं. तो म्हणे, माझ्याजवळ शेवटचा एकच रुपया उरला तरी मी रोटीऐवजी गुलाबाची फुलं विकत घेईन. असा हा गुलाबवेडा माधव माळी व्हायचा, पण तो चक्क मेजर होता.

निरोप घेताना माधव मंजूला म्हणाला होता, "माझ्या सावळ्या गुलाबा, माझ्या गुलाबाची काळजी घे. ह्याच्या प्रत्येक फुलात माझ्या जीवाचा अंश आहे, असं समज."

खरोखरच प्रत्येक फुलात माधवच्या जीवाचा अंश होता. अठरा तारखेला लाहोर-क्षेत्रात माधवला दोन प्राणघातक गोळ्या लागल्या अन् एकोणीस तारखेला गुलाबावर एकही फूल उमललं नाही. रक्तवर्णी गुलाबावर फक्त दोन तांबडी फुलं उमलली; ताज्या रक्तानं माखलेल्या लाल लाल जखमांच्या रंगाची !

माधवला लाहोर-फ्रंटवर वीरगती प्राप्त झाल्याची बातमी मी वर्तमानपत्रांत वाचली.

ती वाचताच मला वाटलं, जगातल्या साऱ्या गुलाबांची मान मुरगाळली गेली आहे.



समोर दिसली त्या टॅक्सीत मी उडी मारली व माधवच्या सावळ्या गुलाबाकडे भरधाव निघाले. ही बातमी ऐकून मंजूची काय अवस्था झाली असावी, याची मला कल्पना करवेना.

दिवाणखान्यात टांगलेल्या माधवच्या हसऱ्या फोटोवर ताज्या गुलाबांचा हार होता. फोटोखालच्या फुलदाणीत ताज्या गुलाबांचा मोठासा गुच्छ होता अन् कार्निसवर धूपदानात धूप जळत होता. धूपाचा व गुलाबांचा संमिश्र वास अगदी मंदिराच्या गाभाऱ्यातून यावा तसा वाटत होता.

माधवच्या फोटोसमोरच्या खुर्चीवर मंजू बसली होती. बर्फासारख्या थंड मनानं, दगडासारख्या निश्चल शरीरानं......

" मंजू– " मी रडतच मंजूला मिठी मारली. मंजूला मी छातीशी घट्ट कवटाळून धरलं तरी तिच्या हृदयाची धडधड मला ऐकू आली नाही. " मंजू ! " मी मंजूचा चेहरा ओंजळीत घेऊन कुरवाळू लागले अन् मग असं करीत असतानाच अभावित-पणे माझ्या हातानं मंजूचं कुंकू फरफटून गेलं.

एवढा वेळ मंजू एक शब्दही बोलली नव्हती. आता फक्त तिचा एक दीर्घ निश्वास तेवढा मला जाणवला !

" काश्मीरचे गुलाब नेहमी हसत राहावेत म्हणून माधवनं आपल्या रक्ताचं खतपाणी घातलं, शीलू. "

मंजूच्या ह्या वाक्यासरशी माझ्या अश्रूंचा वेग आणखी वाढला. खरं म्हणजे मी मंजूचं सांत्वन करायला, तिला धीर द्यायला आले होते, पण मंजूच माझं सांत्वन करू लागली.

लहानसा काटा बोचल्यावर हाय–तोबा करणाऱ्या मंजूनं हे हिमालयाएवढं दुःख पिऊन टाकण्याचं धैर्य कुठून आणलं, ह्याचं मला अजूनही आश्चर्य वाटतं. पुन्हा मी मंजूकडे गेले, तेव्हा लढाई संपली होती, पण मंजू भेटली नाही.

तिच्या दाराला मोठंसं कुलूप होतं. बागेतली सारी गुलाबाची रोपटी निस्तेज

दिसत होती. फक्त पांढऱ्या गुलाबावर दोन–चार निष्प्राण फुलं होती. त्यानंतर मंजूचं मला एक पत्र मिळालं. पत्रावर अमृतसरचा शिक्का होता.

" शीलू,

माधवच्या अखेरच्या आठवणी गोळा करण्यासाठी मी इथं आले आहे. माधवचे अखेरचे शब्द, माधवनं घातलेले अखेरचे कपडे, माधवच्या खिशात शेवटच्या क्षणी असलेला रुमाल, रक्ताचे डाग पडलेला माझा गुलाबाच्या बागेतला फोटो, माधवचा जग, माधवनं मला शेवटचं पत्र लिहिलं ते पेन, या आणि अशा साऱ्या वस्तू मी प्राप्त करुन घेतल्या आहेत. या वस्तूतून मला माधवचा स्पर्श जाणवतो.

युद्धभूमीच्या त्या प्रत्यक्ष क्षेत्रातून मी कालच परत आले आहे. जखमा ल्यालेला माधवचा देह जिथं पडला, त्या पवित्र जागेला मी स्पर्श व प्रणाम करून आले. येताना तिथली मूठभर माती मी सोबत आणली आहे. ती मी देव्हाऱ्यात ठेवणार आहे.

जे समजायला सारं आयुष्यही पुरलं नसतं ते मला या चार दिवसांनी प्राप्त करून दिलं आहे. मी केव्हा परतेन हे सांगता येत नाही. परतण्याची वेळ झाली असं वाटताच मी परत येईन. तेव्हा तुला कळवीनच. — मंजू. "

मंजूचं हे पत्र माझ्या अश्रूंनी भिजून चिंब झालं.

मंजूच्या पत्राची मी रोजच वाट पाहू लागले आणि मंजूचं पत्र तब्बल महिनाभरानं आलं. पत्रात फक्त एकच ओळ होती. 'मी परत आले आहे!' पत्र मिळताच समोर दिसेल त्या टॅक्सीत मी उडी मारली व मंजूचा पत्ता सांगून टॅक्सी भरधाव सोडायला सांगितली.

गुलाबाची बाग सारी सुकून गेली होती. माधवनं परिश्रमानं लावलेल्या रोपट्यांवर फुलंच काय पण पानंसुद्धा नव्हती. वाळलेल्या पानाचा एक डोंगर इतस्ततः उडत होता. रोपट्याच्या निष्पर्ण पिवळ्या दांड्या केविलवाण्या हलत होत्या.

मंजू त्या दिवसासारखीच आजही माधवच्या फोटोसमोरच्या खुर्चीवर बसली होती. माधव फोटोत हसत होता. त्याच्या फोटोवर गुलाबांच्या फुलांचाच हार होता, पण फुलं बहुधा ताजी नव्हती.

मला पाहिल्यावर मंजू संथपणं म्हणाली, " ये शीलू "

मंजूचा जड, संथ आवाज मला करवतीसारखा कापत गेला.

कितीतरी क्षण आम्ही दोघीही चूप होतो. त्या निर्जीव शांततेचं एक टोक मी पकडून ठेवलं होतं व दुसरं मंजूनं ...

" मंजू..." शेवटी मी कापऱ्या आवाजात म्हटलं, " अशी एकाएकी अन् एकटी परदेशात कशी निघून गेलीस तू ?"

" एकटी आता मी जन्मभराचीच आहे शीलू ! आणि मी गेले तो परदेश नव्हे, आपलाच देश आहे. माधवची पुण्य कर्मभूमी. "

" मला तुझी फार काळजी वाटत होती मंजू. "

" काळजी बहुमूल्य, उपयोगी वस्तूंची करायची असते. माझ्यासारख्या मूल्यहीन स्त्रीची काळजी कशाला करतेस शील ?"

" मंजू..." मी व्यथित नजरेनं मंजूकडे पाहिलं. मंजू माझी नजर टाळून खाली पाहू लागली; तरी तिचं पांढर फटफटीत कपाळ मला स्पष्ट दिसत होतं. मंजूचं कपाळ चांगलं विस्तीर्ण आहे. कुंकवावाचून तर ते एखाद्या ओसाड माळराना-सारखं भकास दिसत.

" मंजू, दैवानं फार सोसायला लावलं आहे तुला. माधवच्या आयुष्याची फक्त दोन वर्षं वाट्याला आली तुझ्या."

" माझ्या वाट्याला निदान दोन वर्षं तरी आली. काहींच्या वाट्याला फक्त काही महिने, काही दिवसच आले होते. एका पंजाबी जवानाची बायको मला गाडीत भेटली. तिच्या नखावरची मेंदीची लालीसुद्धा गेली नव्हती, तोच ती विधवा झाली. कुटुंबच्या कुटुंबं कशी उद्ध्वस्त झाली आहेत, हे मी माझ्या डोळ्यांनी पाहून आले."

मंजू स्तब्ध झाली. स्मृतींची चित्रं झराझर तिच्या डोळ्यांत उतरू लागली.

" एका वृद्ध मातेची दोन्ही मुलं लढाईत कामास आली. बॉम्बहल्ल्यात घरदार नष्ट झालं, सून अपंग झाली अन् एक नातू डोळ्यांसमोर जळून खाक झाला. आता एक नातू अन् हातापायानं अपंग झालेली सून घेऊन म्हातारी उघड्यावर पडली आहे. तिचा विलाप कानानं ऐकवेना, डोळ्यानं पाहवेना. आणखी एक तरुण विधवा भेटली. पाकिस्तान निर्माण झालं त्या वेळी नऊ वर्षांची होती. त्या वेळी आपल्या आईची विटंबना तिनं आपल्या डोळ्यांनी पाहिली... भावाला, बापाला तिच्या डोळ्यांसमोर गोळी घालून ठार करण्यात आलं होतं. पाण्याच्या टाकीत लपून राहिल्यानं हीच तेवढी बचावली. लपतछपत रेफ्यूजी कँपपर्यंत पोचली. मग भारतात येऊन अनाथालयात वाढली. एक समाज कल्याण केंद्रातर्फे चार वर्षांपूर्वी तिचं एका जवानाशी लग्न झालं. सुखाचे दिवस येतात न येतात तोच नवरा फ्रंटवर मारला गेला व बाई पुन्हा दुःखाच्या गर्तेत फेकली गेली. आयुष्य दुसऱ्यांदा उद्ध्वस्त झालं.

" आणखी एक स्त्री भेटली. नवऱ्यानं तिला टाकून दिलं होतं. त्या वेळी मुलगा पोटातच होता. काबाडकष्ट करून लहानाचा मोठा केला. लोखंडाच्या स्तंभासारखे हातपाय अन् हत्तीसारखी छाती असलेला आपला मुलगा पाहून बाई मागचं सारं दुःख विसरून जाई. एक दिवस खाडखाड बूट वाजवीत पोरगा घरी आला अन् आईला त्यानं खाड्दिशी सॅल्यूट ठोकला, तेव्हा बाईला कळलं, की पोरगा मिलि-टरीत भरती झालाय्.

" एक दिवस बातमी आली, की पोराच्या हत्तीसारख्या छातीतून सहा गोळ्या आरपार निघून गेल्या. ती बाई आता रस्त्यावर फिरते अन् खाडखाड बूट वाजवीत चालणाऱ्या कोणत्याही माणसाला ' माझा बाबू ' म्हणून कवटाळू लागते."

मंजू बोलायची थांबली तेव्हा मी उजव्या तळव्यानं हळूच डोळे पुसून काढले.

" उत्तुंग त्याग अन् अथांग दुःख पाहून आले आहे मी. त्यांच्यापुढं माझा त्याग,

माझं दु:ख काहीच नाही, असं वाटतं."

मंजू उठली अन् तिनं माधवच्या फोटोपुढे उदबत्त्या पेटवून ठेवल्या. उदबत्त्या पेटवताना तिचा कृश हात बागेतल्या गुलाबाच्या सुकलेल्या पिवळ्या देठाप्रमाणं कापत होता.

तिच्या कापऱ्या हाताकडं अन् विस्तीर्ण पांढऱ्या कपाळाकडं पाहत मी म्हटलं, "मंजू, आयुष्याची फार मोठी वाटचाल अजून पुढंच आहे अन् तुझ्या बागेतले सारे गुलाब सुकून गेले आहेत."

मंजूनं आता सरळ माझ्याकडे नजर फेकली. दोन क्षण स्थिर नजरेनं ती माझ्याकडं पाहत राहिली.

"ह्याच विषयावर बोलायला तू माझ्याकडे आज आली आहेस का?"

"ह्याच विषयावर बोलायला आले नव्हते मी, पण विषय निघालाच आहे, तेव्हा बोलूच या आपण ह्या विषयावर. नुसतं बोलायला काय हरकत आहे? तुझ्यासारखी तरुण, भावनाप्रधान अन् सुंदर मुलगी हे अफाट आयुष्य एकाकी जगू शकेल का? माफ कर मंजू, कदाचित हा प्रश्न मी तुला अवेळी विचारला असेल, पण केव्हातरी तुला ह्या प्रश्नावर विचार करावाच लागणार आहे, असं मला वाटतं. तुझ्या दारासमोरचे गुलाब आता असेच निष्पर्ण, निष्पुष्प राहणार का?"

मंजू खालच्या मानेनं सारं ऐकत होती. तिनं वर मान करून माझ्याकडे पाहिलं, तेव्हा तिच्या टपोऱ्या डोळ्यांत दोन खरे मोती तरंगत होते.

क्षणभरानं ती आतल्या खोलीकडे वळली व मला आपल्या मागोमाग येण्याचा तिनं इशारा केला.

ही माधव–मंजूची बेडरूम होती, हे मला माहीत होतं. मी धडधडत्या मनानं तिच्या मागोमाग खोलीत शिरले. पलंगावरची मच्छरदाणी मंजूनं हळूच बाजूस सारली. पलंगावर दोन गुलाबी कांतीची निष्पाप दिसणारी मुलं झोपली होती. एक वर्षा–दीड वर्षाचा असावा, दुसरा बहुधा चार वर्षांचा.

मी आश्चर्यानं मंजूकडे पाहिलं.


"ही दोन गुलाबाची रोपटी मी माझ्याबरोबर आणली आहेत. दोघंही अनाथ आहेत. या रोपट्यांना खतपाणी घालून वाढवायचं आहे. मला खात्री आहे, की माधवला माझी ही गुलाबाची नवी फुलबाग नक्की आवडेल."

धाकट्यानं झोपेत जरा चाळवाचाळव केली म्हणून खाली वाकून मंजू त्याला हलक्या हातानं थोपटू लागली. त्याच्या काळ्याभोर जावळातून आपली सावळी लांबसडक बोटं फिरवू लागली. तसं करताना तिच्या चेहऱ्यावर वात्सल्याचा, साफल्याचा एक पवित्र, निर्मळ रंग पसरू लागला.

मच्छरदाणी हळूच खाली सोडून मंजूनं मला प्रश्न केला,


"तुझ्या प्रश्नाचं उत्तर मिळालं ना तुला शीलू?" आणि माझा होकार माझ्या घशातच अडकला. ●

# कौटुंबिक अंदाज पत्रक !



चालू महिन्याची प्राप्ती आज हाताशी आहे. महिन्याचा खर्च वजा जाता राहिलेली शिल्लक बँकेत जाऊं दे.






अर्थात्

## बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

मध्यें, जिथे तुमची मिळकत सुरक्षित तर राहिलच शिवाय तुम्हाला हवा तो सल्लाहि मिळेल.

रजिस्टर्ड ऑफिस: ११७७ बुधवार पेठ, पुणे-२.



# 9 उपेक्षा ! !

अमेरिकन उद्योगपतींच्या निरनिराळ्या तऱ्हा असतात. आपला धंदा करीत असताना व्यावसायिक नीतिमत्तेची फारशी तमा न बाळगता शक्य तेवढ्या जलद द्रव्यसंचय करणे काहींना आवडते, तर समाजात मान्यता पावलेली आचार-संहिता पाळण्याकडे काही इतरांचा कल असला तरीही त्यांची मुख्य दृष्टी दुसऱ्या कोणत्याही गोष्टीपेक्षा नफ्यावरच केन्द्रित झालेली असते. अर्थात यात काही विशेष गैर आहे असे नाही; परंतु त्याचप्रमाणे यात विशेष उल्लेखनीयही काही नाही. आणि ध्येयवादाची थोडीशी झालर व पक्का व्यावसायिक दृष्टिकोन यांचे मिश्रण असलेल्याही काही व्यक्ती आढळतात. नफा झाल्याखेरीज कोणत्याही धंद्याची भर-भराट होणे शक्य नाही, याची जाणीव असण्याएवढी व्यवहारी दृष्टी त्यांना असते. परंतु त्यांच्या दैनंदिन व्यवहारात आपल्या राष्ट्राबद्दलही आपले काही कर्तव्य आहे, ही जाणीव त्यांना प्रेरणा देत असते. माझ्या माहितीचे असे काही मोठे उद्योगपती आहेत, की आंतरराष्ट्रीय जबाबदारीची जाणीव त्यांना यथार्थतेने आहे असे म्हण-ण्यास मुळीच प्रत्यवाय नाही.

# एक मे दिनानिमित्त........

## एक अधिकारी आणि परिपक्व व्यक्ती
## एक ताज्या दमाचा उत्साही नवयुवक

## यांच्या समान आशा आणि समान चिंता
## व्यक्त करणारे दोन लेख

# श्री. एच्. व्ही. आर्. अय्यंगार :

(माजी गव्हर्नर, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया)

माझ्या अमेरिकेतील वास्तव्यात अशा एका मोठ्या उद्योगपतीला भेटण्याचा मला योग आला. न्यूयॉर्क शहरातील एका गगनचुंबी इमारतीतील चाळिसाव्या मजल्यावरील फिक्कट हिरव्या रंगाचे फर्निचर, गालिचे, मंद प्रकाशाचे दिवे अशा-रीतीने सजवलेल्या आपल्या अत्याधुनिक ऑफिसमध्ये आपल्या टेबलापाशी तो माझ्यासमोर बसला होता. माझे त्या खोलीच्या भिंतीकडे लक्ष गेले नव्हते. 'ती चित्रे पाहिलीत का?' त्याने मला विचारले आणि चुन्याने रंगवलेल्या मातीच्या भिंती, त्यावर खेळणारा सूर्यप्रकाश आणि भोवतालच्या वेली ह्या दृश्याने माझे मन आकर्षित करून घेतले. 'ही चित्रे मी हिंदुस्थानात विकत घेतली,' तो सांगू लागला, 'आणि मी स्नानगृहातही अशी काही चित्रे लावली आहेत. मी तुमच्या देशात दोनदा जाऊन आलो आहे. तिथे मला काय वाटले हे मला निश्चित सांगता येणार नाही. अनेक जन्म पुरेल इतकी घाण मी तिथे पाहिली. धर्माच्या नावाखाली घालण्यात येणारा भरपूर गोंधळहि मी पाहिला. परंतु तरीही माझ्या हृदयाची तार कुठे तरी छेडली गेली हे खास.

'काही महिन्यांपूर्वीचीच गोष्ट. आमच्या ऑफिसात एक तरुण भारतीय नोकरी मागण्यासाठी आला. त्याचा पोषाख साधारण गबाळाच होता. त्या दिवशी सकाळी त्याने बहुधा दाढीही केलेली नसावी. थोडक्यात म्हणजे तरतरीत, चुणचुणीत अशा तरुणाच्या कल्पनाचित्राच्या एकदम विरोधी असे त्याचे स्वरूप होते. आमच्या ऑफिसचे एक वैशिष्टय आहे. सकृद्दर्शनी अशक्य व प्रतिकूल वाटणाऱ्या बाह्यरूपान न फसता खऱ्या गुणवत्तेच्या व्यक्तींची पारख करण्याची साधने आमच्याजवळ आहेत.

## संधीचा सुपरिणाम

'आमच्या ऑफिसमधील रिसेप्शनिस्टने त्याला परत पाठवले नाही. तिने त्याला योग्य त्या अधिकाऱ्याकडे पाठवले आणि थोडक्यात सांगावयाचे म्हणजे आम्हाला असे आढळून आले, की त्याची, घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. शिक्षण पुरे करताना त्याला अतिशय त्रास झाला होता. कित्येकदा तर त्याला एक वेळच जेवून राहावे लागले होते. परंतु गणित आणि इलेक्ट्रॉनिक्स या त्याच्या विषयांत मात्र त्याचा हात धरणारा कुणी नव्हता. आम्ही त्याला नोकरीवर ठेवून घेतला आणि आज तो आमच्या कॉम्प्यूटर विभागाचा एक आधारस्तंभ आहे.

'ह्या व्यक्तीसारख्या शेकडो, नव्हे हजारो व्यक्ती तुमच्या देशात असतील. त्यांना फक्त संधी मिळाली पाहिजे. मी हिंदुस्थानच्या इतिहासकालीन वैभवाबद्दल थोडेसे वाचले आहे. तुमची शिल्पकला, तुमची चित्रकला, तुमचे तत्त्वज्ञान. खरं सांगू इथे आणि हिंदुस्थानात मी कित्येक भारतीय तरुणांना भेटलो. तुमच्यातली बुद्धीची झेप, ज्ञानाची आवड आणि क्रांतिकारक विचार प्रसवण्याची तुमची प्रतिभा–सारे अद्याप तुमच्यापाशी आहे. परंतु काय कारण असेल ते असो, ह्या साऱ्या प्रतिभेला, कर्तृत्वाला बहर यणारी परिस्थिती मात्र आज हिंदुस्थानात नाही असे मला वाटते. मग ती तुमची विश्वविद्यालये असोत, दुय्यम शिक्षणाची तुमची पद्धती असो किंवा तुमची समाजरचना असो. मी असे ऐकले आहे, की तुमच्या विश्वविद्यालयांना ओंगळ राजकारणाची झळ लागली आहे आणि त्यातील कित्येक प्राध्यापक हे खर म्हणजे त्या स्थानास पात्र नाहीत. खरे काय आहे ते मला माहीत नाही. परंतु एक गोष्ट मात्र खरी आहे, की कित्येक भारतीय इथे अमेरिकेत फार उत्कृष्ट कामगिरी करतात आणि भारतात परत गेल्यावर कोमेजल्यागत होतात. त्यांच्या कर्तृत्वाला पोषक अशी परिस्थिती तुम्ही नुसती निर्माण केली तरी ह्या व्यक्ती तुमच्या देशाच्या विकासाला केवढा हातभार लावू शकतील !'

त्या शांत आलिशान ऑफिसमध्ये बसून एका परदेशी व्यक्तीच्या तोंडून माझ्या देशाबद्दल एवढे उत्साहपूर्ण तेवढेच वस्तुस्थितिनिदर्शक उद्‌गार ऐकताना माझ्या मनाची स्थिती मात्र थोडीशी चमत्कारिक झाली.

'आणि शिवाय अद्यापही वापरात न आणलेल्या मनुष्यबळाची समस्या आहेच,'

तो अमेरिकन सांगू लागला, ' रशियाचे उदाहरण घ्या. त्यांच्यातील कित्येक वरच्या श्रेणीचे संशोधक व तंत्रज्ञ हे पिढ्यान् पिढ्या दैन्यात काढलेल्या व अशिक्षित राहिलेल्या शेतकरी कुटुंबांतील आहेत. केवळ परिस्थितीच्या दबावाने दबली गेलेली केवढी बुद्धिमत्ता तुमच्या देशात नाश पावत आहे, याचा जरा विचार करा. मी राजकारणी इसम नाही आणि आहे त्याच्यापेक्षा परिस्थितीचे चित्र मी कदाचित अगदीच साध्या रीतीने मांडले असेन. परंतु मूलत: तुमच्या व माझ्या देशात काही संघर्ष नाही असे मला वाटते. आम्ही खऱ्या अर्थाने एक लोकशाही राष्ट्र आहो आणि अनेक मोठ्या अडचणी असतानाही तुम्ही तसे होण्याचा जोरदार प्रयत्न करीत आहात. मला कित्येकदा असे वाटते, की अमेरिका, दक्षिण आशियामध्ये हिंदुस्थान आणि इतर काही देश यांत असे काही समान ध्येयबिंदू असू शकतील, की ज्यायोगे ह्या पृथ्वीवरचे मानवाचे जीवन हे सर्वांनाच सुखावह व अर्थपूर्ण होईल.'

## तरुणांची बुद्धिमत्ता कारणी लागत नाही

हे सारे संभाषण मला अलीकडे पुन्हा एकदा आठवले; कारण माझ्या ह्या अमेरिकन मित्राच्या कंपनीचे काही काम माझ्याकडे आले होते. ह्या साऱ्या संभाषणातून दोन मुद्दे उपस्थित होतात. एक म्हणजे सर्वंकष शिक्षणयोजना, साक्षरताप्रसार. हा झाला दीर्घ मुदतीचा प्रश्न. हा प्रश्न सोडवण्याचे प्रयत्न चालू आहेत. परंतु त्याचे दृश्य परिणाम दिसावयास काही वर्षे जावी लागतील. परंतु दरम्यानच्या काळाला लागू असलेला एक तातडीचा मुद्दाही ह्या संभाषणाने उपस्थित केला आहे आणि तो म्हणजे आमच्या तरुणांजवळ असलेले कौशल्य व बुद्धिमत्ता ही कोणत्याही कारणांनी का असेना, राष्ट्राच्या कामी पुरेशी वापरली जात नाही.

ह्या वर सांगितलेल्या गोष्टींच्या सत्यतेबद्दल मला वाटते, फारशी शंकेला जागा नाही. माझ्या अनेकदा केलेल्या परदेशच्या दौऱ्यात मला कित्येक भारतीय तरुण भेटले आहेत. सुसज्ज निवासस्थान, आलिशान मोटारगाडी इत्यादी आणि तदनुषंगिक इतर भौतिक सुखसोयींनी परिपूर्ण असलेल्या पाश्चात्त्य जीवनाचा कित्येकांना मोह पडतो हे निश्चित. पण त्यांतील बहुसंख्याकांना मायदेशी परतण्याची आणि तिथे काहीतरी काम करण्याची ओढ असते. त्यांच्या अपेक्षा भरमसाट नसतात, केवळ दैनंदिन आर्थिक विवंचनेतून सुटका व्हावी आणि पाश्चात्त्य देशांत सर्वत्र आढळते तशा वातावरणात विचारांना आणि प्रयोगशीलतेला अनुकूल बौद्धिक वातावरण मिळावे एवढीच त्यांची मागणी असते.

कित्येकजण हिंदुस्थानात परत आले आणि निराशेच्या व वैफल्याच्या गर्तेत सापडून दैनंदिन चाकोरीत रुळले. काहींनी आपल्या कर्तबगारीस साजेशी संधी मिळण्याची खटपट केली आणि निराश होऊन ते परत गेले. फार थोडे असे, की जे इथे राहिले आणि ज्यांनी अद्याप आशा सोडली नाही.

## भव्य प्रयोगशाळा !

एक काळ असा होता, की जेव्हा अशी भावना होती, की खरी जरूर कशाची असेल तर ती म्हणजे अद्ययावत साधने असलेल्या मोठमोठ्या प्रयोगशाळांची. १९४५ मध्ये मी जेव्हा पूर्वीच्या भारत सरकारच्या नियोजन व विकासखात्यात होतो, तेव्हा त्या वेळचे त्या खात्याचे सदस्य सर आर्देशीर दलाल आणि औद्योगिक व शास्त्रीय अनुसंधानाचे डायरेक्टर डॉ. शांतिस्वरूप भटनागर यांच्याशी याबाबत चर्चा केल्याचे मला आठवते. फार भव्य नसलेल्या इमारतीतून आणि कमी खर्चाच्या आणि कशाबशा तयार केलेल्या उपकरणांच्या सहाय्यानेही परदेशांतून अत्यंत उच्च दर्जाचे संशोधन झालेले आहे, याची दखल आम्ही घेतली. सी. व्ही. रामन्-सारख्या प्रतिभाशाली शास्त्रज्ञाला मोठ्या प्रयोगशाळेची जरूर भासली नाही, हे आम्ही लक्षात घेतले; तरीही आम्हाला असे वाटले, की उच्च दर्जाची साधनसामग्री आणि सर्व सोयींनी युक्त अशी ग्रंथागारे आम्ही पुरवली तर भारतीय शास्त्रज्ञांच्या-कडून होणाऱ्या मौलिक संशोधनाला नुसता बहर येईल. त्यामुळे खूप मोठ्या प्रमाणावर ह्या कार्यासाठी पैसा मंजूर करण्यात आला आणि भव्य प्रयोगशाळांची एक मालिका साऱ्या देशभर स्थापण्याच्या कामी डॉ. भटनागर ह्यांनी अतिशय उत्साहाने कार्य सुरू केले.

ह्या साऱ्या प्रयोगशाळांतून मौलिक संशोधन फार मोठ्या प्रमाणावर होईल, ही मूळची अपेक्षा फोल ठरली, हे आता सर्वांना माहीत आहे. कुठे तरी काही तरी चुकले हे खास, परंतु निराशा पदरात आली तरीही खडकातून तृणांकुर यावेत त्याप्रमाणे जिज्ञासू, साहसी चिकित्सक वृत्ती आजही उफाळून येताना दिसते, हे नाकरता येणार नाही.

## मराठा चेंबरमधील प्रदर्शन

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, पुणे ह्या संस्थेने आयोजित केलेल्या एका लहानशा प्रदर्शनाला मी नुकतीच भेट दिली. मला खात्री आहे, की इतर गावांतूनही अशा तऱ्हेची प्रदर्शने स्थानिक चेंबर ऑफ कॉमर्ससारख्या संस्थांना भरवता येतील. ह्या पुण्याच्या प्रदर्शनात पुण्यातील तरुण शास्त्रज्ञांनी बनवलेली शास्त्रीय उपकरणे होती. त्यामध्ये टेपरेकॉर्डर्स, इलेक्ट्रो–मस्क्युलर स्टिम्युलेटर्स, टाईम स्विचेस, टॅक्सी मीटर्स, फोटो इलेक्ट्रिक कॉलोरीमीटर्स आणि इतर अनेक वस्तू होत्या. यांपैकी एकही वस्तू काही अगदी अभिनव अगर महत्त्वपूर्ण नव्हती. पण महत्त्व होते ते याचे, की ह्या साऱ्या गोष्टी जवळजवळ १०० टक्के भारतीय बनावटीच्या होत्या आणि त्यांतील प्रत्येक वस्तू ही त्या त्या निर्मात्याने अनेक वर्षांच्या दीर्घ श्रमानंतर बनविलेली होती. मी पुन्हा पुन्हा विचारत होतो आणि दरखेपेस त्याच गोष्टीची उजळणी

होत होती. अपुरे भांडवल, प्राथमिक अवस्थेत प्रोत्साहनाचा अभाव, परंतु दुर्दम्य निश्चय, एक विवक्षित दृष्टिकोन आणि स्थानिक उपलब्ध साहित्यांतून काही संपूर्ण नवी निर्मिती करण्याची जिद्द.

एका टेबलावर एक मफल फर्नेस होता ( Muffle furnace ) आणि याचे प्रात्यक्षिक दाखविणारी व्यक्ती होती एक स्त्री. ती फक्त मराठी बोलत होती. माझ्या समोरची व्यक्ती एखादी गोष्ट स्पष्टपणे व प्रभावीपणे सांगते की नाही, इतपत माझे मराठीचे ज्ञान आहे. आणि पुण्यामधील हजारो मध्यमवर्गीय स्त्रियांपैकी एक अशी जरी ती दिसत असली तरी ती सांगत होती, ते मात्र मी वर म्हटल्याप्रमाणे स्पष्टपणे व प्रभावीपणे, आधुनिक शिक्षणाचा फारसा फायदा बहुतेक न मिळालेल्या या स्त्रीच्या तोंडून फर्नेसचे वर्णन ऐकताना एक विलक्षण परंतु उत्साहपूर्ण संवेदना अंतःकरणाला चाटून गेल्यासारखे मला वाटले.

शेवटी मोठ्या विपत्तीतून जगण्यासाठी आणि तोंड वर काढण्यासाठी खरे महत्त्व कशाचे असेल तर ते म्हणजे माणसांच्या दर्जाचे. हिंदुस्थानापुरते बोलावयाचे तर हा दर्जा कित्येक ठिकाणी अगदी टाकाऊ आहे. परंतु अत्यंत वरच्या दर्जाची गुणवत्ता असलेल्या व्यक्तीही असंख्य आहेत. आणि आपणासमोर आज उभ्या असलेल्या संकटांतून आपण पार पडतो की नाही, ह्या प्रश्नाचे उत्तर अशा गुणवान व्यक्तींची आपण जोपासना करतो की नाही व त्यांच्या कर्तबगारीला पुरेसा वाव करून देतो की नाही, ह्यावरच अवलंबून आहे. [ संपदा मासिक, पुणे यांच्या सौजन्याने ]

# २ अपेक्षा ! !

## बाबुराव खं. पाटील :

दीपक लंडनला चालला होता आणि आम्ही बरेचजण त्याला शुभचिंतन करून निरोप द्यायला जमलो होतो. त्याला निरोप देताना जी कविता गायिली होती... त्या शब्दांनी माझ्या मनाचा ठाव घेतला आणि ते शब्द माझ्या कानांत घुमू लागले...

Let glory attend thy onward flight,
To gain more knowledge released with the light,
In the fields architectural in the alien land,
To rebless our land with structures too grand.

On return, we would, in turn re-view
The wondrous heights of our buildings anew
Ingrained with the delicate art of Ind,
Expressed in the myriod minarets of Hind.

The marble dreams of our Taj would enthuse;
Thy life-long touch with the temples infuse
— Ajanta, Ellora, Konarak would arise
In their Chiselled glory as the handsome prize.

Ever soaring the lovesome heights attained,
By thy noble father wouldst thou be trained,
Ever more wouldst thou strive evermore to gain,
— Thy father's talents heightened wouldst retain.

Good wishes and blessings of thy kith will attend
The noble traditions of thy parents will wend
As they gleam in thy gloom with the glowing love
— For paving the way to thy fortune, they strove.

रात्रीचे बारा वाजले होते. शे-पन्नास माणसांचा समूह भरल्या अंतःकरणाने दीपकला निरोप देत होता. सगळे कसे भारावल्यासारखे झाले होते. दीपकला उद्देशून कविता ऐकून दीपक म्हणाला, " मला काहीतरी केलेच पाहिजे. भारताची मान उंचावलीच पाहिजे. "

खरोखरच आज तीन-साडेतीन वर्षांनंतर दीपकने आपले म्हणणे खरे केले. कवितेची कथा केली. अगदी सत्यकथा. स्थापत्यशास्त्राचा आधुनिक चमत्कार म्हणता येईल अशी वास्तू निर्मिण्यासाठी मॉडेल तयार केले आणि देशी-विदेशी वास्तुशास्त्रज्ञांना तोंडात बोट घालण्यास भाग पाडले.

आज आपल्या भारतात अनर्थ भविष्य वर्तविणारे अनेक ज्योतिषी आहेत. दुष्काळच पडेल; जगबुडतीच होईल अशी हजारो भविष्ये आपण ऐकतो; पण अवघ्या सहा महिन्यांत भारताची–विशेषतः महाराष्ट्राची मान अभिमानाने ताठ होईल व जगभर वाहवा होईल, असे प्रसंग दोनदा महाराष्ट्राचे छावे खेचून आणतील, असे भविष्य कोणी का केले नाही ? मला वाटते, महाराष्ट्राची कुंडली अशी तशी नाही, राजकुंडली आहे. त्याशिवाय का डॉ. जयंतराव नारळीकर व श्री. दीपक कुलकर्णी परदेशांत अवघ्या ६ महिन्यांत जगास दाखवून देतात, की आम्ही संधी मिळाल्यास तुमच्या पुढे झेप घेऊ.

## कुतुबमिनार!

मुंबापुरीच्या परिसरातील वसई येथे २६ मार्च, १९४० रोजी श्री. आचार्यांच्या झोपडीत दीपकचा जन्म झाला. सुस्थिती असतानादेखील काही कारणांमुळे आपल्या झोपडीत जन्म झाल्यामुळे आनंदित झालेले दाजी आचार्य त्या दिवशीच सरोजिनीबाईंना म्हणाले, "सगळी मोठी माणसे झोपडीतच जन्मतात. हा मुलगा माझ्या झोपडीचे नाव काढणार." खरोखरच दाजींचे भविष्य खरे ठरले.

दीपकच्या जन्मानंतर नुकत्याच जीवन-मरणाच्या आजारातून उठलेल्या वासुदेवरावांबरोबर दोन वर्षांच्या दीपकने सिलोनची वारी केली. छोटचा दीपकने पहिले-वहिले शब्द उच्चारले ते तामीळ भाषेत. आपले प्राथमिक शिक्षण मुंबईच्या म्युनिसिपालिटी शाळेतून पुरे केल्याचे ऐकून कित्येक माता-पित्यांना धक्का बसेल; परंतु त्यातच गणिताचा पाया घातला गेला, असे त्याचे व त्याच्या आई-वडिलांचे मत आहे. आपले शालेय शिक्षण त्याने किंग्ज जॉर्जमधून पहिल्या वर्गात १९५७ मध्ये पुरे केले.

दीपक नववीत असताना वासुदेवरावांना आपल्या स्वतःच्या 'ग्रेटर बॉम्बे कन्स्ट्रक्शन कंपनी'साठी काही प्लॅन्स पाहिजे होते. बाहेरून घेतल्यास कालावधी लागणार होता. तेच काम दीपकने त्याच रात्री पुरे केले. पुढे वासुदेवरावांनी संपादित केलेल्या Plumbing & Sanitation ह्या मासिकात काही नकाशे काढून दिले. ह्या सर्वांवरून वासुदेवरावांनी दीपककरिता स्थापत्यशास्त्राच्या शिक्षणक्रमाची निवड करून ठेविली होती. परिस्थितीमुळे आपल्या मनात विरलेली उच्च शिक्षणाची आकांक्षा आपल्या मुलांना उच्च शिक्षण देऊन पुरी करावयाची असे त्यांनी ठरविले होते. लोकांनी त्यांना 'तुम्ही घर का बांधत नाही?' असा प्रश्न केला असता, 'मी दोन कुतुबमिनार बांधत आहे,' असा समर्पक जबाब ते देत; आणि आज खरेच त्यांचा एक कुतुबमिनार गगनाला गवसणी घालतो आहे.

शालेय-शिक्षणानंतर पुढे काय हा प्रश्न दीपकपुढे उभा राहिला. आई, सरोजिनीबाईंच्या मते दीपकने डॉक्टरीसाठी सायन्सला जावे व वासुदेवरावांच्या मते त्याने आर्किटेक्चरसाठी जे. जे. स्कूल ऑफ आर्किटेक्चरमध्ये जावे असे होते. दीपकला फार मोठा प्रश्न पडला. आईचे ऐकावे की वडिलांचे? ओढा आर्किटेक्चरकडेच असल्याने त्याने जे. जे. मध्ये आपला अभ्यासक्रम सुरू केला. सर्व वर्षांत दीपकने आपले नाव गाजवले. पाचव्या वर्षी कॉलेजचा सेक्रेटरी होऊनही आपले दोन्ही कोर्स—जे. जे. चा डिग्री कोर्स व टाऊन प्लॅनिंगचा सर्टिफिकेट कोर्स—यशस्वीरीत्या पार पाडले.

कॉलेज शिक्षण संपल्यावर दीपकला परदेशी जाऊन आपले व्यक्तिमत्त्व चौफेर बनविण्याची इच्छा झाली. सरकारकडून सहाय्य न मिळता उलटे अडचणीचे

डोंगर उभे राहिले. धडपड्या दीपकने वडिलांच्या साह्याने इंग्लंडला प्रयाण केले. दीपकने ट्रॉपिकल आर्किटेक्चरचा अभ्यासक्रम पुरा केला. त्यावरोबरच व्हापुएग-रसचा व टाऊन प्लॅनिंगचा डिप्लोमा खिशात घातला. जवळजवळ एक वर्ष नोकरी करून आपल्या अनुभवात मोलाची भर टाकली. नोकरी करत असताना दीपकने इंग्लंडमध्ये आलेल्या नवख्या भारतीयांस आर्थिक मदत केली. त्यामुळे भरपूर पगार असूनसुद्धा दीपककडे शून्यच राहिले.

लिव्हरपूलच्या युनिव्हर्सिटीत मास्टर ऑफ आर्किटेक्चरसाठी ॲडमिशन मिळवली. प्रिफॅब्रिकेशनवर संशोधन करण्यात सुरवात केली. दोन वर्षांच्या अभ्यासक्रमात स्वस्त खर्चात लवकर आणि आकर्षक घर-बांधणी भारतास कशी करता येईल, ह्यावरच दीपक संशोधन करतो आहे.

दीपकने डिझाईन केलेले ब्लॉक इंग्लंडमध्ये अतिशय लोकप्रिय ठरले. १०,००० रु. चे ब्लॉक्स अवघ्या तीन दिवसांत विकले गेले. त्यानंतर त्याला एक विद्यार्थी वसतिगृह डिझाईन करण्यास मिळाले. हे वसतिगृह संबंध प्रिफॅब्रिकेडेट तत्त्वावर बांधण्यात येईल. ह्या सर्वांवर ताण करण्याकरिता त्याची वास्तुरचना पाहून आकर्षित झालेला मॉर्गन नामक दलाल त्याच्याकडे आला.

सेंट हेलन येथे एक मॉटेल, सर्व्हिस स्टेशन व कॅसिनो बांधण्यासाठी मॉडेल (प्रतिकृती) करण्याची गळ त्याने दीपकला घातली. त्या ठिकाणी ह्या स्वरूपाच्या अनेक योजना फेटाळून लावण्यात होत्या. त्यामुळे दीपकला आपल्या कर्तृत्वास ते एक आव्हानच वाटले.

त्याने सेंट हेलनची पाहणी केली. विशेष म्हणण्यासारख्या वास्तू नसलेल्या गावात काहीतरी नवीन आकर्षक व सेंट हेलनला जगप्रसिद्ध करणारी वास्तू निर्माण करण्याचे त्याच्या मनाने घेतले. खरोखरच आधुनिक स्थापत्यशास्त्राचा चमत्कार म्हणावे असे मॉडेल त्याने तयार केले.

भारतासारख्या विकासाच्या मार्गावरील देशातील दीपकसारख्या तरुणाने, इंग्लंडसारख्या पुढारलेल्या राष्ट्रातील सेंट हेलनमध्ये विशेष म्हणण्यासारखी वास्तू नाही व मी ती करून दाखवीन, ही म्हणण्याची जिद्द धरावी, ही गोष्ट कौतुक करण्यासारखीच आहे.

विशेषत: कॅसिनो, मॉटेल हे शब्द आपणास अपरिचित. तरीसुद्धा त्याचे डिझाईन करण्याची जिद्द बाळगून अपार परिश्रम व सखोल अभ्यास करून दीपकने वास्तूचा आराखडा तयार केला.

मॉडेल बघून साहेबाने दीपकला अक्षरश: डोक्यावर घेतले. वार्ताहरांनी दीपकला भंडावून सोडले. पूर्वेकडील अतिहुशार विद्यार्थी म्हणून त्याची मुलाखत घेण्यात आली.

उण्यापुऱ्या पंचवीस वर्षांच्या तरुणावर सारी मदार टाकणाऱ्या इंग्रजांच्या

धाडसी वृत्तीचे कौतुक करावे, की ती जबाबदारी बळकट जिद्दीने पार पाडणाऱ्या व जगप्रसिद्ध वास्तू रेखाटून सेंट हेलनला प्रसिद्ध करणाऱ्या दीपकचे कौतुक करावे, हा प्रश्न मनापुढे उभा राहतो.

तीन कोटी रुपयांची वास्तू अवघ्या सव्विसाव्या वर्षी रेखाटण्याचे भाग्य दीपकला मिळाले. पण नशिबाचा हात दीपकने आपल्या कर्तृत्वाने आणि जिद्दीने पकडला.

## हे आहे तरी काय ?

ही वास्तू तीन कोट रुपयांची असून त्यात कॅसिनो, मॉटेल, सर्व्हिस स्टेशन ह्यांचा समावेश असेल. कॅसिनो (रात्री विलास करण्याची जागा. मदिरा आणि मदिराक्षींच्या संगतीत द्यूत खेळण्याचे क्रीडास्थान.) पिरॅमिडच्या आकाराचे असेल. त्याची छपरे तांब्याची किंवा पितळेची असतील. ही उतरती छपरे तलावाकाठच्या पर्वतराजींची रांग भासतील.

समोरच्या तलावात जलक्रीडेची सोय असून नावेसाठी विश्रांतिधाम असेल. मॉटेल (हॉटेलचाच एक प्रकार—जेथे आपण आपल्या वाहनासकट जाऊ शकतो.) दुमजली असून, खांबाच्या खांद्यावर विसावले असेल. एखाद्या झाडाखाली दमलेला पांथस्थ जसा विश्रांतीसाठी छायेचा आधार घेऊन सुटकेचा निश्वास टाकतो, तशा तीनशे मोटारी मॉटेलच्या खाली छायेत दीर्घ दौडीनंतर विसावतील. मॉटेलला जोडूनच सर्व्हिस स्टेशन असेल. सर्वांच्या खिशास परवडेल असे सेल्फ सर्व्हिस स्टेशन येथे निर्माण होईल.

अशा आलिशान कॅसिनो मॉटेलमुळे सेंट हेलेन काही दिवसांतच रात्री यक्षनगरी भासेल आणि जाणारे प्रवासी आठवणी काढून म्हणतील, " रंगल्या रात्री अशा ! " आणि जमलेल्या प्रवाशांस वाटेल, " स्वर्ग अवतरला भूवरती. "

ह्या वास्तू आणि दीपकसंबंधी बोलताना मॉर्गन म्हणतात, " He has got tremendous ideas–They are progressive, just the kind of thing, in fact, we were looking for. He is a young man who should be an asset to his country when he returns home. "

ह्या यशानंतरदेखील दीपक म्हणतो, -" ह्यात कौतुक ते कसले ? माझ्या आई-वडिलांनी माझ्यासाठी ज्या हालअपेष्टा काढल्या, त्याचेच हे फळ आहे. कौतुक करावयाचे तर त्यांचेच. त्यांनी मला स्वावलंबनाचे, कष्टाचे व प्रामाणिकपणाचे आणि जिद्द बाळगण्याचे जे धडे दिले, त्याचीच ही फळे आहेत. माझ्या वडिलांच्या बुद्धिमत्तेचा व व्यावहारिकपणाचा लाभ मला नेहमीच झाला. " दीपक अजूनही पुढे काय करावे ह्याचा सल्ला वडिलांकडूनच घेतो.

नेहमी व्यवहार, प्रामाणिकपणा, ढोंगी जगाच्या चालीरीती समजावून देणारे व जिद्द बाळगण्याचे आव्हान करणारे वासुदेवराव एका बाजूला, तर त्याच्या अभ्यासासाठी परिश्रम घेणाऱ्या व भाविकतेचा खोल ठसा त्याच्या मनावर उमटवणाऱ्या सरोजिनीबाई दुसऱ्या बाजूस! लहानपणापासून वासुदेवरावांनी दीपकला आपल्या पायांवर उभे राहण्यास शिकवले. बऱ्यावाइटाचा अनुभव त्यास घेऊ दिला, मगच वाईट ते वाईट हे दाखवून दिले. आपण न भिता आपल्या मनास म्यावे व Be a man या मोलाच्या शिकवणी त्यांनीच दिल्या.

दीपक लहानपणापासूनच गाण्याचा शौकीन. कुठल्या चांगल्या गवयाची मैफल म्हटली, की स्वारी धावलीच. कुमार गंधर्व विशेष प्रिय. अनेक शास्त्रोक्त गाण्यांच्या ध्वनिमुद्रिकांचा संग्रह त्याने केला आहे.

नाटकांची तर भलतीच आवड. जे. जे. मधून त्याने इंटर कॉलेजिएट स्पर्धांसाठी कामे केलीच. पण लंडनमध्ये 'विठ्ठल तो आला आला' हे नाटक इंग्लंडच्या मंत्रिमहाशयांपुढे करून त्यांची वाहवा मिळविली. बुद्धिबळ हा आवडता खेळ. आपल्या वडिलांशी व भावाशी खेळण्यात जी मजा असे, ती लुटण्यास न मिळाल्याने त्याला भारतात येण्याचा मोह होतो.

येत्या जूनमध्ये भारतास धावती भेट देण्याचा त्याचा विचार आहे. त्यानंतर परत जाऊन पीएच्. डी करण्याचा त्याचा मानस आहे.

भारतात परतल्यावर आपण स्वत: आकर्षक व प्रिफॅब्रिकेटेड घरबांधणी करू, असा त्याला विश्वास वाटतो. प्रिफॅब्रिकेटेड तत्त्वाचा स्थापत्यशास्त्रास साजेसा उपयोग करण्याची त्याची मनीषा आहे. जमल्यास आपल्या ज्ञानाचा उपयोग कॉलेजकुमारांस देण्याची इच्छा आहे. आपण ज्या कॉलेजात शिकलो, त्या कॉलेजात शिकविण्यास त्याला आवडेल.

## संधी! संधी!! संधी!!!

जे. मॉर्गन यांच्या मते दीपकला दिलेले आव्हान त्याने स्वीकारून एक सुंदर कलाकृती निर्माण करण्याकरिता जी जिद्द मनात धरून त्याने परिश्रम केले; ही जगभर वाखाणणी करण्यासारखी गोष्ट आहे.

त्याच वेळेस एक विचार मनास चटका लावतो, की आजची तरुण पिढी योग्य संधी आणि आव्हान दिल्यास ती पुरी करण्यासाठी सिद्ध आहे. म्हणजेच आजचा तरुण एका अर्थाने देशासच प्रतिआव्हान करतो, की आम्हास योग्य संधी द्या, आव्हान द्या. त्याचे पुरेपूर श्रेय आम्ही देशाच्या पदरात घालू. असा आत्मविश्वास सहा महिन्यांच्या अवधीत आपल्या देशाच्या दोन नवयुवकांनी म्हणजे डॉ. जयंतराव नारळीकर आणि श्री. दीपक कुलकर्णी ह्यांनी दिला आहे. तसे शुभयोग येण्यास

देशाने आपल्या नवयुवकांचे आव्हान स्वीकारून योग्य ते प्रोत्साहन आणि संधी दिल्यास आपल्या देशातील हजारो माणिके जगास पटवून देतील, की आम्ही तुमच्याबरोबर केवळ नव्हे, पण एक पाऊल पुढे आहोत. तेव्हा आपला स्वतंत्र भारत हे आव्हान स्वीकारेल का, असा प्रश्न सर्वसाधारणपणे मनापुढे उभा राहतो.

पण मला वाटते, आजच्या जयंत–दीपक यांना संधीची वाट पाहत बसण्याची वेळही येणार नाही. नवभारताच्या कर्तृत्वांच्या नवोन्मेषशाली प्रतिभा आजच्या नवयुवकांत साकार होत आहेत. उद्याचा भारत, विकासाच्या अधिक विस्तृत होत जाणाऱ्या क्षितिजकडांचा मागोवा घेण्यासाठी, अशाच नेत्रदीपक बुद्धिचापल्याची अपेक्षा करीत आहे. आजच्या युवकांचे कर्तृत्व हाच उद्यांच्या नवनिर्मितीचा पाया आहे. दीपकच्या बुद्धीची प्रभा फाकली इंग्लंडमध्ये, पण त्या प्रभेच्या प्रकाशान भारतीय क्षितिजे उजळावीत अशी त्याची मनीषा आहे. किती सार्थ आहे हे !

[ महाराष्ट्र काँग्रेसचे मासिक–मुखपत्र ' नवयुवक ' यांच्या सौजन्याने ]


# स्टेट बँकेच्या ट्रॅव्हलर्स चेकसवर

आता

# कमिशनसुद्धा आकारले जात नाही !

*आता भारतात ट्रॅव्हलर्स चेक्स विकत घेताना तुम्हाला कमिशनसुद्धा द्यावे लागत नाही. आणि तरीसुद्धा तुम्हाला तीच सुरक्षितता आणि सोय लाभते. कसलीही काळजी नाही. कुठलीही अडचण नाही !*

आम्ही रु. ५० आणि रु. १०० चे आमचे स्वतःचे ट्रॅव्हलर्स चेक्स काढलेले आहेत. बँकेच्या किंवा तिच्या उपशाखांच्या १९०० कचेऱ्यांपैकी कोठेही हे चेक्स तुम्ही वटवू शकता किंवा विमानतळ, हॉटेले, दुकाने अशा ठिकाणी–येथे आणि परदेशांतसुद्धा असणाऱ्या एजंटांकडे तुम्ही हे चेक्स वटवू शकता. ते कुठेही, केव्हाही वटवता येतात– बँका बंद झाल्यानंतरसुद्धा !

## सेवेसाठी स्टेट बँक

# व्यथाफूल

विठ्ठल चलवादी

धुरकट सायंकाळ असते. ओढलेल्या चेहऱ्याचे थकले-भागलेले असंख्य जीव गर्दीच्या लाटेपासून दूर पळत असतात. जगाचे अस्तित्व विसरलेली काही माणसं बेहोष झाली आहेत. कसलं तरी गूढ, अनामिक पण संवेदनात्मक गुंजन त्यांच्यात चाललेलं असतं. सारं बदलल्यासारखं वाटत असतं; पण रस्ता मात्र तोच आहे–सायंकाळ असूनही सुस्त पडलाय.

अशा हिंदकळणाऱ्या वातावरणात तो काहीसा बावरलेला असा दिसत आहे. त्याची नजर भिरभिरते एखाद्या भिंगरीसारखी! अथांग गर्दी डोळ्यांच्या वाहुल्यात तो साठवतोय, पण त्याच्या डोळ्यांना ते सारं असह्य होत असतं. बोट बोट वाढलेल्या दाढीतून तो हात फिरवीत असतो. त्याच्या हाताचं कातडं लक्तरागत लोंबकळत असतं. ते पाहून पाहणाऱ्याला शिसारी येत असते.

त्याची शून्यातली नजर चाळवते अन् त्याची सराईत पावले नकळत घरच्या ओढीने पुढे पडतात. तो थबकतो. एका दुकानासमोर उभा राहतो. 'शोकेस'मध्ये कितीतरी वस्तू आकर्षकरीत्या मांडून ठेवलेल्या असतात. एक चिमुकली बॅट त्याचं चित्त वेधून घेते.

"केवढ्याला ती बॅट?" न राहवून तो विचारतो.

"नऊ पंचेचाळीस!" दुकानदाराचे निर्विकार उत्तर.

किंमत ऐकताच तो दचकतो.त्याच्या खिशात एक पैदेखील नसते. तो केविलवाणा हसतो. कुणासाठी बॅट? कोण खेळणार? आपण! गेलं ते बालपण अन् ते खेळणं......

कुणाचा तरी त्याला धक्का लागतो अन् तो ओशाळतो. लगेच भानावर येतो.



यांत्रिक बाहुलीसारखा हलतो, पण जाता जाता पुनश्च एकदा 'शोकेस'मध्ये ठेवलेली बॅट न्याहाळतोच.

त्याच्यामागून आम्ही दोघे चाललोय्–न बोलता. चालता चालता तिचा खांद्याचा चुकून मला स्पर्श होतोय्. त्या सुखाने मी शहारतो. तिच्या जवळून अधिक खेटून मी चालतोय्, ते तिच्या लक्षात येतंय्. किंचित दूर होऊन ती विचारते, "तो तुला ठाऊक आहे का?"

तिने बोट दर्शविल्या ठिकाणी मी पाहिलं. मघाचा दुकानासमोर उभा राहिलेला तो वेडा– हो वेडाच! त्याच्याकडे तिने बोट दर्शविले होते. मी नकारात्मक मान हलवली. मला अंधुक आठवत होतं. कुठंतरी त्याला पाहिल्यासारखं वाटत होतं. कुठं वरं पाहिलं याला? मी विचार करू लागलो. हळूहळू मला आठवू लागलं. एकूण स्मृतीने दगा दिला नव्हता तर! ......

......कुठला तरी 'ऑफ्' पीरियड होता. मनस्वी कंटाळा आला होता. सायकल हातात धरून कॉलेजमधून मी बाहेर पडलो होतो. उन रणरणत होतं. सायकलवर न बसता ती हातात धरून मी पायीच चालत होतो. विचारांच्या तंद्रीत असताना ती भंग पावली. कारण कुठेतरी होणारा अन् ऐकू येणारा गलबला अगदी कानांशी ऐकू आला. मी चमकून वर पाहिलं. दोन पोलीस एका विचित्र दिसणाऱ्या माणसाला ओढीत नेत होते. विचित्र म्हणण्याचं कारण असं, की त्याचा सारा

अवतार सामान्य माणसातही वसत नव्हता, की धड मवाल्यातही वसत नव्हता. बोट बोट वाढलेली दाढी, तेलाचा स्पर्श न झालेले पांढरे मातट केस, सुरकुतलेला चेहरा, ठिकठिकाणी फाटलेला मळकट सदरा अन् त्याला शोभेलसा तसाच पायजमा. सर्वांत किळसवाणी गोष्ट म्हणजे त्याचे दोन्ही हात बाहेर होते अन् त्या दोन्ही हातांची पांढरीफेक कातड्याची लक्तरे लोंबकळत होती. त्याचं तोंड सारखं हलत होतं. तो वेडा होता, यात काही संदेह नव्हता.

माझी उत्सुकता जागृत झाली. अभावितपणे सायकल पोलीस-स्टेशनसमोर थांबली डोळे फाडफाडून मी समोर पाहू लागलो. चेहऱ्याची रेघदेखील क्षणमात्र न ढळविता इन्स्पेक्टर त्याच्यावर प्रश्नांची सरबत्ती करीत होता अन् तो मात्र जोरजोराने मान हलवून नाही म्हणून सांगत होता.

गर्दीच्या कुजबुजीवरून थोडंसं उडत उडत कानी आलं. त्यानें म्हणे एका मुलाला पळवून नेण्याचा प्रयत्न केला होता, पण तो प्रयत्न फसला होता अन् तो मात्र पोलिसांच्या जाळ्यात गवसला होता.

दोघा पोलिसांनी त्याला बाहेर आणलं. तो आता मात्र बडबडत होता– " मला तुला एकदाच पाहायचंय् बब्या...मला सारं अनुभवायचंय् ! म्हणून तुला मी पाहिले अन् तुझ्या जागी... ! काय सांगू तुला... पण तेवढ्यात मला पकडलंन् ! ..."

तो वेडा होता. बब्या नावाचा त्याचा मुलगा असावा. त्याच्या आठवणीने त्याने रस्त्यावरच्या एखाद्या पोराला पकडलं असावं अन् तेवढ्यात पोलिसांनी...

अन् आज ! तो तोच होता !

तिच्या प्रश्नाने मी भानावर आलो.

"छे ! मला कसं माहीत असणार ?"– मी कसनुसा हसलो.

" तो एक गुणी परंतु शापित कलावंत आहे."

" म्हणजे ? "

" तो लेखक आहे !– म्हणजे होता. कुणालाच माहीत नव्हता, कारण कुठेही कुठलेही त्याचे काही प्रकाशित झाले नाही. झालं असतं, पण दुर्दैव ! काही माणसे दुर्दैवासाठी जन्माला येतात जणू ! जन्म होतो तोसुद्धा दुर्दैवाने ! अन् जगाची सारी दारं बंद होतात तीसुद्धा दुर्दैवाने ! ...

" जरा स्पष्ट बोलशील का ?"

" माफ कर मला ! त्याने एक कादंबरी लिहिली होती, पण ती प्रकाशात येऊ शकली नाही. का ते मला विचारू नकोस. कारण मलाही माहीत नाही अन् माहीत असलं तरी नीटसं कळलं नाही. अजूनही नाही. "

" पुढे बोल. "

" तर ती त्याची कादंबरी – मला नाव नक्की ठाऊक नाही. त्या कादंबरीचा नायक होता बब्या – नक्की ठाऊक नाही मला. "

" म्हणजे ? बब्या... बब्या...?"

ती बारीक हसली. " त्याचा मानसपुत्र –"

हळूहळू मला समजू लागलं.

" हं, आता आठवलं !" पापण्या वर–खाली नाचवीत ती उद्‌गारली.

" काय ?"

" त्या कादंबरीचं नाव ' व्यथाफूल ' असं होतं. "

" व्यथाफूल ?"

" हं !"

" त्या कादंबरीचं काय झालं ?" मी विचारलं.

" तेच सांगते ना ! कादंबरीचं हस्तलिखित ज्या कपाटात ठेवलं होतं, ते कपाटच संपूर्णपणे जळालं. "

" अरेरे !" माझी सहानुभूतीची पाल चुकचुकली.

" हस्तलिखित असलेलं कपाट वाचवायला गेला, पण दुर्दैव ! त्याचं हस्तलिखित तर जळालंच, पण दुर्दैव असं, की त्याचे हात–दोन्ही हात–भाजून निघाले अन् केळाच्या सालीसारखी कातडी निखळली !"

" माय गॉड ?"

तो वेडा–छे ! कलावंत जड अंतःकरणाने पावले पुढे टाकीत होता. गाठावं का त्याला ?

" कादंबरीचं कथानक सांग ना मला ?" नष्ट झालेल्या कादंबरीचं अंतर्मन मी चाचपू लागलो.

" मी ती संपूर्ण वाचली नाही; पण सुरवातीची एक–दोन प्रकरणं हाती लागली, तीच वाचली. तेवढ्यावरून सबंध कादंबरीच्या कथानकाचा अदमास कसा बरे लावता येईल ?"

" म्हणजे तुझी न् त्याची ओळख होती ?"

" होती. आता नाही !" सुस्कारा टाकून ती म्हणाली, " तो आता कुणालाही ओळखीत नाही. म्हणजे तशी त्याची स्थिती झालीय्. तर ती कादंबरी म्हणजे एका दुर्दैवी अश्राप बालकाची करुण कहाणी होती. आई–बाप नसलेल्या, अनाथ बालकाचं अती वास्तव, परिणामकारकरीत्या चित्रण त्या कादंबरीत होतं. खरोखर ती जर प्रकाशात आली असती तर एक उत्तम कलाकृती म्हणून गाजली गेली असती. पण..."

" पण पुन्हा त्याला लिहिता येणार नाही का ?" माझा प्रश्न अनाठायी, निरर्थक होता.

आता त्याच्यात आणि आमच्यात केवळ पन्नास हातांचे अंतर होते. जलद पावले टाकून त्याला गाठता आलं असतं; पण मन उगाच हिंदकळलं, हृदय थरारलं. त्याने

दोन्ही हात खिशातून बाहेर काढले होते. त्याच्या कातडयाची फाटकी लक्तरे लोंबकळत होती अन् पांढराफटक पडलेला हात भेसूर दिसत होता.

आता अंधार पडला होता. रस्त्यावरचे फिकट प्रकाशाचे दिवे काजव्याप्रमाणे लुकलुकत होते. त्याची पाठमोरी आकृती काळोखातदेखील ओळखू येत होती पायाची गती मंदावली.

"तुला ठाऊक आहे ?"

"काय ?"

"त्या कादंबरीचं हस्तलिखित—"

"थांबलीस का ?"

ती बोलली नाही. तिचा स्वर बदलला.

"कादंबरीचं मूळ हस्तलिखित त्यानंच नष्ट केलं !"

"माय गॉड !"

"कपाटाला काडी लावली अन् भकास मुद्रेने स्वतःच्या कलाकृतीचा नाश त्याने उघडया डोळयाने पाहिला. एकाएकी त्याच्या मनात संचारलं. त्याच्यातला अभिजात कलावंत जागा झाला. स्वतःच्या मानसपुत्राला आवेगाने वाचवायला गेला अन् बोटातील जादू गमावून बसला."

"पण...पण...त्यानं असं का केलं ?"

"हं ! मला तरी कुठे ठाऊक आहे !"

"तू त्याला अडवलं नाहीस ?"

"मी तिथे नव्हते. मागाहून कळालं सारं —"

क्षणभर कोणीच काही बोललं नाही. ती शांत होती खरी, परंतु अंतर्यामी तिच्या मनात तुफान माजलं होतं. त्याचा थांग लागणे कठीण होते.

गार वारा अंगाला झोंबत होता. दोन्ही हात खिशात खुपसून मी तिच्याबरोबर चालत होतो. दूरवर काजव्याप्रमाणे चमकणारे दिवे जवळजवळ येत होते. न राहावून मी म्हणालो, "कदाचित ती कलाकृती त्यास अनुभूतिशून्य वाटली असेल; कदाचित ती सूक्ष्म, तरल, क्षणभंगुर असेल आणि प्रत्यक्ष कृतीत उतरणारी नसेल, कदाचित...!

"थांब ! थांब !" ती धापा टाकीत होती. मी चरकलो. आश्चर्याने तिच्याकडे पाहू लागलो. कपाळाचा घाम पुशीत ती म्हणाली, "कादंबरीत त्याच्या जीवनाचं खरंखुरं, वास्तव, मूर्तिमंत असं प्रतिबिंब उमटलंय् !"

"म्हणजे ?"

"म्हणजे कादंबरीचा नायक तो स्वतः आहे. ती कादंबरी म्हणजे त्याच्या दुर्दैवी जीवनाची कहाणी आहे. आत्मचरित्रच म्हण ना ! जगात उघडयावर येऊन त्याला पुरते अठ्ठेचाळीस तासही झाले नव्हते, तोच त्याची रवानगी अनाथ-आश्रमात झाली.

त्याचं सारं आयुष्य अनाथ बालकाश्रमात गेलं. त्याच्या आई-बापाची नावं त्याला सांगता येत नव्हती, की लावता येत नव्हती. त्याहून दुर्दैव म्हणजे जीवनात तो कमालीचा अयशस्वी ठरला. जीवनातून तो कायमचा उठला. अपयशाच्या ठोकरीने सतत तो रक्तबंबाळ होत राहिला. शेवटी त्याला सारं असह्य झालं. मग आपली सारी कहाणी त्याने लिहून काढली. ती प्रसिद्ध करावी असं त्याच्या मनात आलं. लगेच तो एका प्रकाशाकडे गेला, पण प्रकाशकाने त्याची कादंबरी प्रकाशित करण्याचं नाकारलं."

"मग हा मार्ग पत्करला त्यानं ?"

"होय !"

ती गप्प बसली. मीही मनातून हळहळत होतो.

"तुला एक शेवटची गोष्ट सांगायची राहिलीय्." ती म्हणाली. यावेळी तिचा स्वर थोडा कातर झाला होता.

"कोणती ?" मी विचारले.

क्षणभर ती गप्प बसली. बोलावं की न बोलावं याचा विचार ती करीत असावी. शेवटी मान हलवून खेदाने म्हणाली,

"तो माझ्यावर प्रेम करीत होता !"

"मग ?"

"मी ते अव्हेरलं. माझ्या मनात तसं नव्हतं, पण ते घडलं. का घडलं ते मात्र विचारू नकोस. कारण माझ्याप्रमाणे तुलाही ते ठाऊक आहे. माहीत झालं आहे !"...

ती आवेगाने बोलत होती अन् सुन्नपणे मी ऐकत होतो.

• • •


स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

**शर्मा स्वीट मार्ट**

दत्तमंदिराशेजारी,
मंडई रस्ता, पुणे २.

# जे नव्हते ध्यानी मनी

## *We never meant to go so far*

या माविस रॉन्सन (Mavis Ronson) कृत पुस्तकाचा परिचय

लेखांक दुसरा

[ सूत्र : ' एका फळाच्या लॉरीतून दोघींनी युगोस्लाव्ह सरहद्दीकडे मोर्चा वळवला होता. रस्त्यावर खासगी मोटारी अशा दिसतच नव्हत्या. एखादी लॉरीच अधूनमधून भेटत होती. लॉरी बदलत बदलत दोघी पुढे चालल्या होत्या...... ]

मॉटेनेग्रो या नावाच्या खेड्यात त्या पोचल्या. त्या खेड्यात फक्त सातआठ घरेच होती. अगदी गलिच्छ असे एक हॉटेल रस्त्याच्या कडेला होते. त्या हॉटेलात स्त्रिया अशा त्या दोघीच होत्या. आसपास घोटाळणारी, हॉटेलात शिरणारी माणसे मोठी विचित्र होती. दाढया वाढलेली. ती माणसे बुभुक्षित नजरांनी त्यांना न्याहाळत होती. त्यांची सर्व भाषा त्या दोघींना समजत नव्हती व त्या दोघींचे इंग्रजी त्यांना कळत नव्हते. सायंकाळ झाली होती. रात्र पडण्यापूर्वी एखादी लॉरी भेटली नाही तर या भयानक वातावरणात रात्र काढायची कशी, या विचाराने दोघी हवालदील झाल्या होत्या. आणखी दोन तास तसेच गेले आणि रस्त्यावर लॉरीचा हॉर्न वाजला.

दोघी धावत हॉटेलबाहेर आल्या व टाळ्या वाजवून त्यांनी लॉरी थांबवली. लॉरीवाला कोण आहे, हेदेखील ठाऊक नसताना त्यात चढू नये हे त्यांना समजत होते; परंतु त्या ठिकाणी थांबण्यातही तेवढाच धोका होता. लॉरीत ड्रायव्हर धरून दोघेच होते. तो माणूस क्लीनर वाटत होता. बाहेर हॉटेलात जी माणसे होती, त्यांच्यातलाच तो शोभत होता. नजर भुकेकंगाल होती, ओठ पातळ होते, नजर चांगली नव्हती. लॉरी थांबताच तो खाली उतरला व माविस आत चढून ड्रायव्हर-शेजारी बसताच तो चपळाईने आत चढला. अर्थात बार्बारालाही त्याच्या पलीकडे बसावे लागले. म्हणजे तो माणूस माविस व बार्बारा ह्यांच्यामध्ये बसला. तीन माणसांच्या जागेत ड्रायव्हर धरून चारजण आता होती. अर्थात सर्वजण एकमेकांना खेटून बसली होती.



लेखिका

लॉरी सुरू झाली. मैलभर गावाबाहेर आलो. ड्रायव्हर रस्त्यासमोर पाहत गाडी हाकीत होता. परंतु मध्ये बसलेल्या त्या माणसाने आता माविस व बार्बारा यांना त्रास देण्यास सुरवात केली. दोघींना आलटून पालटून तो जवळ ओढू लागे. दोघींच्या मांड्यांवर चापट्या मारी.

त्या दोघींनी ड्रायव्हरकडे पाहिले. तो गालातल्या गालात हसत होता. त्याला आपला दोस्त काय मजा करीत आहे, हे बाजूला न पाहताही कळत होते. माविसने त्याला आम्ही चांगल्या घरातल्या प्रवासी मुली आहोत, हे मोडक्यातोडक्या भाषेत पुन:पुन: सांगण्याचा प्रयत्न चालवला होता. परंतु ड्रायव्हरशी मैत्री करण्याचा प्रयत्नही फसला व दोघींच्यामध्ये बसलेल्या ह्या माणसाचे चाळे आणखीच धीट होऊ लागले.

आता तर पाऊस सुरू झाला. बाहेर काळोख आणि मुसळधार पाऊस. रस्त्यावर चिटपाखरू नाही. बार्बारा तर रडायलाच लागली. माविस धीर धरून शेजारी बसलेल्या माणसाचा शक्य तेवढा प्रतिकार करत होती. तासभर असाच त्या दोघींना काढावा लागला. तितक्यात मागल्या बाजूने येणाऱ्या वाहनाचा उजेड लॉरीच्या दोन्ही अंगांना जाणवू लागला.

दोघींनी लॉरीत आरडाओरडा करून लॉरी थांबवण्यास ड्रायव्हरला भाग पाडले व दोघी खाली उतरल्या. तो माणूस पाठोपाठ खाली उतरला व लॉरीस पुढे जाण्यास

सांगू लागला. दोघींच्या ध्यानात आले की, तो क्लीनर नव्हता, असाच कोणी भणंग होता. खाली उतरून तो बार्बाराशी पुन: मोटारीतले चाळे करू लागताच बार्बाराने त्याच्या तोंडावर रट्टा हाणला. थोडीशी धक्काबुक्की करून तो माणूस अखेर लॉरी-बरोबर निघून गेला.

मागून येणाऱ्या लॉरीत दोघी चढल्या.

अशाच तऱ्हेने कधी उपाशीपोटी तर कधी भीतिपोटी प्रवास क ीत दोघी अथेन्सला पोचल्या. तेथे एका इराणी सेनाधिकाऱ्याशी त्यांची ओळख झाली. सॅलोनिका येथून स्वत:च्या मोटारीने तो बगदादला जाणार होता. दोघींना बरोबर नेण्याचे त्याने मान्य केले.

## ज्यू आणि अरब

नव्या मित्राबरोबर प्रवास सुरू झाला. तुर्कस्तानातून प्रवास होणार होता. मोटारीत संभाषणात त्याच्या लक्षात आले, की ह्या मुली कदाचित ज्यू-वंशीय असतील. शंका येताच त्याची घाबरगुंडी उडाली. अरबांचे आणि ज्यूंचे हाडवैर. ह्या दोघी ज्यू–हेर असल्या तर? इस्तंबूलला त्या दोघींना त्याने खाली उतरण्यास सांगितले. दोघींच्या बँक–खात्यावर फक्त एक पौंड सात शिलिंग शिल्लक होते. पैसे पुरवायला हवे होते. जवळ होते त्याच्यात हॉटेलात राहणे शक्य नव्हते.

इस्तंबूलला घाणेरड्या रस्त्यांतून व गल्ल्यांतून त्या दिवसभर फिरल्या. चणे-दाणे खात त्यांनी भूक भागवली व अखेर इस्तंबूल ते अथेन्स गाडी पकडून त्या अथेन्सला परतल्या.

तिथे त्यांना कळले की, लेबॅनान–व्हिसा सहज मिळतो व तेथून त्यांना बैरुतला जाता येईल. लेबॅनान नावाचा देश आहे, हेदेखील त्यांना माहीत नव्हते. पहिले बंदर लागते अलेक्झांड्रिया! आयुष्यात इतके दारिद्रय त्यांनी पाहिले नव्हते. म्हातारेकोतारे इजिप्शियन भिकारी आरडाओरडा करीत प्रवाशांच्या अंगावर तुटून पडत होते. दोघी बोटीच्या डेकवरून हे सर्व पाहत होत्या. खाली उतरावेसेच त्यांना वाटत नव्हते.

दोन दिवसांनी बोट बैरुतला पोचली. दोघी उतरू लागल्या; परंतु डेक अधिकाऱ्याने सांगितले —

"तुमच्याजवळ परवाना नाही. ग्रीसला परत जा!" दोघी बोटीवरच अडकून पडल्या. अधूनमधून अधिकारी येत; प्रश्न विचारीत. एकाने बार्बाराला विचारले —

"नावावरून तुम्ही ज्यू आहात असे वाटते?"

बार्बारा चिडून म्हणाली—

"समजा, मी ज्यू असले तर काय झाले?" तो लेबॉनीझ अधिकारी दचकलाच!

"अरबांच्या देशात आणि ज्यू! शांतं पापम्!"

दोघी अखेर भुकेने रडू लागल्या. या अखेरच्या अस्त्रापुढे अधिकारी नमला. त्याने दोघींना निदान बोटीखाली उतरू दिले व दोन दिवसांत लेबॅनान सोडा, अशी ताकीद दिली.

सीरियन पोलीस अधिकाऱ्यांशी हुज्जत घालून अखेर सीरियातून प्रवास करण्याची परवानगी दोघींनी मिळवली. दोघी दमास्कसला पोचल्या. दमास्कस म्हणजे मध्यपूर्वेतले पॅरिस असे म्हणतात. आधुनिक स्वच्छ, सुंदर रस्ते, मध्यभागातला बाजार, तेथे व्यापार करणारे शेख यांचे निरीक्षण करीत फिरत असताना एका काळा झगा घातलेल्या शेखने दोघींना गाठले. स्वच्छ इंग्रजीत त्याने विचारले,

"तुम्ही माझ्या देशातली संस्कृती पाहण्यासाठी प्रवास करीत आहात असे दिसते. हरकत नसेल तर मी तुमच्याबरोबर येतो."

त्याचे वय पन्नाशीचे होते. तो नाकी-डोळी नीटस होता. बार्बारावर तर त्याचे प्रथमदर्शनीच प्रेम जडले. पर्शियन आखातातील आपण श्रीमंत शेख आहोत, अशी आपली ओळख त्याने सांगितली. पुढे त्याने सांगितले –

"आमच्या इथे तुमच्याजवळ किती उंट आहेत, यावर श्रीमंती मोजली जाते. ज्याच्याजवळ अमाप उंट असतील, त्याला वाटेल तितक्या बायका मिळू शकतात."

या उंटावरच्या लक्ष्मीपुत्राशी अशी जानपहचान होते न होते तोच त्याने बार्बाराकडे पाहत म्हटले, "हिच्याकरता मी सदुसष्ट उंट देण्यास तयार आहे."

बार्बाराच्या तोंडून शब्दच फुटेना. तिने काही तरी बोलायचे म्हणून विचारले, "But who would get the camels ?" ("हे उंट मिळणार कुणाला ?") शेख माविसकडे पाहत म्हणाला, "का ? या तुमच्या बहिणीला मिळतील."

माविसने ओळखले की, हा नुसता उंटाघरचा नाही तर उंटावरचाही आहे. करा थोडी गंमत. ती म्हणाली, "तुम्ही म्हणता तसं करायला आमची हरकत नाही, पण दुर्दैवाने आमची लग्ने झाली आहेत."

विचारात पडल्यासारखे थांबून माविसने पुढे सांगितले – "पण तुम्ही मदत केलीत तर आमच्या नवऱ्यांचा काहीतरी निकाल लावता येईल."

माविसचे हे उद्गार ऐकताच शेखने गुडघे टेकून त्यांची माफी मागितली. तो म्हणाला –

"नको नको. असे करू नका. माझीच चूक झाली. तुमचे नवरे चांगले असले पाहिजेत. उगाच त्यांना मारू नका."

शेखला क्षमा करून दोघींनी दमास्कस–बगदाद बस पकडली. पंधरा तासांचा प्रवास आणि तोही वाळवंटातून. बसमध्ये सगळे शेखच भरलेले. पचापचा ते बसमध्ये थुंकत होते. चोळणे आणि झग्यांचे झोळणे सांभाळून सगळे त्या गोऱ्या छबेल्यांकडे टकाटका पाहत होते.

## बगदाद–तेहरान

दोघी बगदादला पोचल्या तेव्हा प्रवासाने फारच त्रासलेल्या होत्या. प्रवासाला निघतानाचा सगळा उत्साह व विनोदबुद्धी निपटून निघाली होती. बगदादमधल्या एका घाणेरड्या हॉटेलात त्या उतरल्या. हॉटेलात बाया पाहताच तिथले मुसलमानी आणि अरबी घोडे त्यांना आपल्या नजरांनी चाटू लागले.

रस्त्याच्या दुतर्फा उघडी हॉटेले होती. तिथे बसून चकाट्या पिटणारी, कॅरम खेळणारी माणसे त्यांना भीतिदायकच वाटत होती. इराकमध्ये त्या वेळी जी राजकीय अस्वस्थता होती, त्यामुळे गुंडांचे फावले होते. त्यामुळेच कदाचित हे असे असेल, असा त्यांनी तर्क केला.

बगदादमध्ये त्यांना आणखी दोघे तरुण प्रवासी भेटले. एक त्यांच्याच वयाची तरुण मुलगी होती. तिचं नाव कॉनी आणि तिचा मित्र होता तो नॉर्मन. चौघांनी तेहरानला बरोबर जाण्याचे ठरविले. फक्त माणसी तीस शिलिंग तिकिटात त्यांना सगळा प्रवास करण्यास मिळणार होता. माविस खुषीत होती. कारण तिने अजून बसची अवस्था पाहिली नव्हती.

बस सुरू होऊन पाच मिनिटे होताच गाडी अशी थाडथाड वाजू लागली की, स्प्रिंग नावाचा अवयव या गाडीत कुठेही नाही, याची खात्री पटली. कधी ढुंगण हदरावे तर कधी टाळके बसच्या छपरावर आदळावे, असा प्रकार मिनिटागणिक सुरू झाला. प्रवास ६०० मैलांचा होता.

दर पंधरा मिनिटांनी बगदादमध्ये महंमदाच्या जन्मदिवसासाठी म्हणून परतणारे बसमधले प्रवासी मोठमोठ्याने भसाड्या आवाजात प्रार्थना म्हणत. ती हिंदकळणारी बस, यात्रेकरूंचे ते भयानक सूर, मेंदीने केस रंगविलेल्या आणि पान खाणाऱ्या इराणी, इराकी म्हाताऱ्याकोताऱ्या यांच्या सहवासातला तो प्रवास हे एक दिव्यच होते.

दुसऱ्या दिवशी पाऊस लागला. आतापर्यंत सतत दोनशे मैल बसच्या चारी अंगाने आत येणारी धूळ व कचरा आता बंद झाला. चिखलातून चाके रपारपा आवाज करीत फिरत असताना एकदा बस कलंडली. मोठा आवाज झाला. सगळेजण टपावर आदळून वेडेवाकडे फेकले गेले. बस रस्ता सोडून फरफटत जाऊन अखेर रस्त्याच्या कडेला चिखलात रुतून थांबली. बसमधल्या म्हाताऱ्या मोठ्याने रडू लागल्या. कुणी मोठ्या आवाजात अल्लाला आळवू लागले. ज्यांना लागले होते ते हातपाय, डोकी चोळीत होते. चौफेर हलकल्लोळ बसमध्ये माजला.

ड्रायव्हर उतरून बसच्या मागील दरवाजाशी आला व ओरडून म्हणाला —

"गप्प राहा मंडळी ! जवळ आरडाओरडा ऐकू गेला तर तिथले टोळीवाले येतील. आपण घाटात आहोत. टोळीवाले तर सगळी चीजवस्तू धुऊन नेतील."

दोन तासांनी ड्रायव्हरने काही पोलिसांना बसपाशी आणले व बसभोवती उभे

राहून त्यांनी पहारा सुरू केला.

पहाटे ४–३० वाजता दुसरी बस आली. प्रवास सुरू झाला. पाचव्या दिवशी मळलेल्या, भुकेल्या, थकलेल्या आणि उबग आलेल्या अवस्थेत उतारू तेहरानला पोचले.

## 'लेडी'चा घोटाळा

माविस, बार्बारा, कॉनी व नॉर्मन एका हॉटेलात उतरली. बसचा ड्रायव्हर त्याच हॉटेलात उतरला. दुसऱ्या दिवशी बार्बाराला बरे नव्हते म्हणून ती घरीच झोपून राहिली. बाकी सर्व शहर पाहण्यास गेली होती. ही संधी साधून बससर्व्हिसचा तो ड्रायव्हर बार्बाराच्या खोलीत शिरला. बार्बाराने डोळे उघडले तो पलंगाजवळ ड्रायव्हर उभा. ती गडबडली. उठून बसली. ड्रायव्हरने तिच्या हाती एक छापील पत्रिका दिली. त्यावर तीन प्रश्न इंग्रजीत होते.

Are you girl ?

Are you wife ?

Are you lady ?

प्रत्येक प्रश्नापुढे होकार–नकार दर्शविणारे चिन्ह लिहिण्यासाठी चौकटीत जागा मोकळी सोडली होती.

बार्बाराची भीती जरा ओसरली. छापील प्रश्नावली देऊन मग तरुण मुलीबाबत काय ते करावयाचे ही तिथली सुसंस्कृत पद्धत या वेळी तिला आधार झाली. शिवाय दमास्कसमधल्या शेखचा अनुभव होताच.

'कुमारी' किंवा 'पत्नी' ही भानगडच नको म्हणून तिने 'Are you lady ?' या प्रश्नापुढे होकारचिन्ह केले.

सर्व्हिस ड्रायव्हरचा चेहरा उजळला. स्वारी खूष झाली. दिवसभर तो बार्बाराच्या उशाशी बसून तिची सेवा करीत होता. आजारी होती ना ती !

बार्बाराला वाटले, संकट टळले. रात्री माविस, कॉनी परतल्यावर सर्वजण हसले. पण दुसऱ्या दिवशी दुसरा धक्का ठेवला होता. सर्व्हिस ड्रायव्हरची स्वारी आपल्या पाच भावांसह हॉटेलात दाखल झाली. सहाहीजण सारखेच आडदांड वाटत होते. ही मंडळी का जमा झालीत हे कुणालाच समजेना. माविसने नॉर्मनला या पाहुण्यांना हॉटेलबाहेर नेऊन खायला–प्यायला देण्यास सांगितले.

नॉर्मन सगळ्यांना घेऊन हॉटेलबाहेर पडला. बाहेर त्याने त्यांना खायला घातले. थोडीशी दारू घेतल्यावर सर्व्हिस ड्रायव्हर म्हणाला, "लेडी बार्बाराचे आम्ही दोस्त आहोत."

नॉर्मन म्हणाला,

"लेडी बार्बाराचेच का ? आपण सर्वच एकमेकांचे दोस्त आहोत."

पण नॉर्मनचे म्हणणे त्यांना रुचेना. ते सर्व फक्त लेडी बार्बारासाठी आलेले होते,

असे ते सांगू लागले. नॉर्मनला शंका आली. लेडी या शब्दात काहीतरी घोटाळा असावा. त्याने विचारले, "लेडी म्हणजे काय?" मॅक्झिम ड्रायव्हर एखाद्या अडाण्याकडे पहावे तसे नॉर्मनकडे पाहत म्हणाला,

"बार्बारा लेडी आहे. गर्ल म्हणजे जिला अजून नवरा नाही ती. वाईफ म्हणजे जिला नवरा आहे ती. लेडी म्हणजे जिला कितीही नवरे असतात ती. आम्ही सर्वजण लेडी बार्बाराशी लग्न करणार आहोत."


नॉमर्नने त्याची कशीतरशी समजूत घातली. जेव्हा तो हॉटेलात परतल्यावर बार्बारा व माविसला हा संवाद कळला, तेव्हा दुसऱ्या दिवशी हॉटेलला आतून कडी घालून आपल्या खोलीत दोघी बसल्या. बाहेर म्हणून पडल्या नाहीत.

नंतर बसने त्यांनी तेहरान सोडले. पण हा प्रेमात पडण्याचा प्रकार काही संपेना. तेहरान–काबूल मार्गावर वाटेत मेशेद हे गाव लागते. इराण–रशिया यांचे सरहद्दीवरील हे भकास गाव. माविस, बार्बारा तेथे पोचण्यापूर्वीच काही दिवसांत तेथील सर्व मुस्लिमेतरांची कत्तल करण्यात आली होती. गोऱ्या कातडीला मात्र तेथे अभय होते.

बार्बाराला येथेही बरे नाहीसे झाले. ज्या हॉटेलात त्या उतरल्या होत्या, तेथेच एक इराणी डॉक्टर उतरला होता. माविसने त्याला बार्बारासाठी बोलावले. इंग्लिश मुलीचा डॉक्टर म्हणून त्याला फार आनंद झाला आहे, असे माविसला वाटले. प्रकार मात्र पुन: सनातनच होता. हे महाशय बार्बाराला पाहून विरघळले होते. दुसऱ्यांदा डॉक्टर बार्बाराला पाहायला आला, तेव्हा तो पलंगाशेजारी गुडघे टेकून बसला. त्याने बार्बाराचे पाय धरले व लग्नाची याचना करीत तो तिच्या पायाची, पोटऱ्यांची चुंबने घेऊ लागला. बार्बाराने प्रसंगावधान राखून सांगितले, "लग्न कसे करणार! माझे लग्न झाले आहे."

हे ऐकताच डॉक्टरने गोंधळून उडीच मारली. त्याने बार्बाराची पुन:पुन: क्षमा मागितली आणि तो खोलीतून निघून गेला. बार्बाराच्या आजाराचे निदान न करताच तो निघून गेला. फक्त बोलावणे धाडताच खूष झालेल्या त्या इराणी डॉक्टरचे पक्के निदान त्या दोघींना मात्र झाले. [पुढील अंकी चालू]

**रा. म. शास्त्री**



# ज्ञा न वि ज्ञा न

## □ सिंकियांग....चीनची वसाहत !

रशिया-चीनमध्ये संघर्ष निर्माण झाल्यापासून रशियाच्या सीमेलगतच्या सिंकियांग, तिबेट, आंतर्मंगोलिया या प्रदेशात ' हान ' म्हणजे मूळ चिनीवंशीय लोकांची मोठ्या प्रमाणावर वस्ती करण्यास चीनने सुरवात केली आहे. या भागात फौजांचीही जमवाजमव चीनने केली असल्याच्या बातम्या आहेत. सिंकियांगमधील या घडामोडी भारताच्या दृष्टीनेही महत्त्वाच्या आहेत. तिबेटमधून सिंकियांगला जाण्यासाठी जवळचा मार्ग हवा म्हणून चीनने आपल्या लडाख हद्दीतून अकसाई चीन रस्ता बांधला. त्यातूनच पुढे भारत-चीन संघर्षास तीव्र स्वरूप आले.

सिंकियांगमध्ये किमान दहा लाख चिन्यांना कायम वसाहतीसाठी पाठविण्यात आले आहे. तिबेटप्रमाणेच सिंकियांगबद्दल बाहेरच्या जगाला फारशी माहिती उपलब्ध नाही. ' पूर्व तुर्कस्तान ' म्हणून हा प्रदेश पूर्वी ओळखला जात होता. १८७८ मध्ये तो चिनी साम्राज्यात समाविष्ट करण्यात आला व त्याला ' सिंकियांग ' नाव देण्यात आले. सिंकियांग चीनचा भाग असल्याचे मान्य करावे असा करार ब्रिटन व रशियात १९०७ साली झाला. सिंकियांगचे गव्हर्नर शेंगशिह-त्साई यांनी नोव्हेंबर १९४० मध्ये रशियाशी एक करार केला. त्यानुसार सिंकियांगमध्ये लोखंड सोडून बाकी खनिजांच्या खाणी काढण्याचे पूर्ण अधिकार रशियास पन्नास वर्षांच्या मुदतीने देण्यात आले. पण दुसऱ्या महायुद्धात हिटलरच्या नाझी फौजांविरुद्ध रशियाला सुरवातीला जे मोठे पराभव सहन करावे लागले; त्यामुळे रशियाला संरक्षणावरच सारे लक्ष केंद्रित करावे लागले. खाणी काढण्यासाठी सिंकियांगमध्ये पाठविलेले तंत्रज्ञ व अधिकारी रशियाने काढून घेतले. नोव्हेंबर, १९४४ मध्ये सिंकियांगमध्ये उठाव होऊन उत्तर सिंकियांगमध्ये पूर्व तुर्कस्तान प्रजासत्ताकाची स्थापना झाली. मंगोलिया ज्याप्रमाणे स्वतंत्र प्रजासत्ताक देश म्हणून अस्तित्वात आला, तसेच स्थान रशियाच्या पाठिंब्याने पूर्व तुर्कस्तान प्रजासत्ताकालाही मिळविता आले असते. रशियाने तसे केले असते तर आजच्या रशिया-चीन संघर्षात रशियाची बाजू अधिक बळकट झाली असती. पण पुढे चीनशी संघर्ष उद्भवेल, अशी स्टालिनला त्या वेळी कल्पनाही नसावी. तसेच हिटलरविरोधी युद्धात त्यावेळी तो एवढा गुंतला होता की त्याला दुसरीकडे पाहायला सवड नव्हती. सिंकियांगकडे नंतर लक्ष देता येईल,

हा विचार त्याने केला, पण ती चूक ठरली. १९४९ च्या सुरवातीला चिनी लाल सेना सिकियांगमध्ये आली व तेथे कम्युनिस्ट चीनची सत्ता प्रस्थापित झाली.

सिकियांगमध्ये स्थायिक होण्यासाठी चीनने जे लोक पाठविले, त्यांत मुख्यत: निवृत्त सैनिक किंवा प्रत्यक्ष सैनिकांचा भरणा आहे. रशियाशी युद्ध उद्‌भवलेच तर थोड्या अवधीत सेना उभारता यावी, हा उद्देश त्यामागे आहे. स्थायिक होण्यासाठी निवडलेल्यांत लाल सेनेतील निष्ठावंत निवृत्त सैनिक किंवा गनिमी युद्धात कुशल असलेले 'एट्‌थ रूट' आर्मीमधील सैनिक आहेत. शंभर सरकारी शेतांवर त्यांना स्थायिक करण्यात आले आहे. शेतांची व्यवस्था सुरवातीला वृद्ध सैनिकांकडे होती· आता ती तरुणांकडे सोपविण्यात आली आहे. यासाठी खास शिक्षण घेतलेले दहा हजार तरुण गेल्या वर्षी सिकियांगमध्ये पाठविण्यात आले. धान्य व इतर आवश्यक वस्तूंच्या उत्पादनात सिकियांग आता स्वयंपूर्ण झाला आहे. गेल्या वर्षी तेथील धान्य उत्पादन १९४९ च्या तिप्पट व कापूस उत्पादन सहापट वाढले. बीटच्या उत्पादनातही वाढ झाली आहे. सरकारी शेते म्हणजे केवळ शेते नसून, ती औद्योगिक केंद्रेही आहेत. तेथे यंत्रोत्पादक कारखाने, वीजकेंद्र, कापड गिरण्या व लोखंड-पोलादाचे कारखाने आहेत. रासायनिक खते, जंतुनाशके, ट्रॅक्टर व ट्रकचे भागही तयार होतात.

पण या सर्व विकासात स्थानिक 'युघुर' लोकांचा वाटा फार थोडा आहे. 'युघुर स्वायत्त प्रजासत्ताक' असे सिकियांगला दुसरे नाव चिनी राज्यकर्त्यांनी दिले आहे. पण सर्व महत्त्वाची अधिकारपदे व जबाबदारीच्या जागा सिकियांगमध्ये मुद्दाम स्थायिक होण्यासाठी पाठविलेल्या चिन्यांच्याच हाती आहेत.

## □ माणसे तशी मृत्युपत्रे

व्यक्ती तितक्या प्रकृती, त्याचप्रमाणे माणसे तशी मृत्युपत्रे. पंडित नेहरू आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांची मृत्युपत्रे जीवनाकडे पाहण्याच्या त्यांच्या दृष्टिकोनाची निदर्शक आहेत. थोरांची मृत्युपत्रे प्रसिद्ध होतात. सामान्य माणसांच्या मृत्युपत्रांना प्रसिद्धी मिळत नसली तरी त्यांतून त्यांच्या स्वभावाचे, आवडी-निवडीचे, बऱ्यावाईट अनुभवांतून घडलेल्या व्यक्तिमत्त्वाचे चांगले दर्शन होते. जॉन फ्ल्यूमर या ब्रिटिश नागरिकाने आपल्या मुलासाठी काहीच संपत्ती ठेवली नव्हती, पण शब्दसंपत्तीचा तो धनी होता. त्याने लिहून ठेवले, "माझ्या मुलाला या विशाल जगाशिवाय मी दुसरे काही देऊ शकत नाही. त्यात त्याने आपले दैव शोधावे." पत्नीने आपल्याजवळचे सात पौण्ड चोरले व परत दिले नाहीत, ही गोष्ट न्या. व्हॅन्हीअर शेवटपर्यंत विसरले नाहीत. मृत्युपत्रात त्यांनी लिहिले, "पत्नीला या मत्युपत्रातील व्यवस्थेप्रमाणे माझी मालमत्ता मिळेल, पण एका अटीवर. तिने माझे चोरलेले ७ पौण्ड प्रथम परत केले

पाहिजेत." हे मृत्युपत्र चौदाव्या शतकातील आहे. मृत्युपत्रातील हा तऱ्हेवाईकपणा विसाव्या शतकातही कायम आहे. नॉरफोक येथील एका शेतकऱ्याच्या पत्नीने आपल्या मृत्युपत्रात लिहिले, " माझ्या पियानोचा स्टूल मी पतीसाठी व बाकीची संपत्ती माझ्या पुतण्यासाठी ठेवीत आहे." माझ्या पतीसाठी मी काहीही ठेवीत नाही. सरकारकडून तिला मिळणारे पेन्शन पुरेसे आहे, असे हॅम्पशायरच्या एका इंजिनीअरने आपल्या मृत्युपत्रात लिहिले होते.

जॉन बार यांनी इंग्लंडमधील गेल्या वर्षातल्या काही मृत्युपत्रांचा अभ्यास केला. त्यांत त्यांना असे आढळून आले, की घराचा विमा, ते चांगल्या स्थितीत ठेवण्याची व्यवस्था, धुण्याची यंत्रे, टेलिव्हिजन सेट वगैरे बाबींसंबंधी मृत्युपत्रात तपशीलवार सूचना असतात. इंग्लंडमधील लोकांच्या घरी १९६५ मध्ये काय वस्तू असत, हे आणखी शंभर वर्षांनंतरच्या इतिहासकाराला या नोंदींवरून सांगता येईल. ब्रिटनमध्ये दर पाच माणसांमागे दोन लोक मृत्युपत्र लिहून ठेवतात. मृत्युपत्र आधी तयार करून ठेवल्याने आयुष्य कमी होते, अशी अजूनही अनेकांची अंध समजूत आहे. बहुसंख्य लोक मृत्यूपूर्वीच्या पाच वर्षांत मृत्युपत्र करतात. अनेक मृत्युपत्रे हॉस्पिटलमध्ये मरणापूर्वी केली असल्याचे दिसून आले. खेळण्याच्या पत्त्यावर, पोस्टकार्डावर, अंड्यावर मृत्युपत्र लिहून ठेवले असल्याचे आढळले. दर पाच मिनिटांनी आपले मृत्युपत्र बदलण्यात ८० वर्षांच्या वृद्ध स्त्रियांना आनंद वाटतो, असा अनुभव पश्चिम लंडनमधील एका सामाजिक कार्यकर्त्याने सांगितला.

मांजर, कुत्रा वगैरे प्राणी बाळगण्याची ब्रिटिश लोकांना फार आवड असते मृत्युपत्रात अशा प्राण्यांचे संगोपन करणाऱ्या संस्थांना उदार देणग्या दिलेल्या असतात. गेल्या वर्षी एका संस्थेला २५ हजार पौंड व दुसऱ्या संस्थेला ४० हजार पौंड मिळाले. " मला माणसांबद्दल तिटकारा आहे. प्राण्यांसाठी ५० हजार पौंड मी ठेवीत आहे," असे एकेकाळच्या विख्यात टेनिसपटू महिलेने आपल्या मृत्युपत्रात लिहिले होते. "जँको माकडास वर्षाला १० पौंड, शॉक कुत्र्यास ५ पौंड व टिब मांजरास तेवढीच पेन्शन द्यावी. हे तिघे मरण पावल्यावर पेन्शनची रक्कम माझी मुलगी गट्रूडला मिळावी," अशा सूचना गारलंड या ब्रिटिश नागरिकाने १८३२ मधील आपल्या मृत्युपत्रात दिल्या होत्या.

आपल्या शरीराचा मृत्यूनंतरही जास्तीतजास्त उपयोग व्हावा, ही इच्छा मृत्युपत्रात वाढत्या प्रमाणात दिसून येते. हॉस्पिटलांना शवविच्छेदनासाठी आपले प्रेत देणारांची संख्या वीस वर्षांपूर्वी वर्षाला ५०० होती. आता ती दसपट जास्त म्हणजे ५००० आहे. पाश्चात्त्यांमध्ये प्रेत पुरण्याची प्रथा असली तरी आपल्या प्रेताचे दहन करण्यात यावे, अशी इच्छा मृत्युपत्रात व्यक्त करणारांची संख्या वाढत आहे. १९४४ साली हे प्रमाण ७ टक्के होते. १९६४ साली म्हणजे वीस वर्षांत ते ४३ टक्क्यांपर्यंत वाढले.

## □ उंच हलत्या इमारती

न्यूयॉर्कची एम्पायर स्टेट बिल्डिग ही आतापर्यंत जगातील सर्वात उंच इमारत समजली जात होती. तिची उंची १४३२ फूट आहे; पण त्यापेक्षाही उंच इमारत न्यूयॉर्क वर्ल्ड ट्रेड सेंटरसाठी बांधली जात आहे. इमारतीवरचा टेलिव्हिजन स्तंभ तीनशे फूट उंच असून, त्यासह या इमारतीची उंची १७०० फूट होईल. यापेक्षाही अधिक उंच अर्धा मैल उंचीच्या इमारती बांधण्याच्या योजना न्यूयॉर्कमधील इंजिनीयर आखीत आहेत.

उंच इमारती बांधताना दोन प्रश्नांचा विचार इंजिनीयर्सना करावा लागत आहे. जोराच्या वादळात या इमारती हलतात — हेलकावे खातात. एम्पायर स्टेट बिल्डिग तासाला शंभर मैल वेगाच्या वादळात तीन इंच हलते. लंडनच्या जनरल पोस्ट ऑफिसच्या टॉवरची इमारत तासाला ९० मैल वेगाच्या वादळात ९ इंच हलते. तेव्हा जोराच्या वादळात इमारत थोडी हलली तरी चांगल्या स्थितीत ती टिकून राहील, अशा पद्धतीने तिचे बांधकाम करणे, हा एक प्रश्न. इंजिनीयर्सच्या दृष्टीने विशेष अडचणी न येता अशा इमारती बांधणे शक्य आहे. त्यांच्या दृष्टीने खरा कठीण प्रश्न दुसराच आहे, तो म्हणजे अशा उंच हलत्या इमारतीत राहण्याची, काम करण्याची माणसाला सवय होईल का ? त्याला हे हेलकावे कितपत सहन होतील ?

न्यूयॉर्क वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या इमारतीचे बांधकाम करणाऱ्या फर्मचे सल्लागार इंजिनीयर एल्. ई. रॉबर्टसन यांनी यासाठी एक प्रयोग केला. त्यांनी दोन प्रायोगिक हलत्या खोल्या बांधल्या. या खोल्या हलत असतील, असे बाहेरून वाटत नाही. यांपैकी एक खोली मागेपुढे हलत असे व दुसरी घड्याळाच्या लंबकाप्रमाणे एका टोकाकडून दुसऱ्या टोकाकडे खालीवर जात असे. रॉबर्टसन यांनी या खोल्यांत लोकांना बोलावले व त्यांच्या प्रतिक्रियांची नोंद केली. खोली हलू शकते, यावर त्यांचा विश्वासच बसेना. एका माणसाला ताठ उभे राहण्यासाठी खोलीच्या कोपऱ्याचा आधार घ्यावा लागला, तरीही खोली हलते, यावर त्याचा विश्वास बसेना.

लोकांना अशा उंच हलत्या इमारतीतील कचेऱ्यांत काम करण्याची सवय होईल का, असा प्रश्न रॉबर्टसन यांनी काही डॉक्टर व मानसशास्त्रज्ञांना विचारला, तेव्हा त्यांनी उत्तर दिले, "लोकांना कोणत्याही परिस्थितीत राहण्याची सवय होऊ शकते." पण उंच हलत्या इमारतीच्या बाबतीत हे उत्तर कितपत बरोबर ठरेल, याची रॉबर्टसन यांना शंका वाटते.

इंग्लंडमधील साउदंप्टन विद्यापीठात उंच इमारतींसंबंधी एक आंतरराष्ट्रीय परिषद नुकतीच झाली. त्या वेळी वरील माहिती रॉबर्टसन यांनी सांगितली. ●

# भिंतीच्या तुकड्या

सुधाकर राजे

## ● बेडकाच्या तंगड्यांचा तज्ज्ञ !

कोणे एके काळी हिंदुस्थानात तयार झालेली मलमल जगात सर्वोत्कृष्ट समजली जायची आणि त्या मलमलीचे कपडे वापरण्यात देशोदेशीच्या लोकांना धन्यता वाटायची; पण आता दिवस बदलले. आता जगातल्या लोकांना आपल्या सुखाच्या पूर्णतेसाठी हिंदुस्थानी मलमल नको, तर हिंदुस्थानी बेडकांच्या तंगड्या हव्या आहेत ! अमेरिकन व इतर पाश्चिमात्य भोजनवीरांच्या मते बेडकांच्या तंगड्या हे एक स्वादिष्ट पक्वान्न आहे; म्हणून भारतातून निर्यात होणाऱ्या तंगड्यांवर कडक 'क्वालिटी कंट्रोल' ठेवण्यासाठी पर्यवेक्षक नेमण्यात येणार आहेत. पण एखादी तंगडी चांगली, की वाईट यावर बेडूक आणि यांच्यात मतभेद झाला—चुकलो बेडूक पकडणारा आणि पर्यवेक्षक यांच्यात मतभेद झाला तर लवाद म्हणून बेडकाच्या तंगड्यांच्या तज्ज्ञांचीही सोय करण्यात आली आहे.

शाब्बास ! आजकालच्या जगात शेतताले बटाटे पिकविण्यापासून डोक्यातले बटाटे तपासण्यापर्यंत प्रत्येक गोष्टीसाठी तज्ज्ञांचा सुळसुळाट झाला असला तरी बेडकांच्या तंगड्या चांगल्या—वाईट ठरवायलाही तज्ज्ञ लागतो—ते येऱ्या गबाळ्याचे काम नोहे—याची कल्पना कुणा बेट्याला येऊ शकेल ? आणि मशारनिल्हे तंगडी—विशेषज्ञाने आपले विशेष ज्ञान कोठून पैदा केले ? प्राचीन मुंडकोपनिषदाच्या जोडीला एखादे आधुनिक मंडुकोपनिषद असल्याचे अस्मादिकांच्या तरी ऐकिवात नाही. पूर्वीच्या संस्कृत कवींनी मानवी अवयवांचे वर्णन तपशीलवार करून ठेवले आहे. त्यात अर्थात चरणकमले आलीच; पण एखाद्या आधुनिक नवकवीने ( की न—कवीने ? ) बेडकाच्या सुंदर तंगडीचे तेवढेच सुंदर वर्णन लिहिले आहे, की काय नकळे. ते उपलब्ध नसले तर लवाद म्हणून काम करणाऱ्या तज्ज्ञांपुढे एकच मार्ग शिल्लक आहे.—रामाला प्रत्येक बोर चाखून देणाऱ्या शबरीप्रमाणे परदेशी पार्टीसाठी जाणारी प्रत्येक बेडूक—तंगडी चाखून पॅक करणे ! ते काही असले तरी एक गोष्ट मात्र निर्विवाद अन् ती म्हणजे यापुढे अमेरिकेहून येणाऱ्या गव्हाची आपल्याला मुळीच लाज वाटायला नको. कारण अमेरिकेमुळे आपल्याला साधी पोळी—भाजी खायला मिळते, तर आपल्यामुळे त्यांना

बेडकांच्या तंगड्यांची चमचमीत मेजवानी मिळते. थोडक्यात म्हणजे मेलेला भारतीय बेडूक भारत–अमेरिका मैत्रीसाठी जे कार्य करीत आहे, ते कुठला जिवंत भारतीय माणूस करू शकेल ?

## ● अस्वलांचा बुद्धिभेद

कामगारांचा स्वर्ग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रशियात नक्की काही तरी घोटाळा चालू आहे. एकीकडे रशियन माणसे लाल तत्त्वज्ञानाकडून लाल ओठांकडे वळत आहेत, तर दुसरीकडे रशियन अस्वले तिरस्करणीय 'बूर्ज्वा' अस्वलांनाच शोभेल असा ऐष–आराम करीत असलेली दिसत आहेत. परवाच वर्तमानपत्रांत आलेली बातमी घ्या. एक रशियन शिकारी जंगलात तंबू ठोकून शिकारीला गेला. परत येऊन पाहतो तर काय, एक अस्वल त्याचे जेवण फस्त करून चक्क त्याच्या गादीवर झोपले होते म्हणे ! छी, छी, काय हा अधःपात ! जगातल्या कामकऱ्यांपुढे कामाचा आदर्श ठेवू पाहणाऱ्या रशियातच माणसांचा हा सौंदर्यशोध व अस्वलांचा आनंदबोध पाहून 'हेचि फळ काय मम तपाला ?' असे विचारण्याची पाळी बिचाऱ्या लेनिनवर यायची.

महत्त्वाचा मुद्दा असा, की रशियन अस्वलांना अशा रीतीने मोहाला बळी पाडून त्यांना साम्यवादापासून पथभ्रष्ट करण्याचे कुकर्म कोणत्या अस्वलांनी केले? अलास्का हा अमेरिकेचा भाग रशियाच्या अगदी जवळ येतो व तेथेही अस्वले आहेत; तेव्हा अशी दाट शक्यता आहे, की प्रेसिडेंट जॉन्सनच्या खास आज्ञेवरून अमेरिकन भांडवलशाही अस्वलांचे एक टोळके रशियात गुप्तपणे शिरून रशियन अस्वलांचा बुद्धिभेद करीत असावे. आता यावर रशियाला दोन प्रकारची उपाय–योजना करता येईल. एक तर प्रत्येक बुद्धिभ्रष्ट अस्वलाचे साम्यवादी पक्षाचे सभासदत्व रद्द करून त्याला पूर्वापार रशियन रिवाजाप्रमाणे 'प्रावदा'मध्ये आत्मनिंदापर कबुलीजबाब द्यायला लावायचा आणि दुसरे म्हणजे साम्यवादी अस्वलांचे टोळके अमेरिकन अस्वलांत साम्यवाद–प्रचारासाठी पाठवायचे. भांडवलशाही अमेरिकेतल्या गरीब अस्वल जनतेची अमीर अस्वलांकडून कशी पिळवणूक होत असते व गरीब अस्वलांना जंगलात राहायला पाठवून श्रीमंत अस्वले मात्र कशी आलिशान झूमध्ये राहतात, हे सत्य एकदा उघडकीला आले, की अमेरिकन मदतेची वेसण घालून खेळ करण्यात धन्यता मानणाऱ्या हिंदुस्थानी अस्वलांच्या डोळ्यांतदेखील चांगले झणझणीत अंजन पडेल.

●

## दे श वि दे श .... [पृ. ५ वरून चालू]

अमेरिकन सैन्य निघून गेल्यानंतर उत्तर-दक्षिण व्हिएटनाम एकत्र येऊन एक नवा अलिप्त देश निर्माण होण्याची शक्यता असल्याचे त्यांचे मत आहे. असा अलिप्त व्हिएटनाम निर्माण झाला तर आग्नेय आशियात चिनी विस्तारवादाला आळा घालणारी एक मजबूत फळी निर्माण होऊन त्यामुळे अमेरिकेचेही हित साध्य होणार आहे.

काहींच्या मते हा शुद्ध जुगार आहे. साराच व्हिएटनाम चीनच्या पंजाखाली गेला तर? अशी त्यांना भीती वाटते.

पण ही भीती निराधार आहे. अगोदर म्हणजे उत्तर व्हिएटनामच चीनच्या पंजाखाली आहे, ही कल्पनाच चुकीची आहे. उलट, या युद्धामुळे तो जबरदस्तीने तिकडे ढकलला जातो आहे. हा दबाव कमी झाला आणि उत्तर-दक्षिण व्हिएटनाम एक झाले तर व्हिएटनाम अलिप्ततावादाकडेच झुकण्याचा संभव अधिक आहे. ●

## सरस्वतीच्या प्रांगणातील धिंगाणा [पृ. ११ वरून चालू]

यांच्या ज्या ज्या अंगांचा विद्यार्थ्यांशी फार महत्त्वाचा संबंध येत असेल, त्या त्या प्रत्येक बाबतीत त्यांचा दृष्टिकोन त्यांना मांडता आला पाहिजे आणि तो ऐकूनही घेण्यात आला पाहिजे. आज विद्यार्थ्यांच्या संघटनांना कामगार-संघासारखे बाजारू स्वरूप आले आहे आणि त्या काल्पनिक गाऱ्हाणी निर्माण करून ती दूर करवून घेण्यासाठी दंगे करीत आहेत. याऐवजी त्यांना विद्यार्थ्यांच्या विविध कार्यांचे संचालन करायला पाचारण करावे आणि विद्यार्थ्यांच्या सदाचरणाची आणि जास्त चांगल्या अध्यापनाचे व शैक्षणिक सोयीचे मूल्यमापन करण्याची जबाबदारी त्यांचेवर टाकावी. चारित्र्याची घडण आणि सहकाराची भावना जोपासून तिच्या आधारे 'एकमेका साह्य करू अवघे धरू सुपंथ' अशी आपसातील जबाबदारीची वृत्ती विद्यार्थी-संघटनांत निर्माण करता येण्यासारखी आहे.

अशा प्रकारे सरस्वतीच्या प्रांगणातील धिंगाण्यावर तोडगा वापरताना मनःपूर्वक परंतु सहानुभूतीने वागणे अगत्याचे असले तरी सर्व प्रयत्न राजकीय हस्तक्षेप व लाभालाभ यांचा विचार न करताच केले पाहिजेत. राष्ट्रीय प्रश्नांची जाणीव देऊन मुलांमध्ये प्रखर देशभक्ती जागवली पाहिजे. हे सर्व शिक्षणतज्ज्ञांकरवीच झाले पाहिजे. त्यांना पैशाची ददात पडणार नाही, एवढेच सरकारने पाहावे.

● ● ●

# देव नाही देव्हाऱ्यात

: १ :

## • मुक्काम मुंबई

'श्रीस्टार्स' या नाटयसंस्थेने एक नाटयलेखनस्पर्धा आयोजित केली होती. एकूण २७५ नाटके स्पर्धेसाठी दाखल झाली. यांपैकी प्रा. मो. दा. देशमुख यांचे 'देव्हारा' हे नाटक संस्थेने निवडून त्यात बरेच फेरबदल करून, 'देव नाही देव्हाऱ्यात' हे त्याचे नवे रूपांतर नुकतेच रंगभूमीवर सादर केले.

नाटकाचे कथानक नेहमीप्रमाणे कौटुंबिक जिव्हाळयाचे आहे. श्रीमंत, सत्प्रवृत्त, हळव्या मनाच्या दादासाहेब नावाच्या एका गृहस्थाची ही कथा आहे. त्याचा राम नावाचा एकुलता एक मुलगा १४ वर्षांवर्षी गंगेत पडून मरण पावलेला असतो; पण तो परत येईल, अशा खोटया आशेने दादासाहेब जीवन जगत आहेत. त्यांच्या जोडीला रामची नियोजित वधू जानकी हीसुद्धा विवाह न होताही विधवेचे जिणे जगत सासऱ्याची सेवा करीत, रामच्या वाटेकडे डोळे लावून बसली आहे. या गोष्टीचा फायदा दादासाहेबांचा दिवाणजी दासोपंत घेतो. रंगराव नावाच्या त्याच्या मित्राच्या सहाय्याने तो एका मवाली तरुणाला राम म्हणून उभा करतो. त्याच्यामार्फत इस्टेट गिळंकृत करण्याचा डाव रचतो. पण हा मवाली राम दादासाहेब आणि जानकीच्या वागणुकीने सत्प्रवृत्त बनू लागतो आणि अखेरीस दासोपंताचे कारस्थान उघडकीस येते. रामवरही दादासाहेब चिडतात, पण त्याने आपले कोणतेही आर्थिक नुकसान केले नाही, हे लक्षात येताच त्याला क्षमा करतात. राम परत जाण्यास निघतो, पण जानकी त्याला सोडीत नाही. त्याला तिने पती मानलेले असल्याने ती त्याच्या पाठोपाठ बाहेर पडते.

या मूळच्या कथानकाप्रमाणे रामच्या जहांबाज मावशीचे एक उपकथानकही त्यात आहे. ती आणि तिचा बावळट नवरा दाजी दादासाहेबांच्या घरात तळ ठोकून आहेत. दादासाहेब आपल्या एखाद्या मुलाला तरी दत्तक घेतील, ही मावशीची वेडी आशा ! पुढे राम येताच त्याच्या लग्नात मुलांच्या मुंजी तरी उरकून घ्याव्यात, असा सुज्ञ विचार करून ती तिथे राहत आहे. हे उपकथानक मूळच्या कथेशी चांगलेच एकरूप झाले आहे; इतके की त्याचे वेगळेपण जाणवतही नाही.

### परिणामकारक संवाद

लेखनातील सर्वात मोठे वैशिष्टय म्हणजे त्यातील वास्तव कथानक आणि त्यातील जिवंत वाटणारी पात्रे ! पुत्रवेडे दादासाहेब, न पाहिलेल्या पतीची पूजा

करून त्याच्या वाटेकडे डोळे लावून बसणारी जानकी, जहांबाज संधिसाधू मावशी, त्यांचा वावळट नवरा, खलप्रकृती दासोपंत, याचक भटजी आणि मधूनच वेडा पण कवीतरी शहाण्यासारखा वागणारा लक्ष्मण अशी पात्रे व त्यांच्या भोवती गुंफलेले प्रसंग हृदयात घर करून बसतात. साऱ्या गोष्टी कशा सहज, जिवंत वाटतात. प्रेक्षकांच्या मनात येणारी प्रत्येक शंका शक्यतोवर दूर करण्याचा आटोकाट प्रयत्न केला गेला आहे. साहजिकच नाटक योग्य तोच परिणाम करते. प्रत्येक प्रसंग जसा आटोपशीर आणि ठसठशीतपणे उभा केला गेला आहे, तसेच एकातून एक प्रसंग उभे करण्याचे कौशल्यही नजरेत भरते. या जोडीला आकर्षक संवाद आणि रेखीव भाषाशैली यांची जोड. संवाद सुटसुटीत, सोपे आणि सहज आहेत. भाषेचेही तसेच ! भाषा फार मोठी अलंकारिक नाही. उलट अत्यंत साधी, व्यवहारातील आहे. पण मधूनच लेखक एखादे छानदार वाक्य अशा काही सफाईने पेरतो, की प्रेक्षकाच्या तोंडून 'वाहावाच' यावी. त्या त्या प्रसंगात तर ती वाक्ये फारच छान वाटतात. दादासाहेब रामवरील प्रेम व्यक्त करताना म्हणतात, "दहा वर्ष डोळ्यांच्या पाण्यात तुझं प्रतिबिंब पाहिलं आम्ही ! तुला जोराने उचकी लागेल म्हणून तुझी आठवणसुद्धा हळूवारपणानं केली आम्ही !" हे वाक्य तसं पाहता अगदी साधे सरळ, अलंकारविरहित, पण त्या विशिष्ट प्रसंगात फारच परिणामकारक ठरते. लेखकाचे उपमा–दृष्टांतांचे कौशल्यही चांगले आहे. जानकीजवळ दादासाहेब दागिने देतात व त्यातील प्रत्येक दागिन्याचे महत्त्व सांगताना म्हणतात, "मुली, ही बिंदी ! भांग सरळ असेल तरच ती शोभून दिसेल. ही नथ ! मुद्दाम हिऱ्याची केली आहे, कारण नाकापेक्षा मोती जड असं कुणी म्हणू नये ! ही कर्णफुले एवढ्याचसाठी घालायची, की या घरची सून हलक्या कानाची आहे, असं कुणी म्हणू नये. ही काकणे एवढ्याचसाठी आहेत, की घरातील सुनेला दान करण्याची इच्छा व्हावी. आणि हा चंद्रहार, मोत्यांची माळ या गोष्टी एवढ्याचसाठी, की त्या वजनाने सून विनम्र वाटावी !" ही सारी वाक्ये त्या विशिष्ट प्रसंगात चांगलाच परिणाम साधतात. प्रेक्षक खूष होतात.

सहज लेखनाप्रमाणेच कलाकारांचा अभिनयही अत्यंत वास्तव, मनाला पटणारा असा आहे. कुणा एका कलाकारामुळे नाटक घसरले असा दोष तर कुणी ओढवून घेतला नाहीच, पण प्रत्येकाने आपल्या परीने नाटक यशस्वी करण्यात मोठा वाटा उचलला. स्वत: दिग्दर्शक श्री. बाबुराव गोखले दादासाहेबांच्या भूमिकेत शोभून दिसले. ती भूमिका वास्तव करण्याचा आटोकाट प्रयत्न त्यांनी केला. मुख्यत: भूमिकेचा आब उत्तम राखला. आपल्या नेहमीच्या प्रसिद्ध अभिनयाची (टाचा उंचावून बोलणे, नको तेव्हा हातवारे करणे इ.) जराही ओळख होऊ दिली नाही, हे फार महत्त्वाचे ! बाबुरावांची एक उत्कृष्ट भूमिका म्हणून हिचा निर्देश अगत्याने केला पाहिजे. मोहन कोठीवान (दासोपंत) यांची शरीरयष्टी, आवाज या गोष्टी

खलनायकाच्या कामाला योग्य असल्या तरी सदोदित तोच खलवृत्ती भाव चेहऱ्यावर ठेवून ते वावरत होते. दादासाहेब, जानकी या व्यक्तींपुढे जरूर ती अजिजी, नम्रता या गोष्टी योग्य तऱ्हेने व्यक्त झाल्या नाहीत. उलट काही प्रसंगांत जानकी उभी असताना हा दिवाणजी खुशाल बसून बोलत होता हे पटत नाही. कोठीवान यांचे काम ठीक होते, पण त्यात कितीतरी सुधारणा करता येतील. अनंत जोशी यांचा वेडा लक्ष्मण ठीक वाटला. काही वेळा (विशेषतः पहिल्या अंकात) ते जरा जास्त अतिशयोक्ती करीत होते. गजानन जोशी (राम) त्या भूमिकेत शोभून दिसले. त्यांनी आपले काम मेहनतीने केले हे खरे, पण त्यांची ताकद कमी पडली. रामच्या मनातील द्वंद्व, 'बाप' हा शब्द उच्चारताच त्याच्या मनात व्यक्त होणारा तिरस्कार, पण दादासाहेब यांच्याबद्दल वाटणारे प्रेम, जानकीबद्दलचा जिव्हाळा या गोष्टी अधिक सुयोग्य तऱ्हेने व्यक्त करता आल्या असत्या. मुरलीधर राजूरकर दाजीच्या कामात मात्र कमाल करतात. भूमिकेचे बेअरिंग सांभाळण्याची त्यांची सफाई कौतुकास्पद ! मुद्राभिनय, बोलण्याचा ढंग या गोष्टीही उल्लेखनीय आहेत. पद्मा घोटवडेकर यांची जहांबाज मावशीही अशीच उल्लेखनीय आहे. मावशीचा ठसका त्यांनी छान दाखविला. मधू गायकवाड (रंगराव) ठीक होते. नंदू लोढे परान्नपुष्ट भटजीच्या भूमिकेत शोभून दिसले. कामही बरे केले. पण जानकीशी ते बोलत असत, तेव्हा त्यांची दृष्टी आश्रिताची वाटत नसे, ती आषुकाची वाटली. प्रमुख भूमिका भारती मालवणकरची ! ती तिने मन लावून, अतिशय कष्ट घेऊन सादर केली, त्यामुळे सर्वोत्कृष्ट वाटली. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे जानकीच्या भूमिकेत ती दिसली अत्यंत सुयोग्य ! प्रथम अंकातील विधवा म्हणून जगणारी जानकी, दुसऱ्या अंकातील रामच्या प्रेमात पडलेली आणि राम परत आला, या आनंदाने फुलून आलेली जानकी आणि अखेरीस राम मवाली आहे, हे कळूनही त्याच्या मागोमाग जाण्यास तयार होणारी करारी, निश्चयी जानकी हे महत्त्वाचे स्वभाववैशिष्टच तिने बारकाईने दाखविलेच, पण वेळोवेळी मुद्राभिनय अशा सफाईने व्यक्त केले, की प्रेक्षक सहज आकृष्ट व्हावा. भारतीने या एकाच भूमिकेत आपले रंगभूमीवरील स्थान निश्चित केले आहे.

दिग्दर्शनाविषयी फार काही बोलता येणार नाही. त्यात फार मोठी कल्पकता नव्हती, पण अगदी दुर्लक्ष कराव्या अशाही गोष्टी नाहीत. प्रयोगाची सफाई, पात्रांच्या हालचाली जिवंत वाटतात.

नेपथ्य वास्तवपूर्ण आहे. प्रकाश-योजना मात्र दोषपूर्ण आहे. दीपयोजना करायची ती पात्रांच्या अभिनयाला महत्त्व यावे यासाठी ! पण इथे प्रकार उलटा घडतो. पात्रे बऱ्याच वेळा अंधारात बोलतात. अर्थात हा दोष सहज दूर होऊ शकेल.

**सौ. जयश्री दामले**

●



भारती मराठे, बाबुराव गोखले
व गजन जोशी

: २ :

## • मुक्काम पुणे

या नाटकात पात्रपरिचयासाठी वापरलेला कव्हर सीन हे एक नावीन्य वाटले. सुरवातीच्या दासोपंत व रंगराव यांचेमधील संवादातून पात्र-परिचय तर होतोच, पण कथासूत्राचाही मागोवा घेता येतो. अर्थात ही गोष्ट पुण्या-मुंबईकडे जास्त उचलली गेली नाही, तरी छोटया शहरांतून व ग्रामीण भागात ही गोष्ट प्रेक्षकांना आवडू शकेल.

नाटकातील संवाद फुलवण्याचे लेखकाचे कौशल्य ही विशेष वाखाणण्यासारखी गोष्ट. मावशी व दाजी यांच्या संवादाची मांडणी मोठ्या खुबीने केली आहे. 'काय म्हणते मी ?' असं विचारणाऱ्या मावशी व त्यांना शब्दशः तेच उत्तर देणारे दाजी प्रेक्षकांत हशा पिकवतात. तर काही वेळा "ते पुन्हा म्हणणे बरे नाही" असे दाजी म्हणतात, तरी प्रेक्षकांत हशा पिकतो.

जानकी व राम यांचेमधील संवाद मोठे मार्मिक आहेत. ईश्वरभक्त जानकी

नास्तिक रामाला देवाचे अस्तित्व पटवून देण्याचा प्रयत्न करीत आहे. आपल्या हातातील फुले दाखवून जानकी विचारते, ही फुलं पाहिलीत का ?

राम : पाहिली की.

जानकी : यांचा रंग कसा आहे.

राम : सुंदर.

जानकी : आणि सुगंध.

राम : फारच छान !

जानकी : तो दिसतो कसा ?

राम : सुगंध कधी दिसतो का ?

जानकी : पण तो असतो ना.

राम : असतो ना.

जानकी : देवाचे तसेच आहे, तो असतो पण दिसत नाही. भासमान होतो, पण दृश्यमान होत नाही.

आणखी एका प्रसंगी राम आपल्याला काळीज नसल्याचे सांगतो. त्या वेळचे ह्या दोघांतील संवादही आकर्षक आहेत. वाक्यरचना छोटी केल्याने या दोन्ही जागांचे संवाद पकड घेणारे आहे. एखाद्याच वाक्यातून व्यक्तिरेखा दाखवण्याचे सामर्थ्यही देशमुखांनी दाखवले आहे. दासोपंत रंगरावाला सांगतात "नखानं भागतं, तिथं शस्त्र लावत नाही मी."

**बेताचे कलावंत**

बहुतेक कलावंतांनी आपल्या परीने प्रयत्न करूनही ते आपल्या वाट्याला आलेल्या भूमिकेस न्याय देऊ शकलेले नाहीत. अर्थात याला बऱ्याच प्रमाणात स्वतः दिग्दर्शक बाबुराव गोखले (दाजीसाहेब) व काही प्रमाणात मोहन कोठीवान (दासोपंत) अपवाद आहेत. कु. भारती मालवणकर (जानकी) व श्री. गजन 'जोशी (राम) ही प्रमुख पात्रेच कमालीची कमकुवत आहेत. जानकी दिसते चांगली, बोलते बरी, पण चेहऱ्यावर भावदर्शन नाही. रामचे आगमन व राम हा राम नाही हे समजते त्या वेळी ही जानकी फार कमी पडते. पण योग्य प्रयत्नाने हा दोष निश्चित जाऊ शकेल. नंदू लोंढे (गोविंद भटजी), सौ. पद्माताई घोटवडेकर (मावशी) व श्री. मुरलीधर राजुरकर (दाजी)ही दुय्यम पात्रेच मैदान मारून जातात. वरच्या पट्टीत व चिरक्या आवाजात बोलण्याची राजुरकरांची पद्धत उत्कृष्ट असली तरी प्रेक्षकांच्या पावतीबरोबर वाहवत जाण्याचे त्यांनी कटाक्षाने टाळले पाहिजे.

वेडा लक्ष्मण व जानकी यांचा वावर पाहता वेडा लक्ष्मण १०-१२ वर्षांचा दाखवला असता तर नाटकास उपकारक ठरले असते.

विनोदनिर्मितीसाठी गोविंदभटजींचा वापर केला असला तरी समाजात महत्त्वपूर्ण धार्मिक स्थान असलेल्या वर्गाला विनोदनिर्मितीसाठी वापरणे आक्षेपार्ह वाटते.

दारिद्र्य, हावरेपणा, लाचारी, इ. वैगुण्ये गोविंदभटजींची व्यक्तिगत न वाटता प्रातिनिधिक वाटतात. मावशींच्या तोंडचे– " भटजींनासुद्धा अक्कल आहे; भटजी असून ! " हे वाक्य व त्याची फेक दोन्ही आक्षेपार्ह आहे. समाजाच्या एका महत्त्वाच्या घटकाच्या भावना दुखावणारे आहे.

**' रत्नदीप, रतन 'शी साम्य !**

केळकर चित्रशाळेने उभा केलेला रंगमंच उत्कृष्ट व प्रेक्षकांना खूष करणारा आहे. मात्र वरच्या माडीचा वापर कमीत कमी करावा. कारण त्यामुळे संपूर्ण सेट हलून तन्मयतेने नाटक पाहणाऱ्या प्रेक्षकांचे लक्ष विचलित होते. हशा पिकतो

नाटकासाठी वापरलेले पार्श्वसंगीत नाटकाशी सुसंगत तर नाहीच. गाँगचा (थाळीचा) पाच-पंचवीसवेळा वापर कशासाठी करतात, तेच समजत नाही. जरा खुट्ट झालं की गाँग, हे विचित्र वाटते.

स्पॉट लाईटचा वापर बरा वाटला. नाटचाची रंगत वाढण्यात त्यात थोडी फार भर पडली

एकच शंका : ' रत्नदीप ' या बंगाली कादंबरीशी, अथवा ' रतन ' या हिंदी चित्रपटाशी कथानकाच्या मुख्य दुव्याचे फार मोठे साम्य आढळते. या बाबतीत नाटककार मो. दा. देशमुख काही खुलासा करू शकतील का ?

कलावंतांचे मर्यादित यश व अन्य सर्व उणीवा ध्यानात घेऊनही बाबुरावांच्या खास धंदेवाईक तंत्रात नाटकाने गावोगाव प्रयोगांची झुंबड उडवली, तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. आणि प्रयोगांचे आकडे जसेजसे फुगत जातील तसतसे त्यातील दोषही कमी होत जातील, अशी अपेक्षा करू या.

**शरद गोखले**

**पुढील अंकी**

महाराष्ट्र-कोकीळ

**श्री. शंकरराव सरनाईक**

यांचा परिचय

: लेखक :

**एस्. ए. कुलकर्णी**

# पुन्हा ‘ वावटळ ’



संपादक ‘ माणूस ’ यांस–

‘ वावटळ ’विषयक माझे विचार आपल्या १५ एप्रिलच्या अंकात वाचले. मजकूर छापण्यापूर्वी मला दाखविला गेला असता तर बरे झाले असते.

पा. ६२ वरील वरून दुसरी ओळ. ‘ खेडुतांच्या वेडगळ समजुती ’ यातील ‘ वेडगळ ’ शब्द मला अभिप्रेत नाही. ज्या ‘ शंका ’ प्रदर्शित केल्या आहेत, त्या मलाच समक्ष विचारल्या असत्या तर त्यांची उत्तरे मिळाली असती. पण तसे न करता त्या मागाहून जोडण्यात थोडा ‘ खवचटपणा ’ वाटला. मी माझ्या तक्रारी सांगण्यासाठी कोणाकडेही जात नाही. ‘ माणूस ’चा प्रतिनिधी आस्थेने आला व त्याने माझे विचार ऐकण्याची उत्सुकता दर्शविली म्हणून प्रकट चिंतनासारखे माझे विचार मी बोललो. माझी या घडीलाही तक्रार कसलीच नाही.

‘ वावटळ ’ला बक्षीस मिळाले नसते तरी माझे काही बिघडले नसते व ते आता मिळाल्यामुळे काही विशेष घडले असेही मी मानीत नाही.

माझे एकच समाधान, की समर्थ अशा तीन परीक्षकांनी आमच्या वास्तववादी प्रयोगशीलतेची जाणती दखल घेतली. माझा प्रामाणिक, वेगळा प्रयत्न नोंदला गेला. आणि हे एकच समाधान मला पुरेसे आहे.

—शान्ताराम आठवले

[ १. मजकूर दाखविणे नेहमी शक्य होत नाही. चूक राहू नये याबद्दल शक्य तितकी काळजी बाळगली जाते.

२. ‘ खेडुतांच्या वेडगळ समजुती ’ यातील ‘ वेडगळ ’ शब्द चुकीने लिहिला-गेला. श्री. गोखले यांना ही चूक मान्य आहे.

३. शंका जाहीरपणे विचारल्या म्हणजे ‘ खवचटपणा ’ व खासगीत विचारल्या तर योग्य, ही श्री. आठवले यांची भूमिका हळवेपणाची व न पटणारी आहे. चित्रपटसमीक्षकांवर श्री. आठवले यांनी जाहीर टीका मुलाखतीत केली आहे. समीक्षक या नात्याने गोखले यांनी जाहीर शंका प्रदर्शन केले, यात काय चुकले ? शिवाय श्री. गोखले यांनी उपस्थित केलेल्या शंकांना सरळ उत्तरे देण्याचे श्री. आठवले यांनी टाळले आहे ते वेगळेच.

४. मुलाखतीतील ‘ प्रकट चिंतन ’ व पत्रातील भूमिका यांत पुन्हा गोंधळ व परस्पर विसंगती निर्माण झाली आहे.

एक उदाहरण : मुलाखतीतील वाक्य–“ चित्रपटाची हाताळणीच अशा पद्धतीने

केली होती, की तो पारितोषिक विजेता ठरावा. "वरील पत्रातील वाक्य– " ' वावटळ 'ला बक्षीस मिळाले नसते तरी माझे काही बिघडले नसते व ते आता मिळाल्यामुळे काही विशेष घडले, असेही मी मानीत नाही. "

५. मुलाखत व त्यावरील शंकाप्रदर्शन पाहून एका जाणकार वाचकाने आपली प्रतिक्रिया ' माणूस 'कडे आपणहून लिहून पाठविली आहे. ती खाली नमूद आहे.

–संपादक ]

## चित्रपटाने मराठी रसिकांची दारुण निराशा केली आहे....

## प्रा. सुधाकर के. भोसले

श्री. शंकर पाटील हे एक तरुण आणि प्रसिद्ध लेखक. त्यांचा पहिलाच ' वावटळ ' हा चित्रपट मी मोठ्या उत्सुकतेने पहिला आणि घोर निराशा झाली. जेव्हा या चित्रपटाला महाराष्ट्र सरकारतर्फे प्रथम पारितोषिक मिळाल्याचे समजले, तेव्हा आश्चर्याचा धक्काच बसला. या चित्रपटासंबंधी त्या चित्रपटाचे खुद्द दिग्दर्शक श्री. शांताराम आठवले यांचे निवेदन ' माणूस 'च्या १५ एप्रिलच्या अंकात प्रसिद्ध झाल्याचे कळले. म्हणून मोठ्या कुतूहलाने ते निवेदन वाचले; तेव्हा हसू आले ! एका चित्रपटाच्या निमित्ताने निरनिराळ्या वेळी माझ्या ह्या तीन प्रतिक्रिया !

श्री. आठवले यांचे अनेक मुद्दे दिशाभूल करणारे आहेत आणि त्यांनी अकारण प्रेक्षक आणि टीकाकार यांना उद्देशून विरोधी सूर काढले आहेत.

श्री. आठवले म्हणतात ' हल्ली चित्रपटांमध्ये तंत्राचे वर्चस्व वाढत आहे; परंतु ' वावटळ 'च्या बाबतीत कथेला प्राधान्य देण्याचे धोरण हेतुपूर्वक ठेवण्यात आले. ' हे विधान किती चुकीचे आहे ! मराठी चित्रपट कथानकाच्या दृष्टीने ( थोडेसे ) समाधानकारक असले तरी तंत्रदृष्टचा कमालीचे असमाधानकारक असतात, ही तर सर्वांचीच सनातन तक्रार आहे. तंत्राच्या आहारी जाऊन व कथानकाला डावलून मराठी चित्रपटांची निर्मिती होत आहे, असे आढळातच येत नाही. (अलीकडचा अपवाद इये मराठीचिये नगरी ! ) तेव्हा श्री. आठवले यांचा हा मुद्दा किती पोकळ आहे, हे सहजच ध्यानात येते.

मुळातली ' वावटळ ' ही छोटीशी कथा हृद्य आहे; पण ती चित्रपटाच्या माध्यमाला कितपत योग्य आहे ? याचा विचार लेखक आणि दिग्दर्शक यांनी अजीबात केलेला आढळत नाही. कमालीची संथ, मंदपणे सरकणारी दिशाहीन कथा असं तिचं पडद्यावरचं एकंदरीत स्वरूप आहे. संवादही साधारण आहेत. हेल काढणाऱ्या आणि कानडीसारख्या वाटणाऱ्या उच्चारपद्धतीमुळं ते कमालीचे कृत्रिम आणि हास्यास्पद वाटतात. श्री. कृष्णकांत दळवी यांचा सूर, बोलण्याची ढब रसहानी करणारी वाटते. आपल्या आईला ' आए ऽऽऽ' अशी हाक मारताना त्यांचे ते उच्चार, आई

जवळ उभी असूनही विनाकारण केलेली ओरड आम्हाला तर हास्यजनक वाटली.

आता अभिनयाचा विचार. श्री. कृष्णकांत दळवी यांच्याबद्दल वर लिहिलेच आहे. चुकीच्या मार्गदर्शनामुळे या कलावंताची पंचाईत झाली असावी, असे सारखे वाटत होते. श्री. पंढरीनाथ बेर्डे यांच्याबद्दल फार अपेक्षा होत्या, पण सर्वांना सहकार्य देण्याच्या भावनेनं म्हणा हवं तर, पण त्यांनी संपूर्ण निराशा केली. आशा पोतदार यांची भूमिका निश्चितच फसवी होती. ती ग्रामीण कन्यका वाटलीच नाही. एखाद्या श्रीमंत कॉलेजकन्यकेप्रमाणे त्या सहजतेने आणि मोकळेपणाने सबंध चित्रपटात वावरत होत्या; हं एक न्यूनच नव्हे काय ? हे चित्र ग्रामीण असून या चित्रपटात तमाशा नाही, पण एक घरंदाज मराठ्याची मुलगी एक गाणं म्हणताना तमाशातल्या बाईप्रमाणं डोळे आणि कंबर मोडीत नाचते ! (पण यालाच दिग्दर्शक 'लोक-नृत्याचे पदन्यास' म्हणतात.) ही कुठली वास्तवता ? हे काय ग्रामीण जीवनाचे यथातथ्य दर्शन ? आशा पोतदारांचे नृत्यकौशल्य दाखवण्याचा कोण हा अनाठायी अट्टहास ! सुलोचनाबाईंचा अभिनय मात्र अकृत्रिम आणि मनोरम आहे. अर्थात याचे सर्व श्रेय दिग्दर्शकाकडे जाते, असं काही अर्थातच म्हणता येणार नाही.

श्री. आठवले म्हणतात, 'चित्रपटावर पारितोषिकांचा वर्षाव झाला, त्यात आश्चर्य वाटण्याजोगे काही नाही. कारण चित्रपटाची हाताळणीच अशा पद्धतीने केली होती, की तो पारितोषिकविजेता ठरावा.' ( लक्षात घ्या, या चित्रपटाची निर्मिती, नेहमीपेक्षा वेगळी चाकोरी सोडून काही नवीन प्रयोग करावा, वगैरे वगैरे जे निवेदनाच्या आरंभी लिहिलं आहे, ते खरं नाही बरं का ?— या चित्रपटाची निर्मिती तो पारितोषिकविजेता व्हावा म्हणून केली आहे. आणि गंमत अशी, की श्री. आठवले यांचा एवढा अंदाज मात्र नेमका बरोबर ठरला ! 'चित्रपट ज्युबिली-हिट गेला नाही तरी आर्थिक अपयश देणार नाही,' हा अंदाज मात्र साफ चुकला ! ) 'वावटळ' परदेशांत पाठवण्याचं घाटतंय्, असं श्री. आठवले म्हणतात. हे एक मोठंच धाष्टर्य आहे. पण काय सांगावं ! तिथंदेखील या चित्रपटाला बक्षीस मिळून जाईल आणि मग श्री. आठवले लिहितील, 'या चित्रपटावर पारितोषिकांचा वर्षाव झाला, त्यात आश्चर्य वाटण्याजोगं काही नाही. कारण चित्रपटाची हाताळणीच अशा पद्धतीने केली होती, की तो परदेशांतही पारितोषिकविजेता ठरावा!'

## टीकाकार-प्रेक्षकांवर अन्याय

श्री. आठवले यांच्या निवेदनात खूपच शंका निर्माण होतात, पण साऱ्यांचाच विचार करणे फार विस्ताराचे होईल. ते म्हणतात, मोट चालवणारा नायक शहरी न वाटता, खरा शेतकरी वाटावा म्हणून त्यास आठ दिवस मोट चालवण्याचा सराव करावयास लावले. हे श्री. आठवले यांनी केव्हा सांगावं ? जर प्रेक्षक किंवा टीकाकार म्हणू लागले, की 'नायकाचे काम अप्रतिम झाले आहे. त्याच्या प्रत्येक हालचालीतून आणि बोलण्यातून ग्रामीण जीवन साकार होत होतं. त्याच्या

या अभिनयातील यशाचं रहस्य काय बुवा ?' तर श्री. आठवले यांनी त्या यशासाठी घेतलेल्या मेहनतीचे तपशील द्यावेत. एरवी ही अकारण माहिती कशासाठी ? पुढं एका ठिकाणी ते म्हणतात, 'वावटळमध्ये डोहाळजेवणाचे एक दृश्य आहे. विशिष्ट अभिरुची निर्माण झालेल्या प्रेक्षकांना व दूषित दृष्टिकोनातून चित्रपट पाहणाऱ्या टीकाकारांना कदाचित ते आवडले नसेलही, परंतु ग्रामीण भागात – विशेषत: कोल्हापूरच्या परिसरात – या दृश्याचे चांगलेच स्वागत झाले.' या ठिकाणी त्यांनी विनाकारण मराठी प्रेक्षकांवर आणि टीकाकारांवर अन्याय केला आहे. 'वहिनींच्या बांगडया', 'शेवग्याच्या शेंगा' या उत्कृष्ट कौटुंबिक आणि यशस्वी चित्रपटांच्या दिग्दर्शकाने असे कृतघ्न उद्‌गार काढावेत, ही मोठी खेदाची गोष्ट आहे. (श्री. आठवले यांच्या त्या सोज्वळ चित्रपटांना प्रेक्षकांनी मन:पूर्वक भरघोस पाठिंबा दिला होता.) चित्रपटाच्या आर्थिक अपयशाचे खापर त्यांनी प्रेक्षकांच्या डोक्यावर फोडून हा एक-प्रकारचा सूडच उगविला आहे. श्री. आठवले यांच्या विधानात एवढा एक दिलासा वाटतो, की निकोप दृष्टीचे काही रसिक कोल्हापूर आणि त्याच्या परिसरात वावरत आहेत.

या चित्रपटाने मराठी चित्रपट-रसिकांची दारुण निराशा केली आहे. हा चित्र-पट सर्वच दृष्टींनी अत्यंत कृत्रिम आणि त्याची हाताळणी कलाशून्य वाटते. छाया-चित्रणाचा भाग सोडल्यास चित्रपटात फार थोडेसे उल्लेखनीय म्हणून शिल्लक राहते. निसर्गातील सौंदर्य श्री. अरविंद लाड यांनी कलात्मकतेने चित्रित केले आहे. पटकथेतील भोंगळपणा, गलथानपणा दिग्दर्शकाने बरोबर टिपलेला आहे आणि पडद्यावर दाखवला आहे, म्हणून त्या विभागाचे पारितोषिक त्यांना मिळाले, हे स्तुत्यच आहे. एरवी एका कलावंताची धडपड किंवा प्रयत्न म्हणूनदेखील कुठं कुठं काही काही जाणवत नाही.

श्री. आठवले यांच्या निवेदनानंतर श्री. शरद गोखले यांनी जे मुद्दे उपस्थित केले आहेत; ते रास्त आहेत. मी त्यांच्याशी संपूर्ण सहमत आहे.

स्पर्धेचे परीक्षक मंडळ–त्याचे सदस्य मातबर आहेत. पण त्यांनी केलेली निवड, त्यांच्या हेतूबद्दल, त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल शंका व्यक्त करणारी खासच आहे. माझी त्या सदस्यांना अत्यंत नम्र विनंती आहे, की त्यांनी कृपा करून या चित्र-पटाची वैशिष्टये प्रसिद्ध करावीत. (श्री. आठवले यांचे निवेदन वाचून मात्र 'भीक नको पण कुत्रा आवर' अशी स्थिती झाली आहे ! ) म्हणजे आमच्या-सारख्या पामर प्रेक्षकांना बोध तरी होईल !

'वावटळ'सारख्या चित्रपटाला पहिले बक्षीस मिळत गेल्यास चांगल्या मराठी चित्रपटाची बूज सरकारकडून राखली जाण्याची आशा वावटळीसारखीच भरकटत राहणार.

●

[ या विषयाची चर्चा येथे समाप्त होत आहे. –सं. ]

# सोफिया लॉरेन

अशोक प्रभाकर आंग्रे

दुसऱ्या जागतिक महायुद्धाचा काळ. वातावरण तंग होते. अशा वेळी इटालीतील रस्तोरस्ती एक चिमुरडी पोर काही खायला मिळते का, याचा शोध घेत फिरत होती. एका दयाळू अंतःकरणाच्या इसमाने त्या चिमुरड्या पोरीला काही खायला घातले. तेव्हा अधाशाप्रमाणे ते सर्व एकटीने न खाता ती आपल्या कुटुंबियांकरिता ते अन्न घेऊन गेली. त्याच वेळी दयाळू अंतःकरणाचा तो इसम उद्‌गारला, "ही मुलगी या देशात नाव कमावणार!" त्या दयाळू इसमाची भविष्यवाणी सुमारे सोळा वर्षांनंतर खरी ठरली. त्या वेळी भुकेने वखवखलेल्या स्थितीत इटालीचे रस्ते धुंडाळीत भटकणारी ती चिमुरडी पोर आज इटालीमध्येच नव्हे, तर साऱ्या जगात एक श्रीमंत व अभिनयनिपुण चित्रतारका सोफिया लॉरेन म्हणून ओळखली जात आहे.

आज सुखी व संपन्न असलेल्या सोफिया लॉरेनला आपल्या आयुष्यातील सुरवातीचा बराचसा काळ मोठ्या शोचनीय अवस्थेत कंठावा लागला. योजुली गावात ३० सप्टेंबर, १९३४ रोजी एका गरीब कुटुंबात ती जन्मली. पुढे पाच वर्षांनी तिची आई तिच्या वडिलांपासून विभक्त झाली. आपली आई व छोटी बहीण यांच्याबरोबर ती आजीकडे गेली. तिथेही दारिद्र्याने तिचे स्वागत केले. फक्त १०० ग्रॅम पावावर त्यांना एक दिवस काढावा लागे. आपल्या बालपणाविषयी बोलताना सोफिया म्हणते, "त्यावेळी आम्हाला खायला ना मास मिळत होते, ना मासळी. ज्वारी किंवा मक्याशिवाय दुसरे काहीही खायला मिळत नव्हते. त्या वेळी एकाच भावनेने आम्ही पछाडलो होतो व ती म्हणजे भुकेची भावना." पाव किंवा भाकरी मिळविण्यासाठी ती व तिची आई तासन् तास रांगेत उभ्या राहत. खाण्याच्याबाबतीतच जिथे सोफियाची आबाळ होत होती, तिथे कपड्यांच्या बाबतीत झाली, यात नवल कोणते! तिला स्वतःचे असे खास कपडे नव्हतेच. त्यात ती सारखी उंच होत असल्याने कोणताही कपडा तिला व्यवस्थितपणे बसत नसे. नाही म्हणायला एका म्हाताऱ्या उंटाच्या केसापासून तिच्या आईने तिला एक झगा शिवून दिला. तो बराच मोठा असल्याने तिने कित्येक वर्षे तोच वापरला.



सोफिया

## तहानेली, भुकेली

दुसरे जागतिक महायुद्ध सुरू झाले. त्या वेळी सोफिया ५-६ वर्षांची होती. बॉम्ब-फेकीची भीती रात्रंदिवस त्यांना बेचैन करीत होती. ज्या वेळी आकाश विमानांनी झाकून जाई, त्या वेळी सोफिया व तिची आई बॉम्बफेकीपासून सुरक्षित राहण्याचा प्रयत्न करीत. विमानांची घरघर ऐकून तिचे डोके फिरू लागे. जिन्याखाली, रेल्वे-रुळाशेजारी झोपून ती रात्र काढी. हवाईहल्ल्याच्या भीतीने कित्येक रात्री तिने जागून काढल्या. एके रात्री तर त्यांच्या शेजारच्याच घरावर एक बॉम्ब येऊन पडला. त्यामुळे सोफिया मोठ्या जोराने जमिनीवर आदळली. तिला जबरदस्त जखम झाली. त्या जखमेचा डाग अजूनही तिला त्या भीषण प्रसंगाची आठवण देतो.

वरील प्रसंगानंतर तिची आई तिला नेपल्सला घेऊन गेली. परंतु तिथे असलेले त्यांचे नातेवाईक अगोदरच त्रासून गेलेले होते. त्यांच्या घरातही दुष्काळी वातावरण होते, आजारपण होते; त्याकरिता सोफिया आपल्या आईसह दुसरीकडे खाण्याच्या शोधार्थ निघाली. काही खायला मिळण्याऐवजी त्यांना सैनिकांनी पकडले व भुकेने व्याकुळ होऊन मरून जावे, या हेतूने एका खड्ड्यात सोडून दिले. त्या ठिकाणी चार दिवसपर्यंत आपल्या आईसह ती भुकेली व तहानेली पडून होती. त्याच वेळी युद्धपीडित स्त्रियांची पुरुषांकडून विक्री होताना तिने पाहिले. ती मोठी समजदार नसली तरी पुरुषांकडून स्त्रियांवर अन्याय होत आहे, हे मात्र तिला कळत होते. शत्रूच्या अत्याचारांचा नंगानाच ती आपल्या डोळ्यांनी पाहत होती.

दुसरे महायुद्ध एकदाचे संपले. कडक कपड्यातील सैनिक पाहून सोफिया त्यांच्या जवळ गेली. त्यांनी तिला लोणी, बिस्किटे व कॉफी दिली. कित्येक वर्षांनंतर तिला

कॉफी प्यायला मिळाली. अमेरिकन सैनिक आल्यानंतर मात्र खाण्यापिण्याच्या बाबतीत तिची चंगळ झाली असली तरी दारिद्र्याने काही तिची पाठ सोडली नव्हती. अमेरिकन सैनिक ग्रामोफोन रेकॉर्डवर नृत्य करीत. त्या वेळी तिला प्रसिद्ध अमेरिकन गायकांची गाणी ऐकायला मिळाली. त्यामुळे तिला संगीताविषयी आकर्षण वाटू लागले. तिची आई उत्कृष्टपणे पियानो वाजवीत असे. तिने सोफियाला पियानो वाजवायला शिकविले. संगीताची मोहिनीच पडल्यामुळे ती लवकरच उत्कृष्टपणे पियानो वाजवू लागली. लोक तिला "स्टेका" म्हणू लागले.

वयाच्या बाराव्या वर्षी सोफियाला तिच्या आईने शाळेत टाकले. त्या वेळी तिला थोडे स्वास्थ्य लाभले. त्यामुळेच की काय, अगदीच उंच व किडकिडीत वाटणारी सोफिया अंगाने भरू लागली. तिच्याकडे लोक टवकारून पाहू लागले. कुरूप समजल्या गेलेल्या सोफियात कमालीचा बदल झाला. ती १४ वर्षांची असतानाच एका शिक्षकाने तिला मागणी घातली. परंतु तिच्या आईने ती धुडावून लावली. १५ वर्षांची असताना सोफियाने शाळा सोडली. आपल्या सौंदर्याचा तिला अभिमान वाटू लागला. त्यात एका सौंदर्यस्पर्धेत तिला दुसरा क्रमांक मिळाला. यामुळे चित्र-जगतात प्रवेश मिळेल, अशी तिची खात्री होती. मात्र पहिला क्रमांक मिळविणारी तरुणी आपल्यापेक्षा दिसायला कमीच असल्याचे तिला खटकले. प्रेक्षकांनीही गिल्ला केला व शेवटी पोलिसांना पाचारण करावे लागले.

## चंदेरी दुनियेत प्रवेश

बक्षिसाचे पैसे मिळताच सोफिया आपल्या आईसह रोमला आली. त्या दोघींनाही एका स्टूडिओत एक्स्ट्रॉ म्हणून काम मिळाले. परंतु एक्स्ट्रॉ म्हणून त्यांनी तिथे फार काळ वास्तव्य केले नाही. त्या परत नेपल्सला झाल्या व सोफिया अभिनयाचे शिक्षण देणाऱ्या एका शाळेत दाखल झाली. आपला अभ्यास सांभाळून इटालीच्या नियकालिकांकरिता आपल्या छायाचित्रांच्या 'पोझेस्' देण्यास तिने सुरवात केली. त्या वेळी तिचे वय सोळा वर्षांचे होते. तिच्या चेहऱ्यावर एक विशिष्ट प्रकारची चमक होती व 'पोज्' देण्याची तिची 'स्टाईल'ही अशी काही खास होती, की तिची छायाचित्रे असणारी नियतकालिके मोठ्या प्रमाणात विकली जाऊ लागली. इटालीतील संपादक व निर्माते मंडळी एकाच वेळी सोफियाच्या शोधार्थ निघाली आणि नंतर सोफिया बऱ्याच चित्रपटांतून छोट्या छोट्या भूमिकांत चमकली. दोन वर्षांच्या मुदतीत तिने सुमारे तेरा चित्रपटांत काम केले. त्यांपैकी "आयडा" हा चित्रपट मोठा होता. त्यात सोफियाने लहानशाच भूमिकेत चांगली चमक दाखविली. तो चित्रपट बराच लोकप्रिय झाला व सोफिया त्यामुळे प्रकाशात आली.

१९५२ मध्ये "आफ्रिका बिनीथ दी सी" या चित्रपटाकरिता एक सुंदर व सुडौल अभिनेत्री पाहिजे, हे समजताच सोफियाने त्याकरिता प्रयत्न केला. याच

चित्रपटाचे वेळी तिचे नाव सोफिया लॉरेन असे ठेवण्यात आले. पुढे १९५४ मध्ये गीता या प्रख्यात अभिनेत्रीने "ब्रेड, लव्ह ॲन्ड वाईन" मधील भूमिका नाकारल्याने सोफियाची तिथे वर्णी लागली. या चित्रपटात तिला लोकप्रियता मिळाली. परंतु १९५५ मध्ये प्रकाशित झालेल्या तिच्या "आयेशा" या चित्रपटाने कळस गाठला. १९५५ हे वर्ष "सोफिया लॉरेन वर्ष" म्हणून समजले गेले. त्यामुळे हॉलिवुडची नजर तिच्यावर गेली. पुढे इटालीत निर्माण झालेल्या "टू बेड शोइस बेड" व "दी ब्युटिफूल मिलर्स वाईफ" या चित्रपटांमुळे ती अधिकाधिक लोकप्रिय झाली.

## शिखरावर

हॉलिवुडला गेल्यानंतर तिच्या शारीरिक सौंदर्याचा तिला विशेषसा उपयोग झाला नाही. कारण तिथे सौंदर्याच्याच जोडीला अभिनयकौशल्याचीही आवश्यकता होती. शेवटी "प्राईड ॲन्ड पॅशन" या चित्रपटातील कठीण भूमिका तिने मन लावून साकार केली. तिच्या प्रयत्नांना यश आले. १९५८ च्या व्हेनिस चित्रपट महोत्सवात सर्वश्रेष्ठ अभिनेत्री म्हणून तिचा गौरव करण्यात आला.

१९६२ हे वर्ष सोफियाच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाचे वर्ष ठरले. या वर्षी प्रकाशित झालेल्या एम. जी. एम्. च्या "टू वुईमेन" या चित्रपटातील भूमिके-करिता तिला सर्वश्रेष्ठ अभिनेत्री म्हणून ऑस्कर ॲवॉर्ड मिळाले.

वर उल्लेखलेल्या चित्रपटांशिवाय सोफियाने बॉय ऑन ए डाल्फीन, नेपोलियन क्रसेल, लीजंड ऑफ दी लॉस्ट, अवर टाईम, दी वुईमेन ऑन दी रिव्हर, टू बॅड, दी लेक ऑफ वाईन ॲन्ड वुईमेन, हाउसबोट, ब्लॅक आर्किड, दॅट काईड ऑफ वुईमेन, ए ब्रेथ ऑफ स्कॅन्डल, इट स्टार्टेड इन् नेपल्स्, दी मिलियनेअरेस्, एल् सिड वगैरे चित्रपटांत भूमिका केल्या.

निर्माता-दिग्दर्शक कार्लो पोंटी यांच्याशी तिने विवाह केला. १९५७ मध्ये झालेला हा विवाह त्या वेळी इटालीतील विवाह-विषयक कायद्यामुळे चांगलाच गाजला होता.

संकटांना टक्कर देण्यात आपल्या जीवनाचा अधिक काळ गेल्याने सोफिया कमालीची शांत व गंभीर बनली आहे. एकदा तिचे ८५ हजार पौंड किमतीचे दागिने चोरीला गेले. दुसऱ्या दिवशी एका चित्रपटाचे महत्त्वाचे चित्रीकरण होते. सर्वांची कल्पना होती, की या घटनेमुळे सोफिया चित्रीकरणास येणार नाही. परंतु सर्वांच्या कल्पनेला धक्का देऊन सोफिया अगदी वेळेवर स्टुडिओत हजर झाली. आपल्या कलेशी प्रामाणिक राहिल्यामुळेच आज सोफिया लॉरेन यशस्वी अभिनेत्री म्हणून गणली जात आहे. ऐश्वर्य तिच्या चरणाशी लोळण घेत आहे. "आपले पुढे काय होणार?" अशा विचारात इटालीतील रस्त्यावर भुकेने व्याकुळ होऊन वखवखणारी... भटकणारी सोफिया हॉलिवुडमध्ये आपल्या सुंदरशा टुमदार घरात मोठ्या आरामात राहत आहे.

● ● ●





# भस्मासुराचा उदयास्त

: लेखक :

रा. म. शास्त्री

**पुस्तकरूपाने प्रसिद्ध होत आहे.**

रॉयल आकार : पृष्ठसंख्या सुमारे पाचशे

भरपूर छायाचित्रे

**किंमत : अठरा रुपये**

प्रसिद्धिपूर्व सवलतीची किंमत

**रुपये बारा केवळ**

- *सवलतीची मुदत ३१ मे १९६६ पर्यंत*
- *रजिस्टर पोस्टाने ग्रंथ हवा असल्यास दोन रुपये टपालखर्च अधिक पडेल. ( १२ + २ = १४ रु. )*

**राजहंस प्रकाशन**

४१९ नारायण पेठ, पुणे २

MANOOS ( Fortnightly ) : 1 May 66 : 40 Paise : Regd. No. M H–649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**